नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com



* वर्ष ५२ * अंक ६३ * ❋ अकोला ❋ गुरुवार, दिनांक ४ सप्टेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) ❋ विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्रलेख

## खरीखरी..

## आता ओबीसींवर मेहेरबानी

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, काल जरांगे पाटील यांना आपण जिंकलो रे! असे म्हणण्यास भाग पाडले. त्यांचे जिंकणे आणि त्यांचा विजय महोत्सव काल साजरा झाला. आता त्याला अनेक फाटे फुटलेले आहेत. आंदोलकांच्या सर्वच मागण्या कधीही मान्य होत नसतात, सर्व मागण्या मान्य करणे सहज शक्य असते तर आंदोलनाची गरजच पडली नसती. आंदोलन करताना दहा-बारा मागण्या करायच्या असतात त्यापैकी एक दोन महत्त्वाच्या मागण्या असतात. चार-पाच कमी महत्त्वाच्या मागण्या असतात आणि काही अशाच मागण्या असतात. त्यापैकी काही मान्य करून झाल्यावर आंदोलन मागे घ्यायचे असा सर्वसाधारण शिरस्ता आहे. मुंबई मधील मिल कामगारांचे नेते दत्ता सामंत यांनी कामगारांचे भले करण्याकरता त्या काळी म्हणजे ८० ते ९० च्या दशकामध्ये ताठरपणा दाखवल्यावर गिरणगावातील अनेक मिल कामगार उध्वस्त झाले. कित्येक जण अक्षरशा संसारातून उठले आणि कित्येक संसार रस्त्यावर आले कारण, वेळेवर तडजोड न केल्याने होत्याचे नव्हते झाले याचा अनुभव आपण मागील इतिहासात पाहिलाच आहे. जरांगे पाटील यांनी या आंदोलनावेळी हैदराबादची महत्त्वाची मागणी मान्य करून घेतली. आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याचे मान्य करून घेतले. मृत आंदोलकांच्या परिवाराला सरकारी नोकरी देण्याचेही मान्य करून घेतले आणि विशेष म्हणजे जे काही तुम्ही आम्हाला आज देत आहात. ते सरकारने कोर्टामध्ये पण टिकवले पाहिजे हा सुद्धा मुद्दा मान्य करून घेतलेला आहे. आणखी इतरही काही मागण्या मंजूर करून घेतल्या आहेत, यामध्ये बऱ्याच अंशी आंदोलनकर्त्यांचे बऱ्यापैकी समाधान झाले. तिकडे या आरक्षणामुळे ओबीसी समाजाला नुकसान होईल अशी चर्चा सुरू झाल्याबरोबर ओबीसींना सुखावण्यासाठी आज सरकारने ओबीसींच्या प्रश्नासाठी ओबीसी असलेल्या आमदारांची आणि मंत्री महोदयांची उपसमिती गठित केलेली आहे. ओबीसी समाजात मराठ्यांना आरक्षण दिले तर आपल्या हक्काचे रक्षण होईल की नाही हा त्यांचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आणि लाखमोलाचा आहे. सरकार एका समाजाला न्याय देण्यासाठी दुसऱ्या समाजावर अन्याय करणार नाही हे सरकारला दाखवून देणे गरजेचे होते. देवेंद्र फडणवीस यांच्यासारखा सुज्ञ आणि सुविद्य असलेल्या मुख्यमंत्र्यांना ही बाब तात्काळ समजली असावी त्यामुळेच हे सरकार सर्वांचेच आहे हे दाखवणे गरजेचे होते. कालपासून ओबीसी नेत्यांकडून बऱ्याच शंकाकुशंका व्यक्त करण्यात आल्या होत्या त्याला उत्तर म्हणून आजच्या ओबीसी उपसमितीकडे बघावे लागेल. आमच्या माहितीप्रमाणे मराठवाड्यातील अनेक मराठा कुणबी म्हणून ओबीसी बांधवांबरोबर आरक्षणाचा लाभ घेतच आहेत. आताही कालच्या निर्णयानंतर सरकारने अत्यंत कौशल्याने 'सरसकट' हा शब्द वापरलेला नाही. जरांगे पाटलांनाही हे सर्व मान्य आहे असे दिसते.? आता आरक्षणाबाबत ओबीसी समाजात सध्या ज्या शंका उपस्थित झालेल्या आहेत त्याचे निराकरण करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. असा आणि हाच संदेश नव्याने गठित केलेल्या ओबीसींच्या उपसमितीला सर्वांना द्यावयाचा आहे. सरकारला सरकार सारखेच वागायचे असते आणि गंमत अशी आहे की आपले महाराष्ट्राचे सरकार सरकार सारखेच वागलेले आहे. त्यामुळेच एखाद्याला काही मिळाले तर दुसऱ्याने बिथरून जाऊ नये. म्हणून आजची मात्रा तंतोतंत दुरुस्ती करणारी ठरेल, एवढे मात्र निश्चित आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# ओबीसी समाजासाठी उपसमिती स्थापन

### सत्ताधारी पक्षांच्या प्रत्येकी २ मंत्र्यांचा समावेश : कॅबिनेटचा निर्णय : कार्यक्षेत्राची सूची लवकरच

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने मराठा आरक्षणाच्या संदर्भात हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यासंबंधीचा जीआरही तातडीने जारी केला आहे. पण आता सरकारच्या या निर्णयामुळे ओबीसी समाजावर अन्याय झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी हे बोलूनही दाखवले आहे. त्यामुळे राज्य मंत्रिमंडळाने बुधवारी भुजबळांसह ओबीसींची मनधरणी करण्यासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. मंत्री गुलाबराव पाटील यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर ही माहिती दिली आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत ओबीसी समाजासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. मराठा आरक्षणासंबंधी सरकारने काल जारी केलेल्या जीआरवर मंत्री छगन भुजबळ नाराज झालेत. यामुळे सरकारने तातडीने हा निर्णय घेऊन त्यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला आहे. पण मंत्री गुलाबराव पाटलांनी यापूर्वी झालेल्या मागणीनुसार ही कारवाई करण्यात आल्याचा दावा केला आहे.

**उपसमितीला मान्यता**

गुलाबराव पाटील म्हणाले, ओबीसी समाजासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापन करावी अशी मागणी यापूर्वी बऱ्याचदा करण्यात आली होती. या मागणीला आज मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाने मान्यता दिली. त्यानुसार या उपसमितीत प्रत्येक पक्षाच २ मंत्री असतील. या उपसमितीच्या कार्यक्षेत्राची सूची काही दिवसांतच जाहीर केली जाईल.

पत्रकारांनी यावेळी गुलाबराव पाटलांना मराठा आरक्षणाशी संबंधित काल काढलेल्या जीआरमुळे ही समिती स्थापन करण्यात आली आहे काय? असा थेट प्रश्न केला. त्यावर त्यांनी असे काहीही नसल्याचे स्पष्ट केले. ही समिती स्थापन करण्याची मागणी यापूर्वी दोनवेळा करण्यात आली होती. त्यावेळी ही समिती पंधरवड्यात स्थापन करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यानुसार आज या समितीला मान्यता देण्यात आली, असे ते म्हणाले.





**चंद्रशेखर बावनकुळे समितीचे अध्यक्ष?**

सूत्रांच्या माहितीनुसार, या समितीत भाजपचे ४, तर शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रत्येकी २ सदस्य असतील. भाजप नेते तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे या समितीचे अध्यक्ष असतील. छगन भुजबळ, पंकजा मुंडे, गणेश नाईक, गुलाबराव पाटील, संजय राठोड, अतुल सावे, दत्तात्रय भरणे हे समितीचे सदस्य असतील.

उल्लेखनीय बाब म्हणजे ओबीसी नेते तथा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी ओबीसी अर्थात इतर मागासवर्गीयांसाठी मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापन करण्याची मागणी केली होती.

मराठा आरक्षण व मराठा समाजाला विविध सवलती व लाक्ष देण्याच्या दृष्टीने मराठा आरक्षण उपसमिती स्थापन करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विमाप्र समाजासाठी (विशेष मागास प्रवर्ग) मंत्रिमंडळ उपसमिती स्थाप केली जावी, अशी मागणी त्यांनी मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती.

त्यावर फडणवीसांनी भुजबळांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत महायुतीमधील तिन्ही पक्षांना समितीच्या सदस्यपदासाठी आमदारांच्या नावांची शिफारस करण्याचे आवाहन केले होते. त्यावेळी भुजबळांनी आपल्या नावासह मंत्री दत्तात्रय भरणे यांचे नाव दिले होते.

मराठा आरक्षण उपसमितीच्या माध्यमातून सारथी आणि आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अनेक विषय मार्गी लागल्यामुळे मराठा समाजाला या संस्थांमार्फत चांगल्या प्रकारे लाभ मिळत आहे. इतर मागासवर्ग मंत्रिमंडळ उपसमिती नसल्यामुळे इतर मागासवर्ग समाजाचे अनेक विषय महसूल, सामान्य प्रशासन, अर्थ व नियोजन इत्यादी विभागांकडे प्रलंबित आहे.

महाज्योती तसेच महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि आर्थिक विकास महामंडळाकडील अनेक विषय रखडले आहेत. त्यासाठी या विषयांचा वेळोवेळी आढावा घेणे गरजेचे आहे. त्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती असल्याशिवाय इतर मागासवर्गीयांचे प्रश्न सुटणार नाहीत, असे मंत्री छगन भुजबळ यांनी त्यावेळी स्पष्ट केले होते. त्यामुळे आज राज्य मंत्रिमंडळाने ओबीसी समाजासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापन करून सरकारने एकप्रकारे मराठा आरक्षणाच्या जीआरमुळे नाराज झालेल्या छगन भुजबळ यांची मनधरणीच केली आहे.

### २०२४ पर्यंत आलेल्या अल्पसंख्याकांना

## भारतात राहण्यास मुभा




**■ वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. ३ :**

सीएए अंतर्गत केंद्राचा निर्णय

केंद्र सरकारने बुधवारी अफगाणिस्तान, बांगलादेश आणि पाकिस्तानमधील अल्पसंख्याकांना दिलासा दिला जे ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत भारतात आले होते. आता हे निर्वासित (हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी आणि ख्रिश्चन) पासपोर्टशिवाय भारतात राहू शकतील.

नागरिकत्व सुधारणा कायद्याअंतर्गत केंद्राने पासपोर्ट नियमांमध्ये बदल केले आहेत. गृह मंत्रालयाने एक आदेश जारी केला आहे की जरी या समुदायातील लोक वैध पासपोर्ट किंवा कागदपत्रांसह आले असले आणि त्यांची वैधता संपली असली तरीही त्यांना राहण्याची परवानगी दिली जाईल. यापूर्वी २०१४ पर्यंत आलेल्या लोकांना परवानगी होती.

केंद्र सरकारने ११ मार्च २०२४ रोजी देशभरात सीएए लागू केला. या वर्षी मे महिन्यात पहिल्यांदाच सीएए अंतर्गत १४ लोकांना भारतीय नागरिकत्व देण्यात आले.

आजच्या आदेशात केंद्राने स्पष्ट केले की, नेपाळ आणि भूतानच्या नागरिकांना भारतात प्रवास करण्यासाठी किंवा राहण्यासाठी पासपोर्ट आणि व्हिसाची आवश्यकता राहणार नाही, जर ते सीमा मार्गाने भारतात प्रवेश करतील. ही व्यवस्था पूर्वीप्रमाणेच सुरू राहील.

तथापि, जर नेपाळी किंवा भूतानचा नागरिक चीन, मकाऊ, हाँगकाँग किंवा पाकिस्तानमधून भारतात आला तर त्याच्याकडे वैध पासपोर्ट असणे आवश्यक असेल.

भारतीय नागरिकांना नेपाळ किंवा भूतान सीमेवरून भारतात ये-जा करण्यासाठी पासपोर्ट किंवा व्हिसाची आवश्यकता नाही परंतु जर ते नेपाळ किंवा भूतान व्यतिरिक्त इतर कोणत्याही देशातून भारतात परतले तर त्यांना वैध पासपोर्ट दाखवावा लागेल.

## शेतकऱ्यांसाठी सरकारची भेट



**■ महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३ :**
राज्यात अतिवृष्टी, नैसर्गिक संकटे आणि वाढते खर्च यामुळे शेतकऱ्यांचे हाल होत असतानाच सरकारकडून एक दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. या निर्णयामुळे लाखो शेतकरी बांधवांना थेट आर्थिक मदतीचा हात मिळणार आहे.

शेतकरी वर्गासाठी घेतलेल्या या निर्णयामुळे ग्रामीण भागात मोठा उत्साह दिसेल अशी चिन्हे आहेत. सरकारने दिलेला प्रत्येक शब्द आम्ही पूर्ण करू, असं स्पष्ट संदेश देत कृषी विभागाने मोठी घोषणा केली आहे.

नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना सातव्या हप्त्याचा लाभ वितरित करण्यासाठी शासन निर्णय जाहीर करण्यात आला आहे. एकूण ९२ लाख ३६ हजार शेतकऱ्यांच्या खात्यांवर १९३२.७२ कोटी रुपये जमा होणार असून, एप्रिल २०२५ ते जुलै २०२५ या कालावधीचे अनुदान या हप्त्यात देण्यात येणार आहे.

## दिव्यांग लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात वाढ

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :**

मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय

संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात एक हजार रुपयांची वाढ करण्यास बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या लाभार्थ्यांना यापूर्वी दीड हजार रुपए अर्थसहाय्य दिले जात होते. आता या निर्णयाने अडीच हजार रुपये दिले जाईल.

राज्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत निराधार पुरुष, महिला, अनाथ मुले, दिव्यांगातील सर्व प्रवर्ग, निराधार विधवा आदींना दरमहा १ हजार ५०० रुपये अर्थसहाय्य दिले जाते. सध्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेत ४ लाख ५० हजार ७०० आणि श्रावणबाळ योजनेत २४ हजार ३ दिव्यांग लाभार्थी आहेत. या लाभार्थ्यांना आता दरमहा अडीच हजार रुपये अर्थसहाय्य देण्यास आज मान्यता देण्यात आली. हे अनुदान ऑक्टोबर २०२५ पासून देण्यात येईल. यासाठी आवश्यक ५७० कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली.

**आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना**

राज्यातील अनुसूचित जमातीतील इयत्ता नववी आणि दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यनिक शिष्यवृत्ती योजनेऐवजी आता केंद्र सरकारची पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात येणार आहे. या प्रस्तावास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्यात जिल्हा परिषदेच्या शाळांमधील अनुसूचित जमातीच्या नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे.

ही योजना आणि केंद्र सरकारच्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेशी तुलना केली असता केंद्राच्या योजनेमध्ये शिष्यवृत्तीची रक्कम राज्याच्या योजनेपेक्षा अधिक मिळते. त्यामुळे या विद्यार्थ्यांना केंद्र सरकारची पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## कामगारांच्या कामाचे तास वाढले

### कारखाने, दुकाने अधिनियमात सुधारणा

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :**
राज्यात गुंतवणूक आकर्षित करण्याबरोबरच रोजगार संधी वाढीसाठी कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम ५४ आणि महाराष्ट्र दुकाने तसेच आस्थापना अधिनियम २०१७ मध्ये सुधारणा करण्यास बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे कारखान्यातील दैनंदिन कामाच्या तासांची मर्यादा ९ तासांवरून १२ तासांपर्यंत होणार आहे. तर दुकाने आणि आस्थापनांमध्ये दैनंदिन कामाचे तास ९ वरुन १० होतील.

केंद्र सरकारने स्थापन केलेल्या कृती दलाने सुचविलेल्या सुधारणानुसार कारखाने अधिनियम १९४८ मध्ये विविध सुधारणा करण्यासही आजच्या मंत्रिमंडळात मान्यता देण्यात आली. राज्यात गुंतवणूक आकर्षित करणे आणि रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी हे बदल करण्यात आले आहे. कर्नाटक, तमिळनाडू, तेलंगणा, उत्तर प्रदेश, त्रिपुरा यासारख्या राज्यांनी हे बदल आधीच केलेले आहेत.

या सुधारणांमुळे जास्त मागणी असलेल्या वेळेस किंवा कामगारांच्या कमतरतेमध्ये कोणत्याही व्यत्ययाशिवाय उद्योगांचे कामकाज चालू राहू शकते. कामगारांना योग्य वेतन संरक्षणासह कायदेशीररित्या अतिरिक्त उत्पन्न मिळेल. आता ओव्हरटाईम न देता कामगारांकडून काम करवून घेण्याच्या प्रकाराला आळा बसेल.

## हे समाजाचे यश, मी नाममात्र : जरांगे

**■ वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. ३ :**
मराठा आरक्षणाची लढाईत यशस्वीपणे जिंकणाऱ्या मनोज जरांगे यांनी या यशाचे श्रेय गोरगरीब मराठा समाजाला दिली आहे. शेवटी काहीही होवो. माज्या गरीब मराठ्यांनी जिवाची बाजी लावून अखेर ही लढाई जिंकली. सरकारने आरक्षणासंबंधी काढलेल्या तिन्ही जीआरचे श्रेय मी समाजाला देतो. हे यश त्यांचेच आहे. ते त्यांनीच मिळवले. मी केवळ नाममात्र आहे, असे ते म्हणालेत.



मनोज जरांगे यांनी मुंबईतील आझाद मैदानावरील आपले बेमुदत उपोषण मंगळवारी सायंकाळी मागे घेतले. त्यानंतर सध्या त्यांच्यावर येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

तिथे पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी आपल्या लढ्याचे यशाचे श्रेय त्यांनी मराठा समाजाला दिले. शेवटी काहीही होवो, माझ्या गरीब मराठ्यांनी जिवाची बाजी लावून अखेर ही लढाई जिंकली. खूप प्रतिक्षा होती, याचा आनंद आहे.




# अटल सेतुसह अन्य टोल नाक्यावर इलेक्ट्रिक वाहनांना टोलमाफी

### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती : सरकारची अधिसूचना जारी

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :**
राज्यातील इलेक्ट्रिक वाहन उद्योगाला व वाहनधारकांना चालना देण्यासाठी टोल नाक्यावर टोलमाफी देण्याची धोरण सन्माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य शासनाने घेतले होते.

त्यानुसार २१ ऑगस्ट पासून अटल सेतू सह मुंबई -पुणे द्रुतगती महामार्ग तसेच समृद्धी महामार्गावरील सर्व टोल नाक्यांवर इलेक्ट्रिक वाहनांना टोल माफी करण्यात येत असल्याची अधिसूचना राज्य सरकारने जारी केली आहे. अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.





मंत्री सरनाईक म्हणाले की, महाराष्ट्र शासनाने मोटार वाहन कर अधिनियम १९५८ अंतर्गत निर्गमित केलेल्या अधिसूचनेनुसार सर्व प्रकारच्या इलेक्ट्रिक वाहनांना वाहनांना ठराविक मार्गांवरून प्रवास करताना टोल नाक्यांवरून सूट देण्यात आली आहे.

शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार, खालीलप्रमाणे इलेक्ट्रिक चारचाकी व बस वाहनांना टोल करातून सूट दिली आहे. इलेक्ट्रिक चारचाकी वाहने श्रेणीतील इलेक्ट्रिक बसेस-राज्य परिवहन उपक्रम तसेच खासगी इलेक्ट्रिक बसेस प्रकारातील वरील वाहनांना राज्यातील ठराविक महामार्ग व मार्गावरील टोल नाक्यांवरून टोल कर भरण्यापासून सूट राहील. ही सूट २२ ऑगस्ट २०२५ च्या मध्यरात्री पासून लागू झाली आहे.

शासनाचा हा निर्णय राज्यातील पर्यावरणपूरक वाहतूक व स्वच्छ ऊर्जा वापरास प्रोत्साहन देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले.

# मराठा आरक्षणा संदर्भातील जीआरवर
# ओबीसी नेत्यांमध्ये मतभेद

## भुजबळ, हाके, तायवाडे यांच्या परस्परविरोधी भूमिका : तिघांतही एकवाक्यतेचा अभाव

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :** मनोज जरांगे यांच्या मुंबईतील बेमुदत उपोषणाची मंगळवारी यशस्वी सांगता झाली. मराठा समाजाला कुणबीच्या माध्यमातून ओबीसी आरक्षण देण्यासाठी महायुती सरकारने एक महत्वपूर्ण जीआर काढला. या जीआरवर आता राजकीय वतुर्ळातून विशेषतः ओबीसी नेत्यांतून वेगवेगळ्या प्रतिक्रिया येत आहेत.

ओबीसींचे राज्यातील बडे नेते तथा मंत्री छगन भुजबळ यांनी या प्रकरणी कायदेशीर सल्ला घेऊन कोर्टात जाण्याचा इशारा दिला आहे. लक्ष्मण हाके यांनीही हा जीआर फाडला आहे. याऊलट बबनराव तायवाडे यांनी या जीआरमुळे ओबीसींचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचा दावा करत या दोघांना झटका दिला आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या मुद्यावर ओबीसी नेत्यांतच टोकाचे मतभेद असल्याचे स्पष्ट झाले आहे.







**छगन भुजबळांची भूमिका**

मराठा आरक्षणाच्या मुद्यावर राज्य सरकारने काढलेल्या जीआरवर छगन भुजबळ यांनी तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. ते या प्रकरणी चांगलेच नाराज झालेत. त्यांनी या प्रकरणी आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीवरही बहिष्कार टाकला. त्यामुळे त्यांची मनधरणी करण्यासाठी सरकार व सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या गोटात मोठी धावपळ सुरू झाली आहे. सरकारने या प्रकरणी ओबीसी समासाठी मंत्रिमंडळाची उपसमितीही स्थापन केली आहे. या समितीच्या माध्यमातून ओबीसी समाजाच्या उत्थानाचा कार्यक्रम आखण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

छगन भुजबळ या प्रकरणी बोलताना म्हणाले की, राज्य सरकारने काढलेल्या अधिसूचनेबाबत आमच्या मनात, ओबीसी नेत्यांच्या मनात व जनतेच्या मनात फार मोठ्या शका आहेत.

आम्ही यावर वकिलांचा कायदेशीर सल्ला घेत आहोत. सरकारला एखाद्या जातीला उचलून दुसऱ्या जातीत टाकण्याचा कोणताही अधिकार नाही. त्यामुळे आम्ही या प्रकरणी न्यायालयात दाद मागणार आहोत. कायदेशीर लढाई लढणार आहोत. भुजबळांच्या या विधानानंतर मराठा आरक्षणाच्या जीआरला कोर्टात आव्हान मिळेल हे स्पष्ट आहे.

**लक्ष्मण हाकेंनी फाडला जीआर**

दुसरीकडे, ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी सरकारचा जीआर फाडून आपला रोष व्यक्त केला आहे. सरकारने मनोज जरांगे यांचे उपोषण सोडवताना जाहीर केलेला अध्यादेश पूर्णतः बेकायदा आहे.

गावगाड्यातील ओबीसी साज तसेच अन्य प्रवर्गातील जाती-जमातींमधील सर्वांच्याच आरक्षणाचा घोट या सरकारी अध्यादेशाने घेतला आहे. सरकार या अध्यादेशामुळे ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागला नसल्याचा दावा करत आहे. पण हा धक्का कसा लागत नाही? हे सरकारने सिद्ध करून दाखवावे. मराठा समाजाला जात प्रमाणपत्र मिळण्याच्या कामात सुलभता यावी यासाठी हा अध्यादेश आहे असे त्यात म्हटले आहे. त्याचा अर्थ काय? हे सरकारने महाराष्ट्राला समजून सांगावे, असे हाके म्हणाले.

मराठा आरक्षणाच्या उपसमितीत ओबीसी समाजाची सर्वांगिन माहिती असणारा एकही माणूस नव्हता. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचाही या विषयाचा कोणता अभ्यास नाही. राज्यातील ओबीसी समाजाची विस्ताराने माहिती असणारे या समितीत कुणीही नाही. त्यामुळे ही समितीच पक्षपाती आहे. गावातील, नात्यातील, कुळातील लोकांना म्हणजेच सग्यासोयऱ्यांना सरसकट आरक्षण आहे असा होतो. सरकारने ओबीसी आरक्षण संपवले आहे, असेही लक्ष्मण हाके याविषयी आपला संताप व्यक्त करताना म्हणाले.

**प्रकाश शेंडगेंची अनुकूल भूमिका**

अन्य एक ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी मराठा आरक्षणाच्या जीआरमुळे ओबीसी समाजावर अन्याय झाल्याचा आरोप केला आहे. मराठा आरक्षणाच्या मुद्यावर सरकारने घेतलेल्या निर्णयामुळे छगन भुजबळ नाराज झालेत. सरकारने मराठा समाजाला ओबीसींच्या ताटातले आरक्षण दिले आहे. त्याला आमचा विरोध आहे. आम्ही या प्रकरणी राज्यव्यापी आंदोलन उभारू. याविषयी हैदराबाद गॅझेटियरमध्ये ज्या बाबी नोंद आहेत, त्यावरही आमचा आक्षेप आहे. आता आम्ही याविषयी कायदेशीर लढाई लढू. ओबीसी समाज हा राज्यातील सर्वात मोठा समाज आहे. त्यावर अन्याय होता कामा नये, असे ते म्हणालेत.

**बबनराव तायवाडे म्हणतात - ओबीसींचे कोणतेही नुकसान नाही**

उल्लेखनीय बाब म्हणजे ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी छगन भुजबळ व लक्ष्मण हाके या दोघांहून अत्यंत वेगळी भूमिका घेतली आहे. त्यांनी या प्रकरणी ओबीसी समाजाचे कोणतेही नुकसान झाले नसल्याचा दावा केला आहे. आम्ही सरकारच्या जीआरवर समाधानी आहोत. आम्ही या जीआरचा अभ्यास केला. त्यावर चिंतन - मनन केले. या अध्यादेशामुळे ओबीसी आरक्षणाला कोणताही धक्का लागला नाही. हा शासननिर्णय सरसकट कुणबी जातप्रमाणपत्र निर्गमित करण्याचा नाही. कारण, ज्या कुण्या व्यक्तीला कुणबी, मराठा - कुणबी व कुणबी - मराठा जातप्रमाणपत्र हवी आहेत, त्या व्यक्तीलाही सध्याच्या प्रचलित पद्धतीतून जावे लागणार आहे. विशेषतः हैदराबाद गॅझेटियरमध्ये वैयक्तिक नोंदी नाहीत. यावर्षी एवढे कुणबी होते, त्यावर्षी एवढे मराठे होते एवढीच आकडेवारी त्यात आहे. त्या आधारावर काहीच सिद्ध होत नाही, असे ते म्हणालेत.

---

## मराठा आरक्षणावर वकील सदावर्ते यांचे थेट ओपन चॅलेंज



■ **मुंबई :** मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भात राज्य सरकारने काढलेल्या जीआरवर आता वकील गुणरत्न सदावर्ते यांनी थेट हल्लाबोल केला आहे. सदावर्तेंच्या म्हणण्यानुसार, हा शासन निर्णय बेकायदेशीर आहे आणि संविधानाच्या मर्यादांचा भंग करतो.

सदावर्ते म्हणाले की, मंत्रिमंडळ बैठकीत छगन भुजबळ यांनी उपस्थिती न दाखवून लोकतांत्रिक मागार्ने सरकारला संविधानिक सल्ला दिला. मात्र, राधाकृष्ण विखे पाटील यांनी शासन निर्णय जातिवादी आधारावर घेतल्याचा आरोप त्यांनी केला. कुणबी आणि मराठा वेगळे आहेत, हे स्पष्ट करणे आवश्यक आहे. जर सरकारच्या निर्णयाने समाजाची फसवणूक झाली, तर याचे जबाबदार कोण? असा प्रश्न सदावर्तेंनी उपस्थित केला.

सदावर्ते यांनी उघडपणे फडणवीस सरकारमधील विखे पाटील यांना चॅलेंज दिले की, त्यांनी पोलिसांना मारहाण झालेल्या गुन्ह्यांबाबत ठोस कृती करावी आणि आरक्षणाच्या मुद्द्यावर शासनाने केलेले संविधानविरुद्ध निर्णय मागे घ्यावा. त्यांनी म्हणाले की, जरांग्यांनी स्वतःच्या स्वाथार्साठी समाजाला फसवले आहे आणि शिंदे कमिटी बेकायदेशीर आहे. त्याचबरोबर, सदावर्ते यांनी धनंजय मुडे, बावनकुळे आणि इतर मंत्र्यांच्या भूमिकांवर टीका करत, मराठा समाजाच्या हितासाठी ठोस आणि पारदर्शक निर्णय घेण्याची आवश्यकता अधोरेखित केली.

## सरकारच्या जीआरवर प्रश्नचिन्ह

■ **मुंबई :** मनोज जरांगे पाटील यांच्या पाच दिवसांच्या उपोषणानंतर सरकारने हैद्राबाद गॅझेट लागू करण्यासाठी जीआर काढला. मराठा आंदोलनकर्त्यांनी याचा आनंदोत्सव साजरा केला, पण माजी न्यायाधीश बी.जी. कोळसे-पाटील यांचा दृष्टिकोन अत्यंत गंभीर आहे. कोळसे-पाटील म्हणाले की, हे आरक्षण कायद्याच्या कसोटीवर टिकणार नाही. जीआर पाहून मी स्वतः हतबल झालो.ह्व त्यांनी जरांगे पाटीलांना फोन करूनही चेतावणी दिली होती की, या निर्णयातून मराठ्यांचे आणि त्यांच्या तब्येतीचे नुकसान होऊ शकते.

माजी न्यायाधीश म्हणाले की, या जीआरचा संपूर्ण अंमलबजावणीचा मजकूर पाहिला तर तलाठ्यापासून ग्रामपंचायत अधिकारी, कृषी सहायक अधिकारी यांच्याकडे जावे लागेल, आणि शेवटी कोटार्तील प्रक्रिया टाळता येणार नाही. जर कायदेशीर आरक्षण द्यायचे असेल, तर ते केंद्र आणि राज्य सरकार मिळूनच करावे लागेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

कोळसे-पाटील यांनी उपोषणातून मिळालेल्या वचनांची खरी किंमत कायदेशीर चौकटीत तपासून ठरवण्याचे आव्हान दिले. त्यांच्या म्हणण्यानुसार, मी १९७६ पासून मरण, पोलिस आणि तुरुंग यांना न घाबरत, १०० टक्के सत्य बोलून टिकेचा धनी व्हायला तयार आहे. डोंगर पोखरून उंदीर बाहेर काढणे म्हणजे काय हे आता मला समजले. यामुळे मराठा आरक्षणाच्या भवितव्यासाठी सामाजिक आणि राजकीय चर्चेलानवीन तडा लागला आहे. आंदोलनातील आनंदोत्सव आणि मिळालेल्या जीआरच्या प्रभावाची खरी प्रत्यक्षता आता न्यायालयीन कसोटीवर पडणार आहे.

## जीआरचा किती फायदा होणार?



■ **मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने मराठा आरक्षणाशी संबंधित काल काढलेल्या जीआरमुळे किती फायदा होईल याविषयी साशंकता आहे, असे मत आमदार रोहित पवार यांनी बुधवारी व्यक्त केले. मनोज जरांगे यांचे आंदोलन गतवर्षी नवी मुंबईत थांबवण्यात आले होते. तेव्हा एक अध्यादेश देण्यात आला होता. तो अध्यादेश व कालचा जीआर याच्यात नाव व थोड्याफार गोष्टी बदलल्या तर काहीच फरक नाही, असेही ते यावेळी म्हणालेत. रोहित पवार यांच्या भूमिकेमुळे मराठा आरक्षणाचा निकालेली निघालेला कथित मुद्दा आणखी तापण्याची चिन्हे आहेत.

ते म्हणाले, मनोज जरांगे यांचे आंदोलन होणार हे ३ महिन्यांपूर्वीच सरकारला कळले होते. पण या ३ महिन्यांत मंत्रिमंडळाच्या उपसमितीने एकही बैठक घेतली नाही. याविषयी कोणतीही चर्चा केली नाही. मग हा विलंब का केला गेला? विदर्भासह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून किती जण येणार आहेत? याचा अंदाज राज्याच्या गृह खात्याकडे होता. पण त्यानंतरही मुंबई महापालिकेला याबाबतीत कुठेही सांगण्यात आले नव्हते. किती मोठ्या प्रमाणात लोकं येणार आहेत याचा कोणताही अंदाज महापालिकेला नव्हता. सरकार या नियोजनाच्या बाबतीत कमी पडले असे आमचे मत आहे.

---

मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात

# अडचणी येणार नाहीत

### आरक्षणाच्या जीआरवर एकनाथ शिंदेंची प्रतिक्रिया

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :** मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत उपोषण सुरू केले होते. ५ दिवसांच्या उपोषणानंतर अखेर राज्य सरकारने जरांगेंच्या मागण्या मान्य केल्या आहेत. त्यानुसार राज्य शासनाने जीआर देखील काढला आहे.

परंतु, या जीआरला ओबीसी नेत्यांनी विरोध केला असल्याचे दिसत आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी देखील या जीआरच्या निषेधार्थ आजच्या कॅबिनेट बैठकीवर बहिष्कार टाकला होता. या सगळ्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.



एकनाथ शिंदे म्हणाले, हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा जीआर आपल्या सरकारने काढला आहे. याबद्दल सविस्तर मी बोललो आहे तसेच मुख्यमंत्री सुद्धा बोलले आहेत. यामध्ये जो निर्णय आम्ही घेतला आहे तो कायद्याच्या चौकटीत बसवून घेतला आहे. त्यामुळे जी काही पद्धत आहे.

मराठा समाजातल्या कुणबी प्रमाणपत्र देण्यासंदर्भात जी प्रक्रिया आहे ती अधिक सोपी करणे सुलभ करणे याचा उल्लेख जीआरमध्ये स्पष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे मला असे वाटते की त्याची अंमलबजावणी करण्यात कुठलीही अडचण येणार नाही आणि कुणबी प्रमाणपत्र मराठा समाजाला मिळेल.

**भुजबळांची नाराजी दूर होईल**

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, हे सगळे करत असताना ओबीसी समाजाचे कुठलेही नुकसान होणार नाही, अशी भूमिका सरकारची सुरुवातीपासून आहे. छगन भुजबळ यांच्याशी आम्ही बोलू, मुख्यमंत्री देखील बोलतील आणि जो काही निर्णय घेण्यात आला आहे, त्याची जी काही वस्तुस्थिती आहे त्यांना समजाऊन सांगू.

मला वाटते आपण जो काही निर्णय घेतलेला आहे त्याची माहिती आणि वस्तुस्थिती समजून घेतल्यानंतर भुजबळ साहेबांची नाराजी दूर होईल, असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

**भुजबळ कॅबिनेट बैठकीला गैरहजर**

छगन भुजबळ हे मराठा आरक्षणाच्या जीआरमुळे नाराज झाल्याने त्यांनी आजच्या कॅबिनेट बैठकीवर बहिष्कार टाकल्याची चर्चा आहे. मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी झालेल्या पक्षाच्या बैठकीला छगन भुजबळ उपस्थित होते. मात्र कॅबिनेट बैठकीला हजर नसल्याचे चर्चांना उधाण आले आहे. त्यांनी याबाबत बोलण्यास नकार दिला. मात्र मराठा आरक्षणाच्या जीआरला त्यांचा विरोध असून ते त्याविरोधात कोर्टात जाणार आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

तसेच मला वाटत आहे की काही लोक म्हणत होते की हरकती मागवायला हव्या होत्या.काही लोक म्हणतात की ते यांना अधिकार आहे का? आता पाहू ते सगळ आता आम्ही विचार करतो. असा निर्णय होईल अशी आम्हाला काय कुणालाच अपेक्षा नव्हती, अशी प्रतिक्रिया भुजबळ यांनी पत्रकारांशी बोलताना दिली आहे.

---

# शिंदे गटाच्या कार्यकर्त्याची कारखाली चिरडून हत्या

### ठाण्यातील वागळे इस्टेट परिसरातील घटना : जनता भयभीत : व्हिडिओ व्हायरल

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेच्या एका कार्यकर्त्याची ठाण्यातील वागळे इस्टेट येथील आयटी सर्कल येथे कारखाली चिरडू हत्या करण्यात आल्याची भयंकर घटना रात्री उशिरा घडली आहे. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, यामुळे जनतेत दहशत पसरली आहे.

विठ्ठल गायकर असे मृत व्यक्तीचे नाव आहे. तो शिवसेनेचा स्थानिक कार्यकर्ता होता. त्यांची संतोष पवार नामक आरोपीने कारखाली चिरडून निर्घृण हत्या केली. घटनेनंतर आरोपी संतोष पवार कारसह फरार झाला. पण श्रीनगर पोलिसांनी तत्काळ तपासाची सूत्रे हाती घेत आरोपीची कार जप्त केली. पोलिसांनी आरोपीच्या एका सहकाऱ्यालाही अटक केली आहे. श्रीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक गुलजारीलाल फडतरे यांनी या घटनेविषयी सांगितले की, आरोपीच्या शोधासाठी ३ विशेष पथके स्थापन करण्यात आली आहे.

**घटनेचे सीसीटीव्ही फुटेज व्हायरल**

दुसरीकडे, घटनेचे एक सीसीटीव्ही फुटेज सोशल मीडियात व्हायरल झाले आहे. त्यात गुंड संतोष पवार हा विठ्ठल गायकर यांना कारखाली चिरडून ठार मारताना दिसत आहे. प्रथम तो गायकर यांना कारने धडक देतो. त्यानंतर ते खाली पडल्यानंतर कार त्यांच्या छाती व डोक्यावर घालतो. आरोपी संतोष पवारवर यापूर्वीसुद्धा अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. हे हत्याकांड पूर्ववैमनस्यातून घडल्याचेही सांगण्यात येत आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे या घटनेनंतर ठाण्यातील गुन्हेगारी स्वरुप व त्यातील नवनवीन पॅटर्नकडे लक्ष वेधले गेले आहे. गुंड आता पूर्वीप्रमाणे शस्त्राने नव्हे तर गाडीखाली चिरडून ठार मारताना दिसून येत आहेत. पोलिसांपुढे आरोपीच्या मुसक्या आवळण्याचे मोठे आव्हान आहे.

**पोलिसांनी उधळला हल्ल्याचा कट**

दुसरीकडे, पुणे पोलिसंनी वनराज आंदेकरच्या हत्येचा बदला घेण्याचा एक प्रयत्न उधळवून लावला आहे. माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांची गतवर्षी हत्या करण्यात आली होती. त्यांच्या हत्येला १ वर्ष पूर्ण होण्याच्या निमित्ताने विरोधी टोळीने बदला घेण्याचा कट आखला होता.

त्यानुसार, वनराज आंदेकर यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी सोमनाथ गायकवाडच्या मुलावर कात्रज भागात रविवारी मध्यरात्री हल्ला करण्याची योजना होती. पण तत्पूर्वीच या कटात सहभागी असणाऱ्या एका आरोपीला अटक करण्यात आली. यामुळे हा कट उधळला गेला. या प्रकरणी समर्थ नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

## मैत्रिणीला छेडल्याने खून

■ **वृत्तसंस्था, नाशिक, दि. ३ :** त्र्यंबकनाक्यावरील फूटपाथवरच मैत्रिणीची छेड काढल्याच्या संशयावरून फिरस्त्या युवकाच्या डोक्यावरच पेव्हर ब्लॉकने मारून खून केल्याची धक्कादायक घटना घडली.

ठक्कर बसस्थानकाच्या मागील बाजूस माझदा हॉटेलच्या समोर फुटपाथवर दोन युवक एक मैत्रिणीसोबत फिरत असताना त्यांनी फिरस्ता युवकाला रस्त्यातच मारहाण सुरू केली. फिरस्त्याला खाली पाडून त्याच्या डोक्यात जवळील पेव्हर ब्लॉक उचलून दोन-तीन वेळा मारून जागेवरच रक्ताच्या थारोळ्यात निपचित पडेपर्यंत मारले. पोलिसांनी तीनयुवक आणि युवती पळून जाताना पाठलाग करून त्यांना पकडले. चौकशीत संशयित जयेश रायबहादूर याने मैत्रिणीला छेडल्याच्या कारणातून खून केल्याची कबुली दिली.

---

# गुन्ह्यांचा सिलसिला सुरूच!

■ **दीपक कैतके, मुंबई, दि. ३ :** राज्यातील राजकीय व सामाजिक गल्लीवर मराठा आंदोलनाचा उद्रेक अद्याप गाजतोय. मुंबईतील हजारों मराठा बांधवांनी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आझाद मैदानावर जमले आणि अनेक दिवसांचा उपोषण संपवल्यानंतरच माघारी फिरले.

उच्च न्यायालयात आंदोलनावर सुनावणी पूर्ण झाली असून, न्यायालयाने सार्वजनिक मालमत्तेचे मोठे नुकसान झाल्याचे स्पष्ट केले. आंदोलकांच्या वकिलांना प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मरीन ड्राईव्ह आणि डोंगरी पोलीस ठाण्यात आंदोलनकर्त्यांविरोधात गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, आत्तापर्यंत ९ गुन्ह्यांची नोंद झाली आहे.

ज्यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण सोडले, तेव्हा हजारोंच्या संख्येने जमलेल्या मराठा बांधवांनी शांततेने आपापल्या घराकडे माघारी निघाले. तथापि, आझाद मैदान, एमआरए मार्ग, लोकमान्य टिळक मार्ग, डोंगरी आणि पायधुनी या पोलीस ठाण्यांमध्ये आंदोलनादरम्यान झालेल्या गैरकायद्यांच्या घटनांबाबत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सरकारकडून बहुतेक मागण्या मान्य झाल्यानंतरही, आंदोलनाच्या विरोधातील कायदेशीर कारवाई सुरू राहणार असल्याचे संकेत आहेत. न्यायालयीन सुनावणी आणि गुन्ह्यांच्या नोंदींनी मराठा आंदोलनाच्या भवितव्यासाठी प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

**धक्कादायक निर्णय!**

मंत्रिमंडळाच्या ताज्या बैठकीने राज्यात राजकीय वाऱ्याला नवे वळण दिले आहे. अचानक चर्चेत आलेल्या निर्णयाने सर्वच पक्षांमध्ये चर्चा आणि गोंधळ निर्माण झाला आहे. राजकीय विश्लेषक म्हणतात की, हा निर्णय काही काळासाठी वादविवादाचे केंद्र बनेल.

सत्ताधारी गटातील मंत्र्यांमध्ये सुसंगती तपासण्यासाठी, आणि ओबीसी समुदायाशी संबंधित मुद्यांवर प्रभावी मार्ग शोधण्यासाठी खास उपसमिती स्थापन करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. ही उपसमिती फक्त चर्चा करण्यापुरती मर्यादित न राहता, पुढील धोरणात्मक निर्णयांवर देखील प्रभाव टाकणार आहे. उपसमितीत प्रत्येक पक्षातून दोन-२ मंत्री आणि अधिकारी सामील असणार आहेत, एकूण सहा जणांनी ही कार्यसंघ रचना पूर्ण केली आहे. या उपसमितीच्या बैठकीतून पुढील आठवड्यात राज्यातील ओबीसी आरक्षण आणि विकास धोरणांसाठी ठोस प्रस्ताव समोर येण्याची शक्यता आहे.

मात्र, कायदे आणि समाजातील तज्ज्ञांच्या मते, या निर्णयामुळे आंदोलनकर्त्यांच्या अपेक्षा आणि प्रशासनाच्या धोरणामध्ये तणाव निर्माण होऊ शकतो. त्यामुळे या उपसमितीच्या पहिल्या बैठकीकडे सर्वच वर्गांचे लक्ष लागले आहे. म्हणूनच, मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेला हा निर्णय ओबीसीसाठी उपसमिती स्थापन करण्याचा, राज्यातील राजकीय परिस्थितीवर मोठा प्रभाव टाकणार असल्याचे दिसत आहे.

**सरकारच्या निर्णयाची खरी कथा**

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाने मराठा समाजातच नव्हे, तर राजकीय गल्लीतही तुफान चर्चा उडवली. मराठा आणि कुणबी एकच आहेत, त्यांचा ओबीसी आरक्षणात समावेश व्हावा अशी मागणी त्यांनी ठामपणे मांडली.

सरकारने त्वरित जीआर जाहीर करून हैद्राबाद गॅझेटिअरला मान्यता दिली; पण सातारा संस्थानाची प्रतिक्षा पुढील महिन्यापर्यंत ठेवल्याने आंदोलन मागे घेण्यास मनोज जरांगे मजबूर झाले. मात्र, विधीज्ञ असीम सरोदे यांच्या मते, सगळं आधीच ठरलेलं होतं आणि मनोजदादांना अपेक्षित निकाल अजूनही मिळालेला नाही. निकटवतीयांकडून आलेल्या मेसेजसाठी सरोदे यांनी सल्ला दिला.

सरकारच्या जीआर मध्ये मोफत शिक्षण आणि नोकरीची हमी असली तरी, प्रक्रिया अस्पष्ट आणि क्लिष्ट भाषेत असल्याने आंदोलनकर्त्यांना फसवले जाण्याचा धोका आहे. सरोदे म्हणतात की, आरक्षण हा एकमेव विकासाचा मार्ग नाही. शिक्षण, रोजगार आणि दर्जेदार सुविधा याकडे लक्ष द्यायला हवे. सरोदे यांनी सुचवले की, कुणबी-मराठा नोंद नसलेल्या कुटुंबांसाठी केंद्र सरकारकडे अतिरिक्त मागणी करणे आवश्यक होते. तसेच, मुख्यमंत्री यांनी पंतप्रधान आणि केंद्र सरकारला पत्र देऊन जरांगे यांना प्रत द्यावी, तर विश्वासार्हता वाढली असती, असे ॲड. असिम सरोदे यांनी म्हटले आहे.

---

# आंदोलनामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई कोण देणार?

### हायकोर्टाचा मनोज जरांगेंना सवाल : चार आठवड्यांत स्पष्टीकरण देण्याचे निर्देश

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३ :** मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षणासाठीच्या आंदोलनामुळे मुंबईतील सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने मनोज जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांना चार आठवड्यांच्या आत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

या नुकसानीची भरपाई कोण देणार? अशी विचारणाही मुंबई उच्च न्यायालयाने मनोज जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांना केली. याबाबत चार आठवड्यांत प्रतिज्ञापत्रात स्पष्टीकरण देण्याचे निर्देश मनोज जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांना दिले.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे २९ ऑगस्टपासून मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणाला बसले होते. मनोज जरांगे यांच्या एका हाकेवर राज्यभरातील मराठा बांधव मुंबईत दाखल झाले होते. सरकारच्या मध्यस्थीने मंगळवारी मनोज जरांगे यांचे उपोषण संपले. मात्र, या आंदोलनादरम्यान मुंबईत सार्वजनिक मालमत्तेचे मोठे नुकसान झाले असल्याच्या पार्श्वभूमीवर त्याची भरपाई कोणाकडून करायची, हा प्रश्न उच्च न्यायालयाने उपस्थित केला आहे. बुधवारी प्रभारी मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठासमोर याचिकेची सुनावणी झाली.



**हायकोर्टात नेमके काय घडले?**

उच्च न्यायालयाने म्हटले आहे की, जरांगे यांनी प्रक्षोभक भाषणे दिल्याने मोठ्या संख्येने आंदोलक मुंबईत आले आणि त्यामुळे मालमत्तेचे नुकसान झाले. परंतु, जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांनी हे आरोप फेटाळले. त्यांनी सांगितले की, जरांगे यांनी असे कोणतेही भाषण दिले नाही आणि आंदोलकांनी रस्ते किंवा फूटपाथ अडवण्याशिवाय दुसरे कोणतेही नुकसान केले नाही. मात्र, न्यायालयाने काही फोटो दाखवले ज्यात नुकसान झाल्याचे दिसत होते.

तसेच, समन्वयाचा अभाव किंवा अन्य कारणामुळे हे सगळे घडले असावे. परंतु, नुकसान झाल्याचे छायाचित्रांतून दिसत आहे याचा पुनरूच्चार न्यायालयाने केला. तेव्हा आंदोलकांनी सार्वजनिक मालमत्तेचे कोणत्याही प्रकारे नुकसान केले नसल्याचे जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांनी पुन्हा एकदा न्यायालयाला सांगण्याचा प्रयत्न केला.

हे प्रकरण आता निकाली निघाले असले तरी, नुकसानीच्या भरपाईचा मुद्दा बाकी आहे. त्यामुळे, कोणतीही तोंडी माहिती न देता, जरांगे आणि आयोजकांनी प्रतिज्ञापत्राद्वारे आपली बाजू मांडावी. यानंतरच याचिका निकाली काढली जाईल, असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

यापूर्वी, सरकारने आंदोलनादरम्यान झालेल्या नुकसानीची भरपाई पोलिसांमार्फत वसूल केली जाईल असे सांगितले होते. मात्र, न्यायालयाने ही माहिती पुरेशी नसल्याचे म्हटले आणि लेखी स्वरूपात स्पष्टीकरण देण्यास सांगितले. दरम्यान, न्यायालयानेआझाद मैदान तातडीने रिकामे करण्याचा इशाराही सोमवारी दिला होता.

# अवैध दारू अड्डयावर पिंजर पोलिसांचा ' प्रहार ' देशी दारू २६ हजाराची दारू जप्त

अकोला : श्री. अर्चित चांडक, पोलीस अधीक्षक, अकोला यांचे निर्देशाप्रमाणे अकोला जिल्हयामध्ये अवैध धंदे समूळ नष्ट करण्यासाठी ऑपरेशन प्रहार मोहीम राबविण्यात येत आहे. आज दिनांक ०३/०९/२०२५ रोजी पिंजर पोलीस स्टेशन ठाणेदार गंगाधर दराडे यांना पोस्ट हद्दीत पेट्रोलिंग दरम्यान दोन व्यक्ती मोटर बाईक वर देशी दारू घेऊन जात आहेत अशा मिळालेल्या गुप्त बातमी वरून सदर ठिकाणी पोलीस स्टेशन पिंजर स्टाफ च्या मदतीने रेड केली असता देशी दारू बॉबीसंत्राच्या ९० चङ



चे ६.५ बॉक्स मध्ये एकूण ६५० दारूच्या बाटल्या प्रत्येकी किंमत ४० रुपये प्रमाणे किंमत २६,००० रुपये व मोटरसायकल क्रमांक चक ३० ४५५७ किंमत १ लाख रुपये असा एकूण १,२६,००० रुपयाचा मुद्देमाल आरोपी १. अमर उद्धव घोडे वय २९ वर्ष राहणार टेंभी २. जनार्धन तुकाराम खंडारे वय ७० वर्ष राहणार विरहित यांच्या ताब्यातून जप्त केला. नमूद आरोपी विरुद्ध दारूबंदी कायदा नवे गुन्हा नोंद करून पुढील तपास करीत आहोत.सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री अर्चीत चांडक साहेब, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री चंद्रकांत रेड्डी साहेब, मूर्तिजापूर वैशाली मुळे मॅडम यांच्या मार्गदर्शनात अझख गंगाधर दराडे, झडख अभिषेक नवघरे अडख ११९१ दत्तात्रय चव्हाण नागसेन वानखडेवैभव मोरे यांनी केली.

# अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या ६ कोटीच्या पिकांचे नुकसान

**अकोला :** यंदा जुलै महिन्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाचा अंतीम अहवाल मंगळवारी तयार झाला. ७ हजार ३१ हेक्टर क्षेत्रातील पिकांची हानी झाली असून, नुकसान भरपाईसाठी ६ कोटी २१ लाख ६१८ रुपयांची आवश्यक भासणार आहे. निसर्गाच्या लहरीपणाचा फटका ११ हजार ६०० शेतकऱ्यांना बसला. जिल्ह्यात यंदा जून महिन्याच्या प्रारंभी वरूणराजाने फारशी कृपा केली नाही. मृगनक्षत्रात पावसाने पाठ फिरवल्याने अनेकांची चिंता वाढली. मात्र जूनच्या अखेरीस दोन वेळा मुसळधार पाऊस झाला. जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात चार दिवस पावसाची संततधार सुरु होती; परंतु त्यानंतर पावसाने दडी मारली. दरम्यान जुलै महिन्याच्या अखेरीस तुफास पाऊस झाला. सर्वाधिक फटका



बाळापूर तालुक्याला बसला होता. प्रारंभी प्राथमिक सर्वे क्षण करण्यात आले. त्यानंतर महसूल, कृषी व जिल्हा परिषद अशा तीन यंत्रणांकडून संयुक्त पंचमाने करण्यात आला. आता हा अहवाल तयार झाला असून, शासनाला नुकसान भरपाईची मागणही करण्यात आली आहे.बाळापूर तालुक्यातील १५० घरांची अंशत: पडझड झाली झाली होती. सर्वाधिक पावसाची नोंद बाळापूर मंडळात तर १७७ मि.मी करण्यात आली होती. तूर, कपाशी, सोयाबीनसह अन्य पिकांची हानी झाली होती. पारस येथेही प्रचंड पाऊस झाला होता.. शेतीला तलावाचे स्वरुप प्राप्त झाले असून, अंकुरलेल्या पिकांची हानी झाली.कोरडवाहू : खरीप हंगामातील एकूण ७ हजार ३०९. ३४ क्षेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले.यात कापूस १८८.७ हेक्टर, सोयाबीन-५ हजार ५२, तूर - १ हजार ३३७, मुग- ३.८, उडीद ४.७ आणि अन्य २२ हेक्टर क्षेत्रातील पिकांना फटका बसला. ११ हजार ५९३ शेतकऱ्यांचे नुकसान झाले. फळबागा१. १९ : अतिवृष्टीचा हेक्टर क्षेत्रातीलफळबागांना खटपा बसला. ही हानी तीन शेतकऱ्यांची झाली.

# थकित मालमत्ता कराचा भरणा करणेसाठी शास्ती अभय योजना कार्यान्वीत

**अकोला** : थकित मालमत्ता धारकांच्या विनंतीनुसार मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये दि. १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधी करीता शास्ती अभय योजना (व्याज माफी योजना) कार्यान्वीत करण्यात आली आहे. या अभय योजने अंतर्गत थकित मालमत्ता कर धारकांनी संपूर्ण थकित कराच्या रकमेचा भरणा एकरकमी केल्यास त्यांना शास्तीच्या रकमेत ७५ टक्के सूट देण्यात येणार आहे. तरी शहरातील सर्व थकित मालमत्ता धारकांनी त्यांचा थकित कराचा भरणा एकरकमी करून या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन मनपा मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.लहाने यांनी केला आहे. अकोला महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी त्यांचा थकित व चालू वर्षातील मालमत्ता कराचा भरणा वेळेवर करून सील, जप्ती व लिलाव सारख्या अप्रीय कार्यवाही टाळून मनपा प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन मनपा उपायुक्त विजय पारतवार यांनी केले आहे.

# युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

■**अकोला,दि ३ (प्रतिनिधी) :**

सिव्हिल लाइन पोलिस स्टेशन हद्दीतील न्यू तापडिया नगरातील रहिवासी साकेत विजय पागृत या युवकाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना मंगळवार, २ सप्टेंबर रोजी घडली आहे.शहरातील न्यू तापडिया नगरातील रहिवासी विजय पागृत त्यांच्या कुटुंबासह रहिवासी आहेत. मृतक युवक साकेत पागृत यांच्या आईने आरडाओरड केल्याचा आवाज आल्यानंतर फिर्यादी यांनी त्यांच्या घरी जाऊन बघितले. तेव्हा त्यांच्या घरात वरच्या हॉलमध्ये सिलिंगच्या लोखंडी कडीला मृतक युवक साकेत हा गळफास घेऊन लटकलेल्या अवस्थेत दिसला. या घटनेची माहिती सिव्हिल लाइन पोलिसांना देण्यात आल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी



धाव घेतली. सदर घटनेचा पंचनामा करून मृतक युवकाचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी सर्वोपचार रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. याप्रकरणी सचिन सुधाकर पागृत (३७) रा. न्यू तापडिया नगर, अकोला यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सिव्हिल लाइन पोलिस स्टेशन येथे मर्गाचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास सिव्हिल लाइन पोलिस करीत आहेत.

# पैसे भरूनही वस्तू व वाहन मिळत नसल्याने नागरीक सापडले कोंडीत

■ **लकी ड्रा च्या माध्यमातून झाली कोट्यावधीची उलाढाल**

■**तेल्हारा,दि ३ (प्रतिनिधी) :**

तेल्हारा शहरात व तालुक्यात सध्या बिनापरवाना लकी ड्रा ला मोठे उधान आले असुन या माध्यमातून नागरीकाची प्रचंड लुट सुरू असल्याचे वास्तव्य तेल्हारा शहरात आहे तर अनेकांनी वाहनाचे वस्तू पैसे भरुनही त्यांना तुमचा नंबर लागला नाही केव्हा लागेल सांगु शकत नाही आणि तुम्हांला तर वाहन लागत असेल तर पूर्ण रक्कम द्यावी लागेल असे म्हणुन नागरीकांची कोडी केल्या जात आहे तेल्हारा शहरात ठिकठिकाणी या लकी ड्रा ला गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर ऊत आला कोणत्याही प्रकारची जीएसटी ची पावती न देता बोगस पावती च्या माध्यमातून अनेकांकडून लकी ड्रा संचालकांनी मोठ्या रक्कमा वसुल केल्या असुन त्या आता कोणत्याही प्रकारची वस्तू व वाहन देण्यात येत नसल्याने यामध्ये मोठी फसवणूक झाल्याचे चित्र आहे.

# खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीस शिताफीने २ तासात अटक

## पिंजर पोलीस व स्थानिक गुन्हे शाखा पथकाची सयुक्तिक कार्यवाही

■**अकोला,दि ३ (प्रतिनिधी) :**

दिनांक २/९/२५ चे रात्री चे दरम्यान ग्राम टीटवा येथील फिर्यादी विनोद रामराव राऊत राहणार टिटवा यांनी पोस्टे पिंजर ला येऊन रिपोर्ट दिला की, त्यांचा भाऊ नामे बबन रामराव राऊत वय ५५ वर्ष यास त्याचा पुतण्या व बबन राऊत यांचा मुलगा आरोपी नवनाथ बबन राऊत वय २७ वर्ष याने दिनांक २/९/२५ चे रात्री १० ते १२.१५ वाजता दरम्यान काठीने मारहाण करून व दोरीने गळ्याला फास आवळून खून केला. व पळून गेला.

अशा आशयाची रिपोर्ट वरून पो स्टे पिंजर येथे गुरनं २३२ / २५ कलम १०३ (१) BNS गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच आरोपी शोध कामी पोस्टे पिंजर चे तीन



वेगवेगळे पथक तयार करून रवाना केले. तसेच स्थागुशा पथकाने सुद्धा शोध सुरु केला, मुलाने वडिलांचा खून करून, आरोपी रात्र भर शेतात लपून बसला होता. पो स्टे पिंजर येथील पथक व स्थागुशा पथकाने कसून शोध घेतला. सकाळी आरोपी शेलू जी. वाशीम येतून संभाजी नगर, पुणे च्या दिशेने जात असताना अटक करण्यात आले. आरोपी कडे मोबाईल नसल्यामुळे शोध घेणे आवाहनात्मक होते.

गोपनीय माहिती चे आधारावर आरोपीस अटक करण्यास यश आले. अवघ्या दोन तासात आरोपी चा शोध घेऊन त्यास अटक करण्यात आली.

## थोडक्यात

### अकोला कारागृहात वृक्षारोपण

**अकोला** : कारागृह ध्वजदिनानिमित्त जिल्हा कारागृहात सोमवारी शिवतेज प्रतिष्ठानच्या सहकार्याने पर्यावरण जनजागृती व वृक्षारोपणाचा कार्यक्रम झाला.कारागृह अधिक्षक दत्तात्रय गावडे, मनोहर इंगळे, तुरूंगाधिकारी विठ्ठल पवार आदी उपस्थित होते. प्रारंभी वृक्षारोपणाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर वृक्ष लागवडीचे महत्व या विषयावर अधिक्षकांचे भाषण झाले. अनुराधाताई इंगळे, वामनराव चौधरी, जसवंतसिंग मल्ली यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### 'नाफेड'च्या खरेदी प्रक्रियेत ई-पीक पाहणी आवश्यक

**अकोला** : केंद्र शासनाने चालू हंगामासाठी निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार राज्य सहकारी पणन महासंघ व एनसीसीएफतर्फे मूग, उडीद, सोयाबीन, तूर आदी कडधान्य व तेलबियांची खरेदी करण्यात येईल. या प्रक्रियेसाठी शेतक-यांकडे ई-पीक पाहणी असलेला सातबारा उतारा आवश्यक आहे, असे जिल्हा पणन अधिकारी एम. जी. काकडे यांनी सांगितले.संपूर्ण खरेदी प्रक्रिया पारदर्शक, कार्यक्षम व संपूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने पार पाडण्यात येईल. केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकरी बांधवांनी आपल्या पिकांची ई-पाहणी शासनाने दिलेल्या कालावधीत पूर्ण करावी,असे आवाहन श्री. काकडे यांनी केले.

### मृतक व्यक्तीची ओळख पटविण्याचे आवाहन !

**अकोला** : बाबुलाल सागर या ५८ वर्षीय व्यक्तीचा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. ३० ऑगस्ट रोजीत्यांचे निधन झाले असून, मृतदेह पीएमसाठी शवगृहात ठेवला आहे. मृतकाची उंची ५ फूट ६ इंच, डोक्याचे केस काळे पांढरे, दाढी वाढलेली. नाक सरळ, बांधा सडपातळ, डाव्या हातावर इंग्रजीत आरए व मराठीत बेवफा सनम असे गोंदवले आहे. बाळापूर फैल जगदंबा मंदिराजवळ खामगाव असा त्यांचा पत्ता असून, या वर्णनाच्या व्यक्तीबाबत अकोला शहरातील सिटी कोतवाली पोलिस स्टेशन पोलिस अंमलदार प्रकाश मांडवगण यांच्याशी ७०५७४३५९३१ क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

### माळेगाव बाजार येथे युवकाची आत्महत्या

तेल्हारा : तालुक्यातील माळेगाव बाजार येथील रहिवाशी यश पांडुरंग पिंपळकार (३१) याने घरी कोणी हजर नसताना घराचे दार बंद करून छताच्या पंख्याला दोरीने गळफास घेऊन आत्म हत्या केली. ही घटना १ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास घडली. फिर्यादी मंगेश रमेश आंबुसकर (४०) रा. भांबेरी यांचा साळा यश पांडुरंग पिंपळकार हा त्याची आई व भावासह माळेगाव बाजार येथे राहत होता.

# डाबकी रोड रेल्वे क्रॉसिंग गेट क्र. ३६ अ वाहतुकीसाठी तात्पुरता बंद

■ **३ सप्टेंबर ते ७ सप्टेंबर दरम्यान रेल्वे रुळ व रस्त्याच्या दुरुस्तीचे काम; वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा अवलंब करावा**

■**अकोला,दि ३ (प्रतिनिधी) :**

डाबकी रोडवरील रेल्वे क्रॉसिंग गेट क्रमांक ३६अ येथील रेल्वे ट्रॅक आणि रस्त्याच्या पृष्ठभागाच्या दुरुस्तीचे काम दिनांक ०३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ९.०० वाजल्यापासून सुरू झाले असून, ते दिनांक ०७ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री ०४.०० वाजेपर्यंत चालणार आहे. या कालावधीत सदर रेल्वे क्रॉसिंगवरील वाहतूक पूर्णतः बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे या मार्गावरून ये-जा करणाऱ्या सर्व वाहनचालक व नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. ही वाहतूकबंदी नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तसेच दुरुस्तीच्या कामाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी अत्यावश्यक आहे. नागरिकांनी सहकार्य करून वाहतुकीच्या नियोजनात बदल करून गैरसोयी टाळाव्यात, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. कृपया संबंधित कालावधीदरम्यान प्रवासाचे नियोजन करताना या सूचना लक्षात घ्याव्यात.

# राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान

## पीक प्रात्यक्षिकांसाठी शेतकरी गटांनी अर्ज करण्याचे आवाहन

■**अकोला,दि ३ (प्रतिनिधी) :**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान- अन्नधान्य पिके व वाणिज्यिक पिके आणि राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया अंतर्गत रब्बी हंगाम २०२५-२६ मध्ये गहू, कडधान्य, पौष्टिक तृणधान्य, ऊस, करडई, मोहरी व सूर्यफुल या पिकांच्या उत्पादकता वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत पोहचविण्यासाठी पीक प्रात्यक्षिकांचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. पिक प्रात्यक्षिकांकरिता कोणत्याही शासकीय यंत्रणेकडे दि. ३१ मार्च, २०२४ पूर्वी नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी व कृषि क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्था यांना लाभ देण्यात येणार आहे. याकरिता गटाने प्राधिकृत केलेल्या सदस्याने महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याची सुविधा दि. ०२.०९.२०२५ पासून उपलब्ध आहे. गटांची निवड प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य (FCFS) या तत्वावर करण्यात येणार आहे. महाडिबीटी पोर्टलवर अर्ज सादर करतांना https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/AgriLogin/AgriLogin या संकेतस्थळावर बियाणे वितरण, प्रात्यक्षिक, फ्लेक्सी घटक, औषधे आणि खते या टाईल अंतर्गत शेतकरी गटांना अर्ज करता येतील. शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार अर्ज करणा-या व लाभ घेणा-या गट सदस्यांचा Farmer खऊ असणे आवश्यक आहे. तरी जास्तीत जास्त शेतकरी गटांनी विविध पिकांच्या पिक प्रात्यक्षिके या घटकासाठी अर्ज करावेत व लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

# ईद-ए-मिलादुन्नबी ५ सप्टेंबर रोजी; मिरवणूक ९ सप्टेंबरला

## गणेश विसर्जनानंतरच मिरवणुकीचा सलोख्याचा निर्णय

■**अकोला,दि ३ (प्रतिनिधी) :**

अकोला शहरात धार्मिक ऐक्य आणि सामाजिक सलोख्याचे जिवंत उदाहरण पुन्हा एकदा घडताना दिसत आहे. येत्या ५ सप्टेंबर रोजी ईद-ए-मिलादुन्नबी असूनही, शहरातील मुस्लिम समाजाने गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर शांतता, संयम आणि सौहार्द जपण्याचा निर्णय घेत यावर्षीची मिलादुन्नबी मिरवणूक ९ सप्टेंबर, मंगळवारी काढण्याचे ठरवले आहे. गणेश विसर्जन मिरवणूक ६ सप्टेंबर, शनिवारी पार पडणार आहे. याच दिवशी परंपरेप्रमाणे मुस्लिम समाज गणेश मंडळांचा ताजनापेठ परिसरात स्वागत व सत्कार करणार आहे.

तर ९ सप्टेंबर रोजी गांधी चौकात मुस्लिम बांधवांच्या मिलादुन्नबी जुलूस कमिटीचा सत्कार गणेशोत्सव मंडळांकडून करण्यात येणार आहे. हे परस्पर सौहार्दाचे एक अद्वितीय उदाहरण ठरणार आहे. या संदर्भात केएमटी हॉल येथे या निर्णयाची घोषणा करण्यात आली. यावेळी आमदार साजिद खान पठाण, हजरत सय्यद जकीमिया नक्शबंदी, हाजी मुदाम खान, ॲड. मोतिसिंह मोहता, ॲड. एस. एस. ठाकूर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मिरवणूक ९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता ताजनगर येथील कच्छी मशिदीपासून पारंपरिक मार्गाने निघणार आहे. गेल्या दोन वर्षांप्रमाणेच यंदाही अकोल्यात धार्मिक समजूतदारी, संयम आणि सामाजिक सलोखा कायम राखण्याचा आदर्श पायंडा पाळला जात आहे.

# मूर्तिजापूरात गणेशोत्सव व ईद उत्सवासाठी उच्चस्तरीय नियोजन बैठक

■ **कर्णकर्कश डीजेवर कडक कारवाईचे संकेत**

■**मुर्तिजापुर,दि ३ (प्रतिनिधी) :**

आगामी गणेशोत्सव व ईद उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक अजित चंडक यांनी आज (२ सप्टेंबर) मूर्तिजापूर येथे उच्चस्तरीय बैठकीचे आयोजन केले. विसर्जन मिरवणुका, वाहतूक व्यवस्था आणि सुरक्षा उपाययोजनांबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.या बैठकीत मूर्तिजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार हरीष पिंपळे, उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार, उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे, तहसीलदार शिल्पा बोबडे, मूर्तिजापूर शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजित जाधव, मूर्तिजापूर ग्रामीण पोलीस ठाण्याचे ठाणेदार श्रीधर गुट्टे,




बार्शीटाकळी पोलीस स्टेशनचे ठाणेदार धुमाळ, माना पोलीस स्टेशनचे ठाणेदार गणेश नावकार, बोरगाव मंजू पोलीस स्टेशनचे ठाणेदार अनिल गोपाळ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता नवलकर, वीज वितरण विभागाचे अभियंता कदम, तसेच नगरपालिकेचे आरोग्य अधिकारी विजय लकडे यांचा समावेश होता.बैठकीदरम्यान जिल्हा पोलीस अधीक्षकांनी कर्णकर्कश आवाज करणाऱ्या डीजेंविषयी नागरिकांकडून वारंवार तक्रारी प्राप्त होत असल्याची नोंद घेत डीजेवर कडक कारवाईचे स्पष्ट संकेत दिले. गोंगाट करणारे, ध्वनीप्रदूषण करणारे डीजे परवानगीशिवाय वाजवणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई होणार असल्याचा इशाराही देण्यात आला.त्याचबरोबर, जिल्हा पोलीस अधीक्षक अजित चंडक यांनी सुरक्षा, वाहतूक नियंत्रण, विसर्जन मार्गांची आखणी, संवेदनशील भागात गस्त व्यवस्था, तसेच पोलीस बंदोबस्त वाढविण्याबाबत स्पष्ट निर्देश दिले.

# सामाजिक सौहार्दाच्या परंपरेची पताका देवेंद्र फडणवीस यांनी उंचावली!

■ **मराठा समाजाला आरक्षण दिल्याबद्दल भाजपाकडून मुख्यमंत्री यांचे अभिनंदन**

■**अकोला,दि ३ (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्राच्या सामाजिक सौहार्दाची वीण कोठेही न उसवता मराठा समाजाला हैदराबाद गॅझेटमधील नौंदींच्या आधारे आरक्षणाचा लाभ देण्याचा निर्णय घेऊन दीर्घकाळ प्रलंबित असलेला प्रश्न सोडवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऐतिहासिक कामगिरीची बजावली, अशा शब्दांत भाजपाचे श्री किल्ल्याचे पालकमंत्री एडवोकेट आकाश फुंडकर आमदार रणधीर सावरकर खासदार अनुप धोत्रे आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार हरीश पिंपळे आमदार वसंत खंडेलवाल संतोष शिवरकर जयंत मसने किशोर पाटील,विजय अग्रवाल,यांनी मराठा आरक्षणाचा तिढा सोडविल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले. आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे व मराठा समाजातील असंख्य कार्यकर्त्यांनी या प्रश्नावरील तोडग्यासाठी सहकार्याची व सामंजस्याची भूमिका घेऊन महाराष्ट्राच्या सामाजिक परंपरेची प्रतिष्ठा उंचावल्याने, आंदोलनकर्ता मराठा समाजही अभिनंदनास पात्र आहे, असे ते म्हणाले.

श्री जिल्ह्याचे पालकमंत्री ॲडव्होकेट आकाश कुंडकर खासदार अनुप धोत्रे आमदार रणधीर सावरकर आमदार प्रकाश भारसाकले, आमदार हरीश पिंपळे आमदार वसंत खंडेलवाल संतोष शिवरकर जयंत मसने विजय अग्रवाल किशोर पाटील, यांनी सांगितले की , परंपरागत कुणबी अशी हैदराबाद गॅझेटमध्ये नोंद असलेल्या मराठा समाजातील कुटुंबांना आरक्षणाचे लाभ देण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे ओबीसी समाजाच्या आरक्षणास धक्का न लावता व त्यांच्यावर अन्याय न करता मराठा समाजातील पात्र कुटुंबांना न्याय देण्याचा तोडगा काढून मुख्यमंत्र्यांनी आरक्षणाची मागणी मान्य केल्याने राज्याच्या सामाजिक न्यायाचे तत्व अधिक उजळले आहे.

कुणबी म्हणून मान्यता मिळवून आरक्षणाचे लाभ घेऊ इच्छिणाऱ्या मराठा समाजातील कुटुंबांची पात्रता निश्चित करण्यासाठी महत्वपूर्ण नोंदी असलेल्या हैदराबाद गॅझेटियरचा आधार घेतला जाणार असल्याने, पात्रतेचे निकष आणि आरक्षणाच्या धोरणाची अंमलबजावणी पारदर्शक होणार असून हा प्रश्न सकारात्मक व सन्मानजनक रीतीने सोडवून मुख्यमंत्र्यांनी सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले आहे. महाराष्ट्राची सामाजिक न्यायाची पताका देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या कर्तृत्वाने अधिक उंचावली आहे, असे गौरवोद्गारही त्यांनी काढले. कोणत्याही नागरिकावर अन्याय होऊ नये, प्रत्येकास न्याय मिळावा या घटनेने बहाल केलेल्या हक्काचे मुख्यमंत्र्यांच्या या निर्णया मुळे संरक्षण झाले आहे.

अशा शब्दांत श्री जिल्ह्याचे पालकमंत्री एडवोकेट आमदार नामदार एडवोकेट आकाश फुंडकर खासदार अनुप धोत्रे आमदार रणधीर सावरकर आमदार प्रकाश भारसाकळे आमदार हरीश पिंपळे आमदार वसंत खंडेलवाल संतोष शिवरकर जयंत मसने विजय अग्रवाल किशोर पाटील यांनी या निर्णयाबद्दल समाधान व्यक्त केले. ही भूमिका समजून घेत संवेदनशीलता दाखविली हा आंदोलकांच्या संवेदनशीलतेचा पुरावा आहे, असे सांगून त्यांनी मराठा समाजाचेही अभिनंदन केले. या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी राज्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीने महत्वाची भूमिका बजावली, आणि महायुती सरकारमधील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी या प्रश्नावर सामोपचाराने तोडगा काढण्यासाठी सकारात्मक भूमिका घेतली.

# मोकाट जनावरे, कुत्रे नगरपालिकेत सोडणार

**तेल्हारा :** शहरातील मुख्य रस्त्यावर मोठ्या संख्येने मोकाट जनावरे, कुत्रे यांचा मुक्त संचार आहे. जनावरे रस्त्याच्या मधेच बसलेले असतात. त्यामुळे रहदारीस त्रास होत आहे. शाळेकरी लहान मुले यांच्या अंगावर मोकाट जनावरे, कुत्रे धावून येतात. त्यामुळे एखादी जीवित हानी होण्याची शकयता नाकारता येत नाही.

याबाबत नगरपालिकेला वारंवार विनंती, तक्रारी करूनही दखल घेत नसल्यामुळे तेल्हारा शहर युवा सेनेच्यावतीने मुख्याधिकाऱ्यांना २ सप्टेंबरला निवेदन देऊन तीन दिवसांच्या आत मोकाट जनावरे व कुत्र्यांचा बंदोबस्त न झाल्यास त्यांना मुख्याधिकारांच्या दालनात सोडण्यात येईल, असा इशारा दिला आहे. सध्या सण, उत्सव व १ गणेशोत्सव सुरु आहे. यातच मोकाट जनवारांचा एखादा गणपती मंडपाला धक्का लागून विटंबना होऊ शकते. त्यामुळे सामाजिक, धार्मिक तेढ निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत सर्व गणेश उत्सव मंडळातील पदाधिकाऱ्यांनी तोंडी तक्रार शांतता समिती सभेमध्ये केली होती. पण त्यावर कुठलीही कारवाई करण्यात आली नाही. नगर परिषद प्रशानाला वारंवार तक्रारी करूनसुद्धा कुठलीही कार्यवाही करण्यात आली नाही. या अनुषंगाने युवासेना तेल्हारा शहरच्यावतीने २ सप्टेंबरपासून ३ दिवसांचा अल्टिमेट नगर परिषद प्रशासनाला देण्यात आला असून त्यानंतर मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात मोकाट जनावरे सोडून आंदोलन करण्यात येणार आहे.

# महासागर अकोला

•गुरुवार,दि.४ सप्टेंबर २०२५




## थकित पाणी पट्टी कराचा भरणा न केल्यास नळ जोडणी खंडीत करण्यात येणार

■अकोला,दि ३ (प्रतिनिधी) : अकोला महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नळ जोडणी धारकांना मनपा प्रशासनाव्दारा कळिवण्यात येत आहे कि, अकोला शहरातील नळ जोडणी धारकांकडून पाणी पट्टी कराचा भरणा करण्यासाठी मनपा प्रशासनास योग्य ते सहकार्य मिळत असून शहरातील काही नळ धारकांकडून यासाठी योग्य सहकार्य मिळत नसल्याने मनपा क्षेत्रातील ज्या घरगुती नळ धारकाकडे रूपये ५ हजार पेक्षा जास्त



थकबाकी आहे तसेच ज्या वाणिज्य नळ धारकाकडे रूपये १० हजार पेक्षा जास्त थकबाकी आहे अशा सर्व थकबाकी नळ जोडणी धारकांनी पाणी पट्टी कराचा भरणा तातडीने करावा अन्यथा थकबाकी नळ धारकांची नळ जोडणी मनपा प्रशासनाव्दारा खंडीत करण्यात येणार असल्याची कारवाई करण्यात येणार आहे. कृपया याची संबंधीत नळ जोडणी धारकांनी नोंद घेऊन थकित पाणी पट्टी कराचा भरणा तातडीने करून मनपा प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन मनपा जलप्रदाय विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी केले आहे.



सिध्दी विनायक गणेशोत्सव मंडळ पक्की खोली



लाल सोंडेचा राजा पेन्शन कॉलनी सिंधी कॅम्प



सिंधी कॅम्प गणेशोत्सव मंडळ



चिंतामणी गणेशोत्सव मंडळ, सिंधी कॅम्प



चिंतामणी गणेशोत्सव मंडळ, जवाहर नगर



युवा क्रांती गणेशोत्सव मंडळ शास्त्री नगर

## मनपा आयुक्त डॉ.लहाने यांनी केली गांधी चौक चौपाटीची अकस्मात पाहणी



■अकोला,दि ३ (प्रतिनिधी) : अकोला महानगरपालिका प्रशासन आणि पोलीस प्रशासनाद्वारा गांधी चौक आणि चौपाटीवरील अतिक्रमीत किरकोळ व्यावसायिकांना (हॉकर्स यांना) खुले नाट्य गृहा जवळील मनपाच्या हॉकर्स झोन येथे स्थलांतरीत केले असून गांधी चौक चौपाटीवरील खाद्य पदार्थ विक्रीच्या दुकानदारांनी दुकानाच्या बाहेर अतिक्रमण केले होते. त्या अनुषंगाने आज दि. २ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनिल लहाने यांच्याद्वारे गांधी चौक चौपाटीची अकस्मात पाहणी करण्यात आली.

या वेळी ज्या दुकानदारांनी दुकानाच्या बाहेर अतिक्रमणे केले होते त्यांना सदरचे अतिक्रमणे आज रात्री पर्यंत स्वत:हून काढण्याकरिता ताकीद दिली, तसेच उद्या याठिकाणी अतिक्रमणे आढळल्यास ते जेसीबी मशीनव्दारेनिष्कासीत करण्यात येणार असल्याबाबत सांगितले तसेच या पाहणी दरम्यान राधिका दही भल्ला या दुकानावर प्रतिबंधीत प्लास्टीक कोटेड ड्रोनचा वापर करतांना आढळून आल्यावर त्यांचेवर ५हजार रूपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली. यावेळी विठ्ठल सहा. आयुक्त देवकते, विधी अधिकारी शाम ठाकुर, आयुक्त यांचे स्विय्य सहकायक जितेंद्र तिवारी, स्वच्छता विभाग प्रमुख संजय खोसे, सहा.अतिक्रमण निर्मुलन अधिकारी प्रवीण मिश्रा, चंद्रशेखर इंगळे, संतोष नायडू, वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक रौशन अली, स्वच्छता निरीक्षक मो. अलीम, प्रवीण खांबोरकर आदींची उपस्थिती होती.

## आज जिल्हास्तरीय कार्यशाळा मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

■अकोला : जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागामार्फत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान विषयी दि. ४ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री तथा मंत्री श्री. आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली ही कार्यशाळा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे पार पडणार आहे. यामध्ये खासदार श्री. अनुप धोत्रे, यांचेसह जिल्ह्यातील सर्व आमदार सहभागी होऊन मार्गदर्शन करणार आहेत. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणी संदर्भात जिल्ह्यातील जिल्हा परिषदेचे कर्मचारी म अधिकारी, सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी यांना या कार्यशाळेच्या माध्यमातून माहिती देण्यासाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

## हवामान खात्याचा सतर्कतेचा इशारा

**अकोला :** जिल्ह्यात आजपासून ५ सप्टेंबरपर्यंत पावसाचे सत्र सुरू राहणार असल्याचा अंदाज नागपूर प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवला आहे. मागील काही दिवसांपासून झालेल्या पावसामुळे नदी, नाले व तळ्यातील पाणीपातळीत वाढ झाली आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्यात अनावश्यकपणे शिरण्याचे धाडस करू नये, असे प्रशासनाकडून आवाहन करण्यात आले आहे. पावसामुळे पूर असताना पुलावरून वाहनचालकांनी वाहने नेण्याचे टाळावे, तर पाणीसाठ्याजवळ सेल्फी काढण्याचा मोह आवरावा, असा इशारा देण्यात आला आहे. वीज चमकल्यास किंवा मुसळधार पाऊस आल्यास झाडाखाली आश्रय न घेता सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा.

## गणेश दर्शन



■सार्वजनिक गणेश उत्सव साहित्य सम्राट ग्रुप, पार



■श्री राम प्रतिष्ठान मंडळ, चंद्रशेखर आजाद चौक,मुर्तिजापुर



■जय मल्हारा गणेश उत्वस मंडळ दहिगाव गावंडे



■श्री सनातन सत् धारण बाल गणेश मंडळ,हिरपूर

## अडसुळ येथील बचाव पथकाला किट साहित्य वाटप



■तेल्हारा,दि ३ (प्रतिनिधी) : जिल्हाधिकारी कार्यलय अकोला आपती व्यवस्थापक याचा मार्फत तेल्हारा तालुक्यातील आडसूळ येथील बचाव पथक टीम यांना तहसीलदार साहेब तेल्हारा याचा हस्ते सर्व टीम ला बचाव कार्य किट व प्रमाणपत्र वाटप करण्यात आले .यां वेळी तहसीलदार समाधान सोनोवने मंडळ अधिकारी प्रकाश झाडोकर ग्राम महसूल अधिकारी गणेश डोंगरे पथक प्रमुख सदानंद नाणे विजय तायडे मंगेश नांने राजेश अमझरे राम भाऊ भांगे संदीप परिशे श्रीकृष्ण वानखडे रवींद्र नांने यांना प्रमाण पत्र व बचाव किट साहित्य वाटप यामधे बचाव जॅकेट,मेडिसिन बॉक्स,टॉर्च,गणबुट,जेलमेंट लाईटर,मच्छर दाणी,टुर बॅग,टीशर्ट,ईत्यादी साहीत्य वाटप करण्यात आले.

## मराठा समाजाच्या वतीने तेल्हाऱ्यात जल्लोष ढोल ताशा सह केले स्वागत

■अकोला,दि ३ (प्रतिनिधी) : मराठा समाजाच्या वतीने तेल्हार्यात जल्लोष ढोल ताशा सह केले स्वागत. तेल्हारा तेल्हारा स्थानिक टॉवर चौकात मराठा समाजाच्या वतीने मराठा समाजाला न्याय मिळाल्याने टॉवर चौकात ढोल ताशा सह फटाके वाजवून आनंद व्यक्त करण्यात आला.

मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी आझाद मैदान मुंबई येथे आमरण उपोषणाला बसले होते त्यात सरकारने मराठा समाजाला त्वरित कुणबी प्रमाणपत्र देणार वबाकिचे मागणि मंजूर करून जि आर सुद्धा दिल्याने तेल्हारा तालुक्यातील व शहरातील मराठा समाजाने टॉवर चौकात ढोल ताशा सह फटाके फोडून आनंद व्यक्त केला



यावेळी मराठा समाजाचे जेष्ठ नेते डॉ अशोकराव बिहाडे यांनी शिवाजी महाराज पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले यावेळी विजय देशमुख बाजार समिती चे उपसभापती हरिदास वाघ प्रशांत देशमुख राजेश पाटील खारोडे अरविंद तिव्हाने सदानंद खारोडे सत्यशिल सावरकर अनुप मार्के विवेक खारोडे अजय गावंडे चंद्रकांत मोरे हेमंत अवचार चेतन नराजे अनंतराव सोनमाळे भैय्या खारोडे सुधाकर गावंडे रवि देशमुख रविन्द्र ढाकरे पिटुं पाथ्रिकर अतुल देशमुख गौरव अरबट मोहन वरणकार बंडु नेमाडे विक्कि खुमकर सह तालुक्यातील मराठा समाजातील युवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते यावेळी जल्लोष साजरा करताना कोणत्याही प्रकारचि अनुचित प्रकार घडू नये यासाठी तेल्हारा पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

तळेगाव बाजार येथे जल्लोष साजरा. तालुक्यातील तळेगाव बाजार येथे मराठा समाजाला आरक्षण मिळाल्याने तळेगाव बाजार येथील शिवाजी चौकात फटाके वाजवून आनंद व्यक्त केला.

### पातूर येथे गणपती समोर साकारला ३०० वी जयंती निमित्त

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जिवण देखावा

पातूर येथील स्व.विनायक राखोंडे प्रतिष्ठाण,पातूर व्दारा संचालित स्व.विनायक राखोंडे स्मृती गणेशोत्सव मंडळ,कान्होबा चौक,पातूर व राखोंडे परिवारांनी आपल्या गणपती समोर साकारला लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी त्रिशताब्दी जयंती निमित्य त्यांच्या जीवनकार्या वरील देखावा साकारला आहे. यामधून नवपिढीला त्यांची माहिती होण्याकरिता लेखी जिवणपट लाऊन सदर देखावा साकारला आहे तसेच देखाव्या समोर महाराष्ट्र राज्यामधील आणि अकोला जिल्ह्यातील व पातूर शहरातील आणि तालुक्यातील काही ऐतिहासिक वैभव असलेले गडकिल्ले व प्राचीन, धार्मिक व पर्यटन स्थळाची तसेच जुन्या पैशांची व नाण्यांची दुमिर्ळ वस्तूंची प्रदर्शनी आणि संगीत साहित्याची माहिती व फोटो चित्र प्रदर्शनी लावण्यात आली आहे.

ऑपरेशन सिंदुर विर सैनिकांना सलाम आणि शहिदांना अभिवादन करणारा देखावा सुद्धा साकारला आहे त्याच बरोबर शासनाच्या विविध विभागाच्या योजनांची व अभियानाची माहिती देखाव्या समोर लावण्यात आली आहे. तसेच मंडळाचे यंदाचे २७ वे वर्ष असून गेल्या २६ वर्षा पासून मंडळाचे संस्थापक स्व.नामदेवराव मो.राखोंडे (गुरुजी) यांनी पातूर शहरात धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक संदेश देणारे देखावे साकारले असून त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना व मंडळाला महाराष्ट्र शासनाचा तालुका व जिल्हास्तरीय गणेशोत्सव सजावट पुरस्कार २०१६ व महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ पुरस्कारा अंतर्गत उत्कृष्ट जिल्हास्तरीय




गणेशोत्सव मंडळ पुरस्कार २०२४ ने सन्मानित केले आहे आणि त्यांची ही परंपरा त्यांनी स्थापन केलेले मंडळ व त्यांची मुले सागर राखोंडे व विशाल राखोंडे यांनी कायम ठेवली आहे. आणि गणेशोत्सवा मध्ये गेल्या १५ वर्षां पासून साने गुरुजी कला व सांस्कृतिक क्रीडा बहु.मंडळ, पातुर व प्रतिष्ठाण आणि गणेशोत्सव मंडळाव्दारे १० दिवस वेगवेगळे उपक्रम राबवत असून त्यामध्ये विद्यार्थी, युवक व महिलांकरिता चित्र रंगभरण, निबंध, रांगोळी, हस्तकला आणि पर्यावरण पूरक गणपती मुर्ती निर्मिती कार्याशाळा व इत्यादी विविध स्पर्धेचे उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते तसेच महाराष्ट्राची लोकधारा यामध्ये पारंपारिक लोककला व भजन, प्रबोधन तसेच लोकपावत चालेली कला व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन सुरु आहेत तसेच चित्रप्रदर्शनी व्दारे व्यसनमुक्ती, स्वच्छता अभियान, सबसे बडा धन बेटी और वन, वृक्षारोपण, माझी वसुंधरा अभियानातील पृथ्वी जल,वायु,अग्नी व आकाश या पंचतत्वाचे संवर्धना बाबत माहिती फलक लाऊन जनजागृती करत आहे. त्याच प्रमाणे सिंगल युज प्लास्टिक बंदी अभियानात सहभागी होत मंडळाच्या वतीने वृक्ष व कापडी पिशवी मोफत वाटप करत आहे व झिरो बजेट आणि वृक्ष निर्मिती बाबत व मतदान व मतदार जनजागृती व सामाजिक संदेश देण्यासाठी महाराष्ट्राची लोककला वासुदेव, गोंधळ,पोतराज,पोवाडा,भारुड, गौधळी,गाडगे बाबा, वृक्ष मित्र, कचरासुर आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांची विविधे वेशभुषा करुन नागरिकांना माहिती देत आहे. सदर देखावा हा त्यांनी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० वी शतकोत्तर सुवर्ण जयंती व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी त्रिशताब्दी जयंती निमित्य त्यांना अभिवाद करण्याकरिता देखावा सादर केला आहे.

## निधन वार्ता

### साहेबरावजी नारे



**अकोला :** प्रभात चैरिटेबल सोसायटी चे अध्यक्ष आणि डॉ गजानन नारे यांचे वडील स्व. साहेबरावजी नारे यांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या अंतिम इच्छे नुसार त्यांचे देहदान शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे दुपारी बारा वाजता करण्यात आले.

### श्रीकृष्ण कवडे

**अकोला :** शहरातील ज्येष्ठ समाजसेवक व अकोला जनता बँकेचे सेवानिवृत्त कर्मचारी श्रीकृष्ण पांडुरंग कवडे यांचे रविवारी सकाळी राहत्याघरी निधन झाले. ते माजी नगराध्यक्ष स्व. पांडुरंग कवडे यांचे चिरंजीवतसेच शहर कॉंग्रेस कमिटीचे नेते आकाश कवडे यांचे वडील होत.


RNINO-46973/1986 **महासागर अकोला** मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# फायनल फाइट... लढा यशस्वी?

मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी गेल्या अनेक वर्षांपासून लढा सुरू होता. मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण करत या लढ्याला वेगळे वळण दिले. या पूर्वी देखील मनोज जरांगे यांनी अनेकवेळा आंदोलन केले, मोर्चे काढले होते. मात्र, आरक्षण काही मिळत नव्हते. अखेर आता शेवटची लढाई म्हणत मनोज जरांगे यांनी २७ ऑगस्ट रोजी त्यांनी हजारो समर्थकांसह मुंबईच्या दिशेने कूच करण्यास सुरुवात केली.

---

मनोज जरांगे यांनी मुंबईची वाट धरली आणि टप्प्या-टप्प्यावर हजारोंच्या संख्येने असलेले मराठा बांधव लाखोंच्या संख्येत वाढत गेले. मुंबईमध्ये दाखल होण्यापूर्वी मनोज जरांगे यांनी शिवसेनरीला भेट दिली. महायुती सरकारकडून मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी हालचाली तोपर्यंत वाढल्या होत्या आणि त्यानुसार मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष बनवले आणि मंत्र्यांच्या बैठकांना सुरुवात झाली.

### जरांगे मुंबईत धडकले

मनोज जरांगे यांनी मुंबईत आंदोलन करू नये म्हणून अनेकांनी प्रयत्न केले. त्यात वकील गुणरत्न सदावर्ते यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका देखील दाखल केली होती. त्यानुसार मुंबईच्या दिशेने असतानाच मुंबई उच्च न्यायालयाने मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणाला परवानगी नाकारली.

असा निर्णय आलेला असताना देखील मनोज जरांगे यांची मुंबईच्या दिशेने कूच सुरूच राहिली. त्यानंतर मुंबई पोलिसांनी मराठा आंदोलकांसाठी मुंबईत येण्यासाठी एक रस्ता निश्चित केला. आणि अखेर २९ ऑगस्ट रोजी मनोज जरांगे मुंबईच्या आझाद मैदानात पोहोचले. यावेळी संपूर्ण राज्यातून मराठा समाज हा मुंबईत दाखल झाला होता.

### मुंबईत जिकडे तिकडे मराठेच

आंदोलनाला सुरुवात झाली आणि मुंबईत सगळीकडे मराठा बांधवांची गर्दी पाहायला मिळाली. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकावर मराठ्यांनी ठाण मांडला. आझाद मैदान देखील मराठा बांधवांनी भरून गेले. उपोषणाला बसल्यावर मनोज जरांगे यांनी सर्व आंदोलकांना शांतता राखण्याचे आवाहन केले तसेच यावेळी भाषणात त्यांनी महायुती सरकारवर विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला.

### एकतर विजयी यात्रा नाहीतर अंत्ययात्रा..

मनोज जरांगे यांनी उपोषणाला सुरुवात केली आणि दुस ऱ्या दिवशी त्यांची प्रकृती थोडी खालावली. तसेच मराठा आंदोलकांची मुंबईत गैरसोय होत असल्याचे त्यांना समजले व त्यांनी सायंकाळी भाषण करताना मराठा बांधवांना त्रास देऊ नका तसेच अन्न-पाण्याची सोय करण्यात यावी अशी सरकारकडे विनंती केली.

त्यानंतर राज्यभरातून गावागावातून मुंबईतील मराठा आंदोलकांसाठी जेवण पाठवण्यास सुरुवात झाली. तसेच सरकारकडून केवळ बैठकाच सुरू असल्याने मनोज जरांगे यांनी भाषणात महायुतीवर टीका केली. आता ही शेवटची लढाई आहे, आता एकत्र आपली विजयी यात्रा निघेल, नाहीतर माझी अंत्ययात्रा निघेल, असा निर्धारच मनोज जरांगे यांनी बोलून दाखवला.

### उच्च न्यायालयाने घेतली कठोर भूमिका

मुंबई उच्च न्यायालयाने मनोज जरांगे यांच्या नेतृत्वात सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या मुद्यावर अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. कोटार्ने आज दुपारी या प्रकरणी झालेल्या संक्षिप्त सुनावणीत मुंबईत जे काही सुरू आहे ते पूर्णतः बेकायदा सुरू असल्याचे स्पष्ट केले. राज्य सरकारने दुपारी ४ वाजेपर्यंत सर्वकाही सुरळीत केले नाही, तर कोर्ट या प्रकरणी अत्यंत कठोर भूमिका घेईल, असे कोर्टाने म्हटले होते.

उच्च न्यायालयाने मराठा आंदोलकांनी नियम मोडल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. आंदोलकांना केवळ आझाद मैदानात आंदोलन करण्याची परवानगी होती, मात्र त्यांनी या नियमाचे उल्लंघन केले, असे न्यायालयाने नमूद केले. तसेच तुम्ही अजूनही आझाद मैदान व आसपासचा परिसर रिक्त का करू शकला नाहीत? आंदोलकांना तिथून हटवण्यासाठी तुम्हाला जरांगे यांचीच मदत का घ्यावी लागतेय? असे प्रश्न उपस्थित करत उच्च न्यायालयाने राज्य सरकारलाही खडेबोल सुनावले. यानंतर सुनावणी दुपारी ३ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आली होती.



### विखे पाटील आझाद मैदानात

मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी सुरू असतानाच इकडे सरकारच्यावतीने शिष्टमंडळ मसुदा घेऊन मनोज जरांगे यांना दाखवण्यासाठी निघाले. उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री शिवेंद्रराजे भोसले तसेच मंत्री उदय सामंत यांनी मनोज जरांगे यांची भेट घेत त्यांना मसुदा दाखवला.

यावेळी मनोज जरांगे यांनी त्यांच्या वकिलांच्या टीमच्या मार्फत मसुदा वाचन केले. त्यानंतर फक्त मसुदा नको तर जीआर पाहिजे, अशी मागणी केली. त्यानुसार राधाकृष्ण विखे पाटलांनी एक तासात जीआर येणार असे आश्वासन दिले.

राधाकृष्ण विखे पाटील यांनी यावेळी सगेसोयरेच्या अध्यादेशावर ८ लाख हरकती आल्याचे जरांगे यांना सांगितले. यावेळी मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी जरांगेंना सातारा गॅझेट लागू करण्याची ग्वाही दिली. त्यानंतर जरांगेंनी यासाठी सरकारला १ महिन्याचा वेळ देण्याची तयारी दर्शवली.

### हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा निर्णय

मंत्री विखे पाटील यांनी यावेळी मनोज जरांगे यांना सरकारने हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती दिली. जरांगे याविषयी बोलताना सांगितले, सरकारने हैदराबाद गॅझेटियरची अंमलबजावणी करण्यास मान्यता दिली आहे.

सातारा संस्थानच्या गॅझेटियरमध्ये पश्चिम महाराष्ट्र संपूर्ण बसतो. सातारा गॅझेटियर तथा पुणे व औंध गॅझेटियरची अंमलबजावणी करण्याच्या मुद्यावर कायदेशीर बाबी तपासून जलदगतीने निर्णय घेण्यात येईल असे सरकारने सांगितले आहे. या प्रकरणी २-३ मुद्यांवर कायदेशीर त्रुटी आहेत. पण सरकारने त्यावरही १५ दिवसांत योग्य ती कारवाई करण्याची ग्वाही दिली आहे.

### सरकारला २ महिन्यांची मुदत

मनोज जरांगे यांनी यावेळी मराठा व कुणबी एकच असल्याच्या मुद्यावर सरकारला २ महिन्यांची मुदत देण्याची घोषणा केली. ते म्हणाले, आम्ही सरकारकडे ५८ लाख नोंदींच्या आधारावर मराठा व कुणबी एकच असल्याचा जीआर काढण्याची मागणी केली होती.

त्यावर सरकारने हा मुद्दा क्लिष्ट असल्यामुळे त्यावर निर्णय घेण्यासाठी महिन्याभराची मुदत मागितली होती. मी त्यांना दीड महिन्यांची मुदत दिली. पण विखे पाटलांचा हात थोड जड आहे. त्यांनी २ महिन्यांचा वेळ मागितला. त्यानुसार आम्ही त्यांना ही मुदत दिली. या मुदतीनंतर मराठा व कुणबी एकच असल्याचा जीआर काढला जाईल.

### जीआर की राजकीय खेळी?

मराठा आरक्षणावरून राज्यात पुन्हा राजकीय चक्रावणं सुरू झालंय. सरकारने मनोज जरांगे यांच्या मागणीनुसार हैदराबाद गॅझेट अंमलबजावणीचा जीआर काढला. त्याचबरोबर आंदोलकांवरील गुन्हे मागे घेणे, मृतांच्या कुटुंबीयांना मदत व नोकरी यांसारख्या घोषणा करण्यात आल्या. पण हा जीआर खरंच मराठा समाजाला दिलासा देणारा आहे का, यावर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

मराठा आरक्षणासाठी न्यायालयीन लढा देणारे आणि आंदोलक नेते विनोद पाटील यांनी थेट सरकारला आणि उपसमिती अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांना आव्हान दिलं आहे. हा जीआर समाजाला टाचणीएवढाही फायदा देणार नाही. छाती ठोकून सांगतो, यातून एकाचंही सर्टिफिकेट निघणार नाही. विखेंनी पत्रकार परिषद घेऊन याचा अर्थ स्पष्ट करावा, असा त्यांचा टोला.

विनोद पाटील इथवरच थांबले नाहीत. त्यांनी सरकारच्या या निर्णयाला थेट १०० पैकी मायनस झिरो मार्कद्ध दिले. शिंदे सरकारने गेल्यावेळी गुलाल खेळला, त्याचं उत्तर आजवर मिळालं नाही. आता विखेंनी गुलाल खेळला आहे, त्यांनी तरी उत्तर द्यावं, असं ते म्हणाले.

मनोज जरांगे यांची मुंबईवरची धडक, आंदोलकांच्या गर्दीमुळे मुंबईची झालेली तुंबई आणि त्यातच सरकारची झालेली गोची पाहता यातून सूटका करण्यासाठी राज्य सरकारने तडकाफडकी काही जीआर काढले खरे. परंतु, कायद्याच्या कसोटीत ते टिकणार का? मराठा समाजात अपेक्षेचं वातावरण असताना या नव्या घडामोडींनी गोंधळ उडवला आहे. सरकारची ही घोषणा केवळ राजकीय खेळी आहे का, की खरंच यातून आरक्षणाचा मार्ग सुटेल? विखेंचं उत्तर आता सर्वांच्या प्रतीक्षेत आहे.

# ओबीसींच्या हक्कांची खरी लढाई आता सुरु

कुणबी आरक्षणाची आकस्मिक वापर होऊ लागले आहे. मराठ्यांना ओबीसी आरक्षण मिळवून देण्याची ही प्रक्रिया अस्वीकार्य आहे. त्यामुळे कुणबींच्या आरक्षणावर अतिक्रमण होऊ शकते. मनोज जरांगे यांचे उपोषण संपले आणि सरकारने हैदराबाद गॅझेटियरनुसार कुणबी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेतला पण केवळ व्यक्तिगत तपासणीनंतरच लाभ मिळेल. सरसकट आरक्षणाची मागणी मान्य होणार नाही.



अरूण सोपानराव कराळे
दत्तवाडी, नागपूर.
९०९६३२६२७२

ओबीसी आरक्षणात मराठ्यांचा प्रवेश होणार असल्यामुळे कुणबी समुदायाला संभाव्य नुकसान सोसावे लागणार आहे. यामुळे ओबीसी आरक्षणात मराठ्यांची प्रवेश प्रक्रिया आणि प्रमाणपत्र प्रणाली वाढण्याची आशंका, आणि ओबीसी संघटनांचा ठाम विरोध, आंदोलन सुरूच राहणार आहे.

ओबीसी समाज हा देशातील सर्वात मोठा घटक असूनही त्यांच्यावर सातत्याने अन्याय होत आला आहे. राजकीय नेते, संघटना आणि माध्यमे याबाबत मौन धारण करून राहतात, तर काही जण मुद्दाम गोंधळ निर्माण करून समाजाचे लक्ष भरकटवतात. म्हणूनच आज ओबीसींच्या हक्कांसाठी स्पष्ट भूमिका घेण्याची आणि एकत्रितपणे लढण्याची गरज आहे.

### आंदोलनाचे मुख्य मुद्दे

ओबीसींवर होणारा अन्याय उघड करण्यासाठी आणि समाजाला जागृत करण्यासाठी काही ठोस प्रश्नांवर आंदोलन तीव्र झाले पाहिजे, जसे...
सरकारी नोकरभरतीतील अन्याय
सरकारी उपक्रमांचे खाजगीकरण
जातनिहाय जनगणना
लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण
आरक्षणावरील ५० टक्के मर्यादा हटविणे
शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विषमता दूर करणे

### मंडल ते कमंडल

मंडल आयोगाचा अहवाल ( १९८० ) हा ओबीसींच्या सक्षमीकरणाचा ऐतिहासिक दस्तऐवज होता. पण १९९० मध्ये जेव्हा व्ही.पी. सिंग यांनी मंडल आयोगाची शिफारस अंमलात आणली, तेव्हा देशभरात विषारी प्रचार करण्यात आला.

माध्यमांनीही ओबीसी समाजात गैरसमज निर्माण केला. मंडलच्या प्रभावाला तोडण्यासाठीच त्याच काळात कमंडल यात्रा उभी करण्यात आली, हे आजही विसरून चालणार नाही.

### सध्याचे वास्तव

आज मोठ्या प्रमाणावर सरकारी नोकर भरती थांबवली जात आहे.

खाजगीकरणामुळे आरक्षणाला मारक परिस्थिती तयार केली जात आहे. विद्यार्थ्यांना पूर्ण शिष्यवृत्ती न देता अर्धवट शिष्यवृत्ती देऊन त्यांच्या प्रगतीत अडथळे घातले जात आहेत. नॉट फार सुटेबल या नावाखाली आरक्षणाची गळचेपी केली जात आहे.

रोहिणी आयोगाने ओबीसींना मिळणारे २७ टक्के आरक्षण तीन गटात विभागण्याची शिफारस केली आहे. हा प्रस्ताव समाजाच्या एकतेला बाधक ठरू शकतो.

दुसरीकडे बिहारने जातनिहाय जनगणना करून लोकसंख्येनुसार आरक्षण दिले, तर दक्षिण भारतातील राज्यांनी ५० टक्केची मर्यादा केव्हाच ओलांडून ती नवव्या अनुसूचीत टाकली. महाराष्ट्रात मात्र समाज या गोष्टींपासून अनभिज्ञ आहे.

### मुख्य प्रश्न कोणता?

मराठा समाजाचा ओबीसी आरक्षणात समावेश शक्य नाही. त्यामुळे समाजाला भुलवण्याऐवजी जातनिहाय जनगणना आणि ५० टक्के आरक्षण मर्यादा हटविणे हाच खरा तोडगा आहे. आज जेव्हा बेरोजगारी, शेतकरी प्रश्न, कायदा सुव्यवस्था यांसारखे गंभीर विषय उभे ठाकले आहेत, तेव्हा आरक्षणाच्या वादामुळे हे प्रश्न मागे पडत आहेत.


### निष्कर्ष

ओबीसींनी आपले हक्क ओळखून सजग व्हावे. नेते, संघटना आणि राजकीय पक्षांनी एकत्र येऊन या लढ्याला दिशा द्यावी. आरक्षणाच्या वादाला तोडगा फक्त दोनच... जातनिहाय जनगणना आणि ५० टक्के मर्यादा हटविणे. समाजाने हेच लक्षात ठेवून पुढील लढ्याची तयारी निश्चितपणे करायलाच हवी.

■ ■ ■

# प्रज्ञाचक्षु तत्वज्ञ : संत गुलाबराव महाराज

महाराष्ट्राच्या थोर संत परंपरेतील अलीकडच्या काळातील ज्ञानेशकन्या म्हणून संत ज्ञानेश्वरांच्या तत्व चिंतनाला जीवन समर्पित करणारे संत गुलाबराव महाराज होय.



त्यांचा जन्म सन १८८१ ला आजोळघरी लोणी टाकळी, जि. अमरावती येथे गोंडूजी आणि आलोकाबाई मोहोड या दांपत्याच्या पोटी झाला. वयाच्या नवव्या महिन्यातच त्यांच्या डोळ्याला जंतूसंसर्ग झाल्यामुळे अंधत्व आले.

संत भूतलावर जन्म घेतात ते जीवांच्या कल्याणासाठी, त्यांना लाभलेले आयुष्य जरी कमी असले तरी समाजाप्रतीचे योगदान अफाट व अतुलनिय असते. संतांचा जीवनक्रम आणि कायार्ची भिन्नभिन्न वैशिष्ट्ये असतात.

संत गुलाबराव महाराजांना 'ज्ञानेशकन्या' आणि 'प्रज्ञाचक्षु' या संबोधनाने ओळखल्या जातात. श्रीकृष्णाच्या प्रेमात रममान झालेले व संत ज्ञानेश्वरांच्या वांग्मयावर अफाट प्रेम करणारे गुलाबराव महाराज स्वतःला ज्ञानेशकन्या मानतात. तर दुसरे प्रज्ञाचक्षु म्हणजे अशी व्यक्ती जी जन्मानंतर आंधळी झालेली असली तरी बुद्धीच्या आणि बुद्धिमत्तेच्या बळावर सर्व गोष्टींचे मर्म जाणतो अशांना प्रज्ञाचक्षु म्हणतात. हाच स्वरूपधर्म संत गुलाबराव महारांजांच्या बाबतीत तंतोतंत लागू होते.

संत गुलाबराव महाराजांचा जीवनपट बघता अतिशय प्रतिकुल परिस्थितला आहे. नऊ महिन्याचे असताना त्यांच्या डोळ्याला जंतू संसर्ग झाल्यामुळे त्यांना कायमचे अंधत्व आले. वयाच्या चौथ्या वर्षी आई वारली. पुढे लोणी टाकळीहून माधान येथे आले.त्यांच्यात थोर प्रज्ञाशक्ती त्यांच्या प्रगट झाली. त्या बळावरच पुरातन ग्रंथांचे आकलन ते सहज करीत गेले. मनकर्णिका सोबत विवाह झाला. लक्ष्मण भटांकडून संस्कृत ग्रंथ ऐकून पाठांतर केले.



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
९१३०८३५४५८

त्यांनी आकलन, शब्द रूपावली, लघु व्याकरण ही ग्रंथे मुखद्गत करून त्यांनी संस्कृत भाषेतही प्रवेश मिळविला. इतर धर्मांचे ग्रंथांचे श्रवण त्यांनी केले. अल्पावधीत संस्कृत पंडित झाले. जन्मतःअंध असताना; कुठलेही शिक्षण नसताना श्रवण पाठांतराच्या बळावर विपुल ग्रंथ लेखन इतरांकरवी करून घेतले, हे मोठे विलक्षण वाटते.

मराठी, हिंदी, संस्कृत भाषेवर त्यांचे कमालीचे प्रभुत्व होते. गुलाबराव महाराजांनी काव्यशास्त्र, आयुर्वेद, संगितासह अनेक भाषेसोबतच बोली भाषेत अनेक विषयांवर विपुल लेखन केले आहे. सूत्रग्रंथ, भाष्य, प्रकरण, आत्मचरित्र, आख्यान, नाटक, लोकगीते, स्तोत्र, व्याकरण, कोश, आदी वाङ्मय प्रकार त्यांनी हाताळले.

सहस्त्र ओव्या, श्लोकांची निर्मिती त्यांनी केली. अलौकिक व्याख्याने..धर्म समन्वय... प्रेम निकुंज.. योग प्रभाव.. साधूबोध ही त्यांची प्रचलित पुस्तके होय. महाराजांच्या ग्रंथसंपदेचे जतन करण्याचे कष्ट डॉ. राम पंडितांनी केले होते.

एकही वर्ग शाळा न शिकलेले संत गुलाबराव महाराज एका विलक्षण बुद्धीच्या बळावर अलीकडच्या शास्त्रज्ञांच्या सिद्धांतावर त्यांनी अभ्यास केला. त्यामध्ये डार्विनचा उत्क्रांतीवाद, आईन्स्टाईनचा अणुसिद्धांत, जगदीशचंद्र बोस यांचे वनस्पतीशास्त्र या सर्वांचा सखोल अभ्यास करून सटीक लेखन करून ठेवले.

संत गुलाबराव महाराजांचे कार्य ज्ञान, विज्ञान, धर्म, संस्कृती एवढ्या पुरतेच मर्यादित नसून त्यांनी साधुबोध या ग्रंथातून मानवी जीवनाचा उद्धार कसा होईल याचे विवेचन सुद्धा केले आहे. प्रपंच आणि परमार्थ या दोन्हीची सांगड घालून जीवन कसे जगावे? याचे अनमोल मार्गदर्शन लाभलेले आहे. पावसाच्या पाण्यावर जो शेतकरी अवलंबून राहील त्याची पूर्णतः प्रगती आयुष्यात कधी होणार नाही.पाण्याचा अभाव असताना त्याला तांत्रिक पद्धतीने पाण्याच्या शेतीसाठी उपयोग करून घेता येईल, तोच शेतकरी विकासाच्या वाटेने मार्गस्थ होईल. असे ते स्पष्टपणे मांडतात.

वेदांतकेसरी बाबाजी महाराज पंडित या शिष्यावर त्यांचे प्रचंड प्रेम होते.त्यांनी महाराजांची ग्रंथसंपदा जतन केली. त्यांचा ग्रंथसंग्रह आजही अमरावतीच्या परकोटीच्या आत दहिसाथीत असलेल्या संत ज्ञानेश्वर महाराजांच्या मंदिरात सुरक्षितपणे जपून ठेवल्याचे सांगितले जाते.

संत ज्ञानेश्वर महाराजांचा फेटा घातलेले पहिले तैलचित्र अकोल्याच्या चित्रकारांकडून गुलाबराव महाराजांनी करून घेतले होते. ते तैलचित्र आजही आळंदीच्या संजीवन समाधी मंदिराच्या गाभाऱ्यात दर्शनी भागावर आहे. हे महाराष्ट्रासाठी सर्वात मोठी देणगी आहे. असा हा तत्वज्ञानी समाजाला तत्त्वचिंतनाचे दान सपूर्द करून वयाच्या चौत्तीसाव्या वर्षी जगाचा निरोप घेतला. आज भाद्रपद शुक्ल द्वादशी पुण्यस्मरण दिनाच्या प्रसंगी महात्म्याला शब्दसुमनें समर्पित करुया..!

■ ■ ■

# गणेश विसर्जन करतांना बाळगावी सावधगिरी!

सध्याच्या परिस्थितीत महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात अतिवृष्टीमुळे, ढगफुटीमुळे अनेक भाग जलमग्न झालेला आहे. यामुळे काही भागातील नदी-नाले, तलाव, विहिरी व समुद्र किनारा या सर्व तुडुंब भरलेल्या आहेत. गणपती स्थापनेच्या दिड दिवसांपासून गणपती बाप्पाच्या विसर्जनाला सुरूवात झालेली आहे. त्यामुळे बाप्पाचे विसर्जन करतांना सर्वांनीच सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

गणपती विसर्जन करतांना नदी, तलाव, विहीर, समुद्र किनारा याठिकाणी कळत-नकळत दुर्घटना होऊ शकते अशा प्रकारच्या यापूर्वी अनेक दुर्घटना झालेल्या आहेत ही बाब सर्वांनाच ग्यात आहे. मागील वर्षी २०२४ ला राज्यभरात गणेश विसर्जनाला गालबोट लागले व १५ जणांचा मृत्यू झाला.धुळ्यातील चितोड येथे ३ बालकांचा मृत्यू झाला, नाशिक येथील पाथर्डी फाटा परिसरात २ युवकांचा मृत्यू झाला, अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यात ३ जण नदित वाहून गेले,

अहमदनगर जिल्ह्यात २ युवकांचा मृत्यू, जिंतूर तालुक्यात २ जणांचा मृत्यू, अकोला जिल्ह्यात एकाजणाचा मृत्यू. त्यामुळे गणेश विसर्जन सावधगिरीने करावे.त्याचप्रमाणे लहान मुलांना विसर्जन स्थळापासुन दुरच ठेवावे. कारण छोटीशी चुक परिवारावर मोठा आघात करू शकते.

खेड्यापाड्यात, शहरात बाप्पाच्या विसर्जनाच्या वेळी भक्तगण विसर्जनाच्या ठिकाणी जातात. अशा परिस्थितीत कोणताही धोका ओढवून नये याची काळजी सर्वांनीच घेतली पाहिजे. गणेश विसर्जनासाठी तलावांवर बंदी आहेच.प रंतु प्रशासनाने जे गणेश विसर्जनाचे ठिकाण (स्थळ) दिले आहे किंवा प्रशासनाने बनवलेल्या कृत्रिम तलावामध्ये विसर्जन करायला हवे.

यदाकदाचित एखादी अकस्मात घटना घडली तर प्रशासन आपल्या मदतीला धावून येवु शकते.त्यामुळे प्रशासनाचे नियम पाळुन सवार्नी गणेश विसर्जनाचा आनंद घ्यावा व सावधगिरी बाळगवी. मुर्ती विसर्जनाच्या वेळेस जिवीत हानी व दुर्घटना सुध्दा झालेल्या आहेत. या संपूर्ण गोष्टी डोळ्यासमोर ठेवून व सतर्कता बाळगुन गणेश विसर्जन केले पाहिजे. त्याचप्रमाणे सरकारने व प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे गरजेचे आहे.



रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

ज्या-ज्या ठिकाणी कृत्रीम तलावची व्यवस्था केलेली आहे, त्या त्या ठिकाणी त्याचा उपयोग सर्वांनीच केला पाहिजे. परंतु ज्या ठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था नाही असे भक्तगण नदी, विहीर, समुद्र किनारा किंवा तलावामध्ये गणरायाचे विसर्जन करतात त्या त्या ठिकाणी सर्वांनीच विसर्जन करतांना काटेकोरपने सावधगिरी बाळगणे अत्यंत गरजेचे आहे.

मुख्यत्वेकरून मंडळांचे मोठे गणपती असतात. अशा परिस्थितीत मंडळाच्या भक्तांनी गणपती विसर्जन करतांना सतर्कता बाळगून व प्रशासनाच्या नियमांचे पालन करून विसर्जन करावे. छोटीशी चुक मोठा आघात पोहचवू शकते.

गणेश विसर्जनाच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की बाप्पांना निरोप देतांना गणेश विसर्जनाची प्रक्रीया सांभाळून करावी. त्याचप्रमाणे निर्माल्य तलाव, विहीर, नदी, समुद्र किनारा यामध्ये न टाकता प्रशासनाने निर्माल्याची व्यवस्था ज्या ठिकाणी केली आहे त्याठिकाणीच टाकावे. यामुळे प्रदूषणावर आवर घातला येईल व पाणी दुषित होण्यापासुन वाचेल. सोबतच जलचर प्राण्यांचे प्राणसुध्दा वाचेल.

अशाप्रकारे संपूर्ण गणेश भक्तांनी काळजी घेणे आवश्यक आहे. गणपती बाप्पा आपल्या घरी दरवर्षी येणार.कारण गणेश विसर्जन करतांना गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या! असा जयघोष करून बाप्पाणा आपण निरोप देवून विसर्जन करतो. परंतु गणेश विसर्जनाच्या निमित्ताने गणेश भक्तांनी आपल्या परिसरात एकतरी वृक्ष लावुन गणरायाला निरोप द्यावा.यामुळे गुरांना चारा, सर्वांना शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.कारण आज कोणत्या ना कोणत्या पद्धतीने वृक्ष लागवड करणे काळाची गरज आहे.गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या... जय श्री गणेशाय नमः!

# महिलांनो रोज लिपस्टिक लावत असाल तर सावधान!

लिपस्टिक म्हटलं की श्रृंगारातील महिलांचा आवडती मेकपची वस्तू. अनेकींना तर लिपस्टिकचे कलेक्शन करणे प्रचंड आवडते. लिपस्टिक लावणे आजकाल प्रत्येक महिलेच्या मेकअप रूटीनचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. पण तुम्हाला माहिती आहे का की दररोज लिपस्टिक लावण्याची सवय हळूहळू आरोग्याला हानी पोहोचवू शकते?



### लिपस्टिकमध्ये शिसे असते

बहुतेक लिपस्टिकमध्ये शिसे नावाचा हानिकारक धातू असतो, जो हळूहळू शरीरात जमा होऊ लागतो आणि हार्मोनल असंतुलन, प्रजनन समस्या आणि मानसिक विकासात अडथळा निर्माण करू शकतो. लिपस्टिक वारंवार लावल्याने आपण काही खाताना, जेवताना किंवा पाणी पिताना देखील थोडी थोडी लिपस्टिक आपल्या पोटात जाते आणि त्याद्वारे हे रसायन शरीरात जाते ज्याचा आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो.

ओठ काळे आणि कोरडे होऊ शकतात.

लिपस्टिकमध्ये असलेले रसायने आणि प्रिजर्वेटिव्स ओठांमधील ओलावा काढून टाकू शकतात, ज्यामुळे ते हळूहळू कोरडे, फाटलेले आणि काळे होऊ शकतात. जर तुम्ही दररोज लिपस्टिक लावली तर कालांतराने तुमचे ओठ त्यांचा नैसर्गिक गुलाबीपणा गमावून बसतात.

लिपस्टिकमध्ये पॅराबेन्स, कॅडमियम आणि क्रोमियम सारखी अनेक प्रकारची रसायने असतात, जी शरीरात हळूहळू विषबाधा निर्माण करू शकतात. या घटकांमुळे कर्करोगासारखे गंभीर आजार होण्याची शक्यता असते. लिपस्टिकच्या सतत संपर्कात राहिल्याने हे विषारी पदार्थ शरीरात जमा होऊ शकतात.

लिपस्टिकमध्ये असलेल्या रसायनांमुळे काही लोकांना ओठांवर ॲलर्जी, खाज सुटणे आणि जळजळ होण्याची शक्यता असते. विशेषतः जर तुम्ही स्वस्त किंवा लोकल शॉपमधून घेतलेली लिपस्टिक वापरत असाल तर त्यामुळे त्वचेचा संसर्ग देखील होऊ शकतो.

तुम्ही लिपस्टिक लावता तेव्हा ती दिवसभर हळूहळू तुमच्या पोटात जात असते. लिपस्टिकमधील हानिकारक रसायने खाताना आणि पिताना पोटात जातात. त्यामुळे यकृत आणि पोटाला नुकसान पोहोचवू शकतात, ज्यामुळे पचनसंस्था कमकुवत होऊ शकते.

### काय काळजी घ्यावी?

नैसर्गिक गोष्टींपासून बनलेली आणि हर्बल लिपस्टिक वापरा. लिपस्टिक लावण्यापूर्वी ओठांवर लिप बाम किंवा खोबरेल तेल लावा. झोपण्यापूर्वी ओठांवर लावेली लिपस्टिक पूर्णपणे स्वच्छ करा जेणेकरून रसायने ओठांवर राहणार नाहीत. दररोज लिपस्टिक लावणे टाळा आणि कधीकधी नैसर्गिक लूक द्या. कारण त्यातही आता वेगवेगळे रंग येतात. त्यामुळे लिपस्टिक लावण्यापेक्षा तुम्ही तेही लावू शकता. ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### निर्माल्य रथ

देवपूजेचे निर्माल्य
फेकू नये नदीत
जमा करून ठेवावे
टाका शेतामध्ये मातीत..

जल प्रदुषणाला तर
बसेलच आळा
शेतीचा पोत ही सुधरेल
हा नियम पाळा ..!

पुजेच्या निर्माल्याचे
करण्या योग्य विसर्जन
निर्माल्य रथाची संकल्पना
गावात राबवू या सर्वजण..!

# सिट्रोएन इंडिया आणि एचडीएफसी बँक यांच्यात रिटेल व डिलर फायनान्स सोल्यूशन्ससाठी भागीदारी

**मुंबई, ३ सप्टेंबर :** वाहनमालकी अधिक सुलभ करणे आणि ग्राहक व डिलर्ससाठी आर्थिक उपलब्धता वाढविणे या सामायिक दृष्टिकोनातून, सिट्रोएन इंडियाने देशातील सर्वात मोठ्या खासगी बँक असलेल्या एचडीएफसी बँकेशी भागीदारी केली आहे. याअंतर्गत सर्वोत्तम दर्जाचे रिटेल व डिलर फायनान्स सोल्यूशन्स उपलब्ध होतील. या धोरणात्मक पावलामुळे स्टेलँटिसएचडीएफसी भागीदारी अधिक बळकट झाली असून आता जीप, मॅसेराटी आणि सिट्रोएनसह सर्व स्टेलँटिस ब्रँड्ससाठी एचडीएफसी बँक ही एकमेव प्राधान्य वित्तीय भागीदार ठरली आहे.

या करारावर स्वाक्षऱ्या शिशिर मिश्रा, बिझनेस हेड आणि डायरेक्टर स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप्स व इन्स्टिट्युशनल बिझनेस, स्टेलँटिस इंडिया आणि अखिलेश कुमार रॉय बिझनेस हेड ऑटो लोन, इन्व्हेंटरी फायनान्स आणि टू-व्हीलर लोन, एचडीएफसी बँक यांनी केल्या. या प्रसंगी स्टेलँटिस इंडिया व एचडीएफसी बँकेचे अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

एचडीएफसी बँकेचे संपूर्ण भारतभरचे नेटवर्क आणि दोन दशकांहून अधिक काळाची विश्वासार्ह परंपरा यामुळे सिट्रोएन ग्राहक व डिलर भागीदारांना मजबूत वित्तीय मदत मिळेल. ग्राहकांसाठी या भागीदारीमुळे स्पर्धात्मक व्याजदर, लवचिक परतफेडीचे पर्याय आणि अधिक सोय उपलब्ध होणार आहे.

या उपक्रमातील खास आकर्षण म्हणजे *एचडीएफसी एक्सप्रेस कार लोन*, ज्याद्वारे केवळ ३० मिनिटांत पूर्णपणे डिजिटल माध्यमातून कर्ज वितरण केले जाईल आणि कोणत्याही प्रकारच्या कागदपत्रांची गरज भासणार नाही. यामुळे गाडी खरेदीची प्रक्रिया अधिक वेगवान, सोपी आणि ग्राहकाभिमुख ठरेल. ऑटो लोन हे एचडीएफसी बँकेच्या रिटेल ॲसेट्स विभागाचे महत्त्वाचे योगदान ठरले आहे. ३० जून २०२५ पर्यंत बँकेचा ऑटो लोन पोर्टफोलिओ १.४८ लाख कोटींपेक्षा अधिक होता.

सिट्रोएन डिलर भागीदारांसाठी, या भागीदारीमुळे खास डिझाइन केलेले फ्लोअरप्लॅन फायनान्स सोल्यूशन्स उपलब्ध होतील, जे त्यांच्या दैनंदिन कामकाज व व्यवसाय वृद्धीसाठी उपयुक्त ठरतील. डिलर्सना स्पर्धात्मक दर, विशेष अटी व विविध वित्तीय उत्पादने मिळतील. तसेच कार्यभांडवल व इन्व्हेंटरी फंडिंगसाठी सोपे प्रोसेसिंग मिळाल्यामुळे त्यांची वित्तीय लवचिकता आणि कार्यक्षमता अधिक मजबूत होईल.

या भागीदारीबाबत स्टेलँटिस इंडियाचे बिझनेस हेड व डायरेक्टर स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप्स व इन्स्टिट्युशनल बिझनेस शिशिर मिश्रा म्हणाले, गाडी खरेदीच्या प्रवासात फायनान्सिंगची महत्त्वाची भूमिका असते. आजचे ग्राहक स्मार्ट आणि लवचिक फायनान्सिंग सोल्यूशन्स शोधतात, जे त्यांच्या जीवनशैली आणि सोयींशी जुळतील. वेग, पारदर्शकता आणि सोय हे त्यांच्यासाठी निर्णायक घटक ठरतात. सिट्रोएनमध्ये आम्ही मोबिलिटी अधिक सुलभ व सहज करण्यावर विश्वास ठेवतो. एचडीएफसी बँकेसोबतची ही भागीदारी आमच्या फायनान्सिंग इकोसिस्टीमला अधिक बळकट करते आणि सर्व टचपॉइंट्सवर विश्वासार्ह व सोयीस्कर अनुभव देण्याच्या आमच्या बांधिलकीला पुन्हा अधोरेखित करते.

एचडीएफसी बँकेचे ग्रुप हेड रिटेल ॲसेट्स अरविंद वोहरा म्हणाले, सोपे ऑटो-फायनान्सिंग प्रवास उपलब्ध करून देण्यासाठी सिट्रोएनसोबत भागीदारी करताना आम्हाला आनंद होत आहे. एचडीएफसी बँकेचे विस्तृत नेटवर्क, ग्राहक-केंद्रित बँकिंग उत्पादने आणि मजबूत क्रेडिट इंटेलिजन्स क्षमतांमुळे गाडी खरेदीची प्रक्रिया अधिक वेगवान व सोयीस्कर होईल.

# सुनील कटारिया यांनी गोदरेज ॲग्रोवेटचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून स्वीकारला पदभार



**मुंबई, ३ सप्टेंबर :** भारतातील आघाडीचा वैविध्यपूर्ण कृषी-व्यवसाय गोदरेज ॲग्रोवेट लिमिटेड (गोदरेज ॲग्रोवेट) ने सुनील कटारिया यांनी १ सप्टेंबर २०२५ पासून कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) आणि व्यवस्थापकीय संचालक (एमडी) म्हणून औपचारिकपणे पदभार स्वीकारला असल्याचे आज जाहीर केले. त्यांचा कार्यकाळ पाच वर्षांचा असेल.

मे २०२५ मध्ये कटारिया यांची गोदरेज ॲग्रोवेटचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक नामनिर्देशित म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांना विपणन, विक्री आणि नेतृत्वाच्या भूमिकांमध्ये मरिको लिमिटेड, गोदरेज कंझ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेड आणि रेमंड लिमिटेड सारख्या आघाडीच्या संस्थांमध्ये वीस वर्षांहून अधिक कार्यअनुभव आहे. व्यवसायात परिवर्तन घडवून आणणे, बाजारपेठेतील वाढ आणि संस्थांमध्ये सुधारणा घडवून आणणे यात त्यांचा लौकिक आहे. गोदरेज ॲग्रोवेट मध्ये ते कंपनीला विकास आणि नाविन्यपूर्णतेच्या पुढील टप्प्यात घेऊन जातील. यामध्ये आजच्या बदलत्या व्यवसाय वातावरणात उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये क्षमता उभारणी करण्यावर लक्ष केंद्रित केलेले असेल.

गोदरेज ॲग्रोवेट लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक सुनील कटारिया आपल्या धोरणाची रूपरेषा सांगताना म्हणाले, एक मजबूत पाया आणि प्रभावी परंपरा असलेल्या गोदरेज ॲग्रोवेटचे नेतृत्व करण्यास मी उत्सुक आहे. प्रत्येक व्यवसाय बदलाच्या वेगवेगळ्या टप्प्यात असताना माझे प्राधान्य क्षमता विकासात गुंतवणूक करून, आमच्या गो-टू-मार्केट धोरणाची अंमलबजावणी मजबूत करून आणि उच्च-क्षमता असलेल्या व्यवसायांचे प्रमाण वाढवून पोर्टफोलिओमधील मूल्य खुले करणे याला असणार आहे. आमच्या टीम आणि भागधारकांच्या पाठिंब्याने गोदरेज ॲग्रोवेट अर्थपूर्ण वाढ साध्य करत राहील आणि दीर्घकालीन मूल्य निर्माण करेल याची मला खात्री आहे.

या बदलाबाबत बोलताना गोदरेज इंडस्ट्रीज लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक नादिर गोदरेज म्हणाले, गोदरेज ॲग्रोवेटचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून औपचारिकपणे पदभार स्वीकारत असल्याबद्दल आम्ही सुनील यांचे स्वागत करत आहोत. आव्हानात्मक कार्यक्षेत्रांमध्ये व्यवसाय उभारण्याचा त्यांना प्रचंड अनुभव आहे. नफा मिळविण्याला प्राधान्य आणि आमच्या ब्रँड योजना मजबूत करत गोदरेज ॲग्रोवेटच्या विविध व्यवसायांचा विस्तार करण्याच्या आमच्या उद्दिष्टाशी हे सुसंगत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली ॲग्रोवेट भारतातील शेती व शाश्वततेसाठी सर्व भागधारकांचा विश्वासार्ह भागीदार म्हणून आपली भूमिका अधिक मजबूत करेल याची मला खात्री आहे.

# भारतातील सर्वात मोठा टेलिव्हिजन सादर करत वॉबल डिस्प्लेने रचला इतिहास



**मुंबई, ३ सप्टेंबर :** इंडकाल टेक्नॉलॉजीज ब्रॅन्डचा अंतर्गत तंत्रज्ञान विभाग असलेल्या वॉबल डिस्प्लेजने आज मॅक्सिमस सीरीज ११६.५ इंच गुगल टीव्ही ५.० च्या लाँचची घोषणा केली आणि भारताच्य आजवरच्या सर्वात मोठ्या ग्राहक टेलिव्हिजनच्या इतिहासात एक नवीन उच्चांक प्रस्थापित केला. तंत्रज्ञानाचा हा चमत्कार, इतर ब्रॅन्ड्सपेक्षा खरोखरच उच्च दर्जाचा (शब्दश:) आहे आणि वॉबल डिस्प्लेजचे डिस्प्ले तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील संशोधन व नवोन्मेष यातील सामर्थ्य प्रदर्शित करतो पूर्णत: आंतरराष्ट्रीय ब्रॅन्ड्सचे वर्चस्व असणाऱ्या या क्षेत्रात, एका भारतीय कंपनीसाठी हा एक अनन्य विक्रम आहे. मॅक्सिमस सिरीज ११६.५ इंच टीव्ही हा, भारतीय गृह मनोरंजनासाठी एक पूर्णपणे नवीन व उत्कृष्ट उदाहरण निर्माण करतो, ज्यामध्ये या प्रचंड मोठ्या आकारात भारतातील पहिलेच क्यूएलईडी + मिनीएलईडी डिस्प्ले तंत्रज्ञान आहे, ज्यामुळे प्रगत क्वांटम डॉट कलर अचूकता आणि उच्च गुणवत्तेच्या ११६.५ इंच मिनी-एलईडी बॅकलाइटिंगशी सांगड घालण्यात वॉबल डिस्प्ले पथप्रदर्शक बनतो, तर अशा मोठ्या प्रमाणावर अँड्रॉइड १४ सह नवीनतम गुगल टीव्ही ५.० ओएस चे पदार्पण करतो. यामुळे अभूतपूर्व स्मार्ट क्षमता आणि अमर्याद सामग्री एकीकृत होतात, ज्या दिवाणखान्यास एका उत्तम मनोरंजन स्थळांमध्ये रूपांतरित करतात. २४० वॅट ६.२.२ रे आणि दोन सुसंगत वूफरद्वारे समर्थित असलेला मॅक्सिमस एक भव्य, थिएटर-श्रेणी एकरूपता-विस्तारित डायनॅमिक्ससह पाहण्याच्या अनुभवाची भव्यता वाढवतो आणि अत्यंत-स्पष्ट तपशील आणि घेरणाऱ्या, त्रिमितीय ध्वनीसह आपल्या घरात सिनेमॅटिक अनुभव पूर्ण करतो.

आजचा दिवस हा भारतीय ग्राहक इलेक्ट्रॉनिक्ससाठी एक ऐतिहासिक क्षण आहे, असे इंडकल टेक्नॉलॉजीजचे सीईओ आनंद दुबे म्हणाले. मॅक्सिमस सिरीज ११६.५-इंच हा केवळ भारतातील सर्वात मोठा टीव्ही नाही – तर तो निर्धारित मानकांना आव्हान देण्याच्या आणि भारतीय ग्राहकांसाठी दृश्य आणि ऑडिओ यांच्या मानकात वेगाने सुधारणा करण्याच्या आमच्या उद्दिष्टांचा पुरावा आहे. आम्ही फक्त एक उत्पादन लाँच करत नाही आहोत, तर आम्ही जगातील सर्वात प्रगत सिनेमाच्या अनुभवांशी यशस्वी प्रतिस्पर्धा करणाऱ्या मनमोहक घरगुती मनोरंजनाच्या एका नवीन युगाची सुरुवात करत आहोत.

मॅक्सिमस सिरीज म्हणजे अभूतपूर्व क्यूएलईडी + मिनीएलईडी डिस्प्ले तंत्रज्ञानाचा, अँड्रॉइड १४ द्वारे समर्थित गुगल टीव्ही ५.० सह मिलाप आहे, ज्यामुळे एक अतुलनीय दृश्य वातावरण निर्माण होते. या डिस्प्लेमध्ये २००० निट्सचा आश्चर्यकारक शीर्ष ब्राइटनेस आहे - जो भारतीय बाजारपेठेत उपलब्ध असलेल्या बहुतेक उत्तम टीव्हींना मागे टाकतो - ज्यामुळे सिनेमॅटिक ऑडिओ-व्हिज्युअल अनुभवांसाठी डॉल्बी व्हिजन टमॉसच्या मदतीने अतुलनीय एचडीआर कामगिरी निश्चितच पार पाडली जाते. या टेलिव्हिजनची ४१४४ नेटिव्ह रिफ्रेश रेट क्षमता त्याला सर्वोत्तम गेमिंग डिस्प्लेचे स्थान देते, जी पुढील पिढीच्या कन्सोल गेमिंग आणि पीसी कनेक्टिव्हिटीला पूरक ठरते आणि तिच्यात व्यावसायिक गेमर्सना आवश्यक असलेल्या ओघवत्या, विलंब-मुक्त कामगिरीचा समावेश आहे.

# अदाणी पॉवरला धिरौली खाण सुरू करण्यास मंजुरी

**अहमदाबाद, ३ सप्टेंबर :** भारतातील सर्वात मोठी खाजगी क्षेत्रातील ऊष्मा-विद्युत उत्पादक कंपनी, अदाणी पॉवर लिमिटेड यांनी जाहीर केले आहे की, मध्य प्रदेशातील सिंगरौली जिल्ह्यातील धिरौली खाण प्रकल्प सुरू करण्यासाठी भारत सरकारच्या कोळसा मंत्रालयाने मंजुरी दिली आहे. या महत्त्वपूर्ण टप्प्यामुळे अदाणी पॉवरला कच्च्या मालाची सुरक्षितता अधिक बळकट मिळेल आणि या क्षेत्रातील कंपनीचे नेतृत्व अधिक मजबूत होईल.

धिरौली खाण, जी अदाणी पॉवरची उपकंपनी महान एनर्जेन लिमिटेडच्या मालकीची आहे, हिची पीक उत्पादन क्षमता ६.५ एमटीपीए असून, यामध्ये ५ एमटीपीए खुल्या खाणीमधून आणि उर्वरित भूमिगत खाणीमधून असेल. भूवैज्ञानिक अहवालानुसार, या ब्लॉकमध्ये एकूण ६२० दशलक्ष टन (एमएमटी) इतका एकूण भूवैज्ञानिक साठा असून, ५५८ एमएमटी निव्वळ साठा आहे. त्यामुळे पुढील अनेक दशकांसाठी इंधनाची सुरक्षितता आणि कार्यकारी स्थैर्य सुनिश्चित होईल.

जबाबदार खाण उपक्रमाचा भाग म्हणून, अदाणी पॉवर खाण क्षेत्रातच कोळशाचे धुलाई व प्रक्रिया करण्याची योजना आखू शकते, जेणेकरून खाणीबाहेर अशुद्धता व निकामी घटक न नेता, उत्सर्जन कमी प्रमाणात राहील.

धिरौली ब्लॉकमध्ये खाणकाम सुरू होणे हे अदाणी पॉवरच्या स्वयंपूर्णता आणि शाश्वत वाढीच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे, असे अदाणी पॉवरचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस. बी. ख्यालिया म्हणाले. कच्च्या मालाच्या स्त्रोतांमध्ये मागे एकत्रिकरण करून, आम्ही केवळ इनपुट खर्चाचे अनुकूलन करत नाही, तर लाखो ग्राहकांसाठी स्पर्धात्मक दरात वीज पुरवण्यास सक्षम होतो. सर्व भागधारकांसाठी दीर्घकालीन मूल्यनिर्मितीवर लक्ष केंद्रित करून, खाण जबाबदारीने विकसित करण्याच्या आमच्या वचनबद्धतेत कोणतीही ढिलाई नाही.

ही अदाणी पॉवरची पहिलीच स्वतंत्र खाण आहे, ज्याला सरकारकडून खाणकाम सुरू करण्याची मंजुरी मिळाली आहे. या खाणीच्या खुल्या खाणीतील पीक रेटेड क्षमता (पीआरसी) आर्थिक वर्ष २०२७ पर्यंत गाठली जाणार असून, भूमिगत खाणकाम नऊ वर्षांनी सुरू होणार आहे. अदाणी पॉवरला या ब्लॉकसाठी ३० वर्षांची खाण लीज मिळाल्यामुळे दीर्घकालीन कार्यकारी सातत्य सुनिश्चित झाले आहे.

धिरौली ब्लॉकमधून अदाणी पॉवरच्या व्यापारी वीज आवश्यकतांची पूर्तता होण्याची अपेक्षा आहे आणि त्याचबरोबर जवळील १,२०० मेगावॅट महान पॉवर प्लांटलाही पुरवठा केला जाणार आहे, जो सध्या ३,२०० मेगावॅट विस्तार प्रकल्प राबवत आहे.

# 'युवा'च्या 'माय बाप्पा वर्कशॉप'मुळे भारतभरातील ८०+ शाळांमधील विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित



**नागपूर, ३ सप्टेंबर :** गणेशोत्सवाच्या मंगलप्रसंगी नवनीत एज्युकेशन लिमिटेडच्या युवा या स्टेशनरी विभागाने विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय असलेल्या माय बाप्पा वर्कशॉप'चे देशभरातील ८० हून अधिक शाळांमध्ये आयोजन केले. या विधायक उपक्रमात युवा'ने खास तयार केलेल्या किट्सच्या साहाय्याने विद्यार्थ्यांनी अनोख्या कलाकृती साकारत परंपरा आणि संस्कृतीला सर्जनशीलतेची जोड देत गणेशभक्तीचा उत्सव साजरा केला.

'युवा'तर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या माय बाप्पा वर्कशॉपया वार्षिक कार्यशाळेच्या माध्यमातून गणेशोत्सवाचा उत्साह सर्जनशीलता आणि शिक्षणाच्या माध्यमातून जिवंत होतो. गणेशोत्सव हा युवासाठी केवळ सण नसून कल्पनाशक्ती, ज्ञान आणि एकत्रित आनंदाचा उत्सव आहे आणि मुले या आनंदसोहळ्याचा केंद्रबिंदू असतात.

या वर्षी 'युवा'चा हा उपक्रम महाराष्ट्र, दिल्ली, गुजरात, कर्नाटकसह विविध राज्यांतील ८० हून अधिक शाळांपर्यंत पोहोचला आणि उत्सवाचा आनंद सर्वत्र द्विगुणित करण्यात आला. नागपुरात 'युवा'ने शंकर नगरमधील सरस्वती विद्यालय, फ्रेंड्स कॉलनीतील गुरुकुल विद्या मंदिर, शुक्रवारीतील जे. एन. टाटा पारसी हायस्कूल, दीक्षाभूमी येथील कुर्वे मॉडेल पब्लिक स्कूल सीबीएसई आणि समर्थ नगरमधील आर. एस. मुंडले इंग्लिश स्कूल यांचा सहभाग होता. देशभरातील २४ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी उत्साहाने या उपक्रमात भाग घेतला आणि सुंदर कलाकृतींमधून गणरायाला सर्जनशील अभिवादन केले.

युवा स्टेशनरीचे चीफ स्ट्रॅटेजी ऑफिसर (सीएसओ) अभिजीत सान्याल म्हणाले, सण ही आनंद, एकत्र येणे आणि शिकण्याची संधी असते, अशी 'युवा'मध्ये आमची धारणा आहे. माय बाप्पा सेलिब्रेशन'च्या उपक्रमातून आम्ही मुलांना सर्जनशीलता व्यक्त करण्यासाठी साधने आणि प्रेरणा देतो. तसेच सांस्कृतिक मूल्यांशी त्यांना जोडतो. आमचे प्रयत्न का महत्त्वाचे आहेत, हे त्यांच्या उत्साहातून आणि कलाकौशल्यातून आम्हाला नेहमीच उमगते. माय बाप्पा वर्कशॉप हा उपक्रम म्हणजे लहानग्यांच्या मनात सामूहिक समारंभाची भावना, सांस्कृतिक नाते आणि स्वतःला व्यक्त करण्याची ताकद जोपासण्याची बांधिलकी आहे. प्रत्येक सण हा मुलांसाठी शिकण्याचा आणि प्रगती साधण्याचा अर्थपूर्ण क्षण ठरावा, याची काळजी युवा'तर्फेकायम घेण्यात येते.

# निश्चित लक्ष केंद्रित उपक्रमांद्वारे अंबुजा सिमेंट्स हरदोना आणि एकोडी येथील ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणातील अडथळे पार करण्यासाठी करत आहे सक्षम

**नागपूर, ३ सप्टेंबर:** वैविध्यपूर्ण अदानी पोर्टफोलिओचा भाग असलेली सिमेंट आणि बांधकाम साहित्य कंपनी अंबुजा सिमेंट्स आपल्या सीएसआर उपक्रमाचा एक भाग म्हणून ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतील मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळवून देण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. महाराष्ट्रातील हरदोना आणि एकोडी या गावांमध्ये आर्थिक अडचणी, भाषिक आव्हाने आणि सामाजिक अडथळ्यांमुळे शालेय सहभाग आणि शिकण्यावर परिणाम होतो. अशा ठिकाणी अंबुजा सिमेंट्सने निश्चित लक्ष्य ठेऊन शैक्षणिक उपक्रम सुरू केले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडून येत आहे.



यातील दोन प्रेरणादायी कथा आहेत या अनुश्री प्रमोद धुर्वे ही इयत्ता ५ वीची विद्यार्थिनी आणि सदिच्छा प्रणय उपरे ही इयत्ता ३ रीची विद्यार्थिनी यांच्या. दोन्ही मुली आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील असून पालक मजुरी किंवा शेतीकामात गुंतलेले असल्यामुळे त्यांच्या शिक्षणासाठी मर्यादित साधने होती. सुरुवातीला अनुश्रीला मराठी प्रवाहीपणे वाचता येत नव्हते आणि आकलनात अडचण होती; तर सदिच्छा लाजरी, अबोल होती आणि वाचन, लेखन तसेच गणितात अडचणींचा सामना करत होती. याशिवाय आत्मविश्वासाचा अभाव आणि घरातील शिक्षणपूरक वातावरणाचा अभाव यामुळे त्यांची आव्हाने अधिकच वाढली होती.

त्यांच्या प्रगतीसाठी, अंबुजा सिमेंट्सच्या दर्जेदार शिक्षण कार्यक्रमांतर्गत सीएसआर उपक्रमातून प्रत्येक मुलाच्या गरजेनुसार सुसूत्र पद्धतीने काम सुरू करण्यात आले. अनुश्रीसाठी यामध्ये घरभेटी, तिच्याकडून करून घेण्यात येणारा वाचनाचा सराव, शब्द ओळख खेळ, वाक्य बांधणी उपक्रम आणि शिक्षक व तिच्या आईकडून सतत प्रोत्साहन या गोष्टींचा समावेश होता. हळूहळू तिचे मराठी वाचन खूपच सुधारले, ती स्वतंत्रपणे वाक्यरचना करू लागली आणि लेखन व गोष्टी सांगण्यात तिला आत्मविश्वास मिळाला. सदिच्छासाठी शिक्षकांनी तिच्या शेतीशी संबंधित पार्श्वभूमीशी निगडित प्रात्यक्षिक शिकवण पद्धती अवलंबली. तिला वर्गातील जबाबदाऱ्या दिल्या आणि तिच्या पालकांना शिक्षणात अधिक सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले. ही पावले उचलल्यामुळे तिची केवळ अभ्यासातली गोडी वाढली एवढेच नाही तर सहभाग, उपस्थिती आणि वर्गमित्रांशी संवादही सुधारला.

आज अनुश्री आणि सदिच्छा या दोघीही अंबुजा सिमेंट्सच्या शैक्षणिक उपक्रमांच्या सकारात्मक परिणामांचे दर्शन घडवतात. अनुश्री प्रवाहीपणे वाचन करते आणि तिची अचूकता व आकलन वाढत आहे तर सदिच्छाने लाजरेपणा दूर करून शाळेतील उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्यास सुरुवात केली आहे. तिचा आत्मविश्वास आणि शैक्षणिक कामगिरीतही सुधारणा झाली आहे. त्यांच्या प्रवासातून हे स्पष्ट दिसून येत आहे की वर्गातील मार्गदर्शन, प्रात्यक्षिक अध्यापन पद्धती आणि कुटुंबाचा सहभाग यांचे एकत्रिकरण करून अंबुजा सिमेंट्स आपल्या निश्चित उद्दिष्टधारित उपक्रमांद्वारे ग्रामीण मुलांना अडथळ्यांवर मात करून त्यांची खरी क्षमता खुली करण्यास सक्षम बनवत आहे.

## आज का अंदाज

**गुरूवार ४ सप्टेंबर २०२५**

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ८ | ९ | २ | ३ | ६ | ७ |
| १४७ | १६८ | ४७७ | २८९ | ११० | ५९९ | ५५६ | १२४ |
| ३९० | ३४८ | ५५८ | ४७८ | २०० | ३५५ | ८८० | ४६७ |
| २०० | ७८० | ३७८ | ३६० | ३४५ | ४४५ | ४४८ | ३४० |
| २४ | ५४ | ८१ | ९१ | २१ | ३१ | ६८ | ७८ |
| २६ | ५६ | ८३ | ९३ | २९ | ३९ | ६० | ७० |
| २० | ५० | ८७ | ९७ | २५ | ३५ | ६४ | ७४ |

**४ सप्टेंबर : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | ५१ | ४६ | ७६ |
| ३० | ५० | ४९ | ७९ |
| ३८ | ५८ | ४२ | ७२ |
| ६७१ | ५११ | १५० | ४५० |
| ५८१ | ७७१ | २६८ | १४४ |
| ४११ | ३४६ | ७९० | २७० |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

८ ९ ० १ २

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

# यूकेतील गायिका रमीत संधूने ला दिला निरोप, आठवणी आणि शिकवण घेऊन केल यात्रा



**मुंबई, ३ सप्टेंबर :** झी टीव्हीवरील छोरियाँ चली गाँव हा रिॲलिटी शो देशभरात प्रेक्षकांची मने जिंकत आहे. बमुलिया गावातील साध्या पण कठीण जीवनाशी जुळवून घेण्याचा मुलींचा प्रवास या शोमध्ये दाखवला जातो. या आठवड्यात प्रेक्षकांनी भावनिक क्षण पाहिला, जेव्हा यूकेमधील गायिका स्पर्धक रमीत संधूने शोला निरोप दिला. हा अनुभव तिच्यासाठी मोठा धडा आणि गोड आठवण बनला. रमीतचा प्रवास तिच्या चिकाटी आणि सौंदर्यासाठी कायम लक्षात राहील. पहिल्या टास्कची विजेती अंजुम फकीह हिने तिला पहिली नामांकित स्पर्धक म्हणून निवडले होते. त्यानंतर सुरुवातीलाच आलेला शेणाचा प्रसंगही तिला सहन करावा लागला. पण त्याने स्वतःला परिभाषित होऊ न देता रमीतने त्याचाच टर्निंग पॉइंट केला आणि प्रत्येक आव्हानासोबत ती अधिक मजबूत होत गेली. तिच्या व्यक्तिमत्त्वामुळेगावाच्या साध्या वातावरणातही एक रंगत आली. सलून स्टायलिंगसारख्या टास्कमध्ये तिने दाखवलेली झळाळी, ट्रॅक्टर चालवताना दाखवलेली मेहनत, रसोईत स्वयंपाक करताना केलेली जुळवाजुळव, आणि कुस्तीमध्ये दिलेला उत्तम प्रयत्न या सगळ्यामुळे तिने शोवर आपली अविस्मरणीय छाप सोडली. यूकेमधून आलेली रमीत गावातील जीवन मनापासून, ऊबदारपणे आणि ठाम निर्धाराने स्वीकारत गेली, आणि त्यामुळेच ती सर्वांच्या मनात घर करून गेली. आपल्या प्रवासाबद्दल बोलताना रमीत संधू म्हणाली, छोरियाँ चली गाँव माझ्यासाठी खरंच आयुष्य बदलून टाकणारा अनुभव ठरला. जेव्हा मी पहिल्यांदा बमुलिया गावात आले, तेव्हा मला खरं तर काहीच माहिती नव्हतं की पुढे काय होईल. पहिलीच नामांकित स्पर्धक होणे आणि सुरुवातीलाच माझ्यावर शेण टाकले जाणे हे सोपे नव्हते. त्या क्षणी मी हादरले होते, पण हाच क्षण माझ्यासाठी ताकद देणारा ठरला, ज्यामुळे मी पुढची प्रत्येक गोष्ट धैर्याने सामोरी गेले.

## राशीभविष्य

**मेष :** आज आपल्या जोडीदारासोबत चांगला वेळ घालवाल. भूतकाळावर जास्त चर्चा करू नका. तसेच नात्यात कटुता येईल, अशा कोणत्याही गोष्टीचा उल्लेख करु नका. करिअरमध्ये कामाचा ताण जाणवेल.

**वृषभ :** आर्थिक बाबींमध्ये विचारपूर्वक निर्णय घ्या. संशोधन न करता गुंतवणूक करु नका, अन्यथा नुकसान होऊ शकते. तुमचे उत्पन्न वाढवण्यासाठी नवीन पर्याय शोधा. यामुळे तुमची आर्थिक स्थिती सुधारेल.

**मिथुन :** कोणतीही व्यावसायिक डील साइन करण्यापूर्वी, कागदपत्रे नीट वाचा, अन्यथा नुकसान होऊ शकते. आज स्वत: ची विशेष काळजी घ्या. विचारपूर्वक पैसे खर्च करा.

**कर्क :** जीवनात आज मोठे बदल होऊ शकतात. व्यावसायिक जीवनात नवीन संधी मिळतील. आर्थिक स्थिती चांगली राहील. कायदेशीर बाबींमध्ये तुम्हाला विजय मिळेल.

**सिंह :** आजचा दिवस शुभ आहे. तुमची सर्व स्वप्ने पूर्ण होतील. थांबलेली कामे पुन्हा सुरू होतील. कौटुंबिक जीवनात सुख-शांती कायम राहील. आरोग्य चांगले राहील. ऑफिसमध्ये तुमची कामगिरी उत्कृष्ट राहील.

**कन्या :** आज महत्त्वपूर्ण कामांची जबाबदारी मिळेल. दिवस आनंददायी असेल. कौटुंबिक जीवनात सुख मिळेल. सामाजिक कार्यात आवड निर्माण होईल. व्यावसायिक जीवनात चांगले परिणाम मिळतील.

**तुळ :** तुम्ही कुटुंबासोबत सहलीची योजना बनवू शकता. आज तुम्हाला कुटुंबाचा पाठिंबा मिळेल. करिअरमधील अडथळ्यांपासून मुक्ती मिळेल. प्रेम जीवनात रोमान्स वाढेल.

**वृश्चिक :** दिवस सामान्य आहे. ऑफिसमध्ये तुम्हाला नवीन कामाची जबाबदारी मिळेल. शैक्षणिक कामात नवीन यश मिळेल. तुम्ही कुटुंब किंवा मित्रांसोबत कुठेतरी जाण्याचा विचार करू शकता.


**धनु :** तुमच्या जीवनात ऊर्जा आणि उत्साह भरलेला असेल. उत्पन्नाच्या नवीन स्रोतांद्वारे तुम्हाला पैसे मिळतील. आर्थिक स्थिती मजबूत होईल. कुणालाही उसणवार देवू नका.

**मकर :** आर्थिक बाबतीत सावध रहा. विचारपूर्वक पैसे खर्च करा. नोकरी आणि व्यवसायात कोणावरही आंधळेपणाने विश्वास ठेवू नका. प्रेम जीवनात, आपल्या जोडीदाराच्या गोपनीयतेची काळजी घ्या.

**कुंभ :** आजचा दिवस वरदानासारखा आहे. आज तुमचे ऑफिसमध्ये, घरात नेतृत्वाच्या कौशल्याचे कौतुक होईल. आज पैसे मिळण्याचीही शक्यता आहे. भौतिक सुखसोयी वाढतील.

**मीन :** तुम्ही तुमच्या प्रेम जीवनातील क्षणांचा आनंद घ्याल. व्यावसायिक जीवन चांगले राहील. नोकरीत प्रमोशन होईल. तसेच पगारही वाढेल. जोडीदाराच्या मदतीने तुमची अधिक प्रगती होईल

# शब्दकोडे क्रमांक २२१०



**आडवे शब्द :-**
१) तुरुंग
६) लिहिण्यावाचण्याची क्षमता
११) मऊ
१२) रुची
१४) लांबचा आप्तसंबंध
१६) एक जुनी लेखणी
१८) अकारण
१९) वाकणे, वाकण्याची क्रिया
२०) पर्जन्य
२१) कौतुक
२४) अस्वस्थता, तडफड
२६) बारा वर्षांचा काळ
२८) एक पर्वत
३०) उपभोगण्यास अयोग्य
३१) मिंधा
३२) संरक्षक भिंत
३३) विरोध
३५) आठवण
३६) मीठ
३८) चांदी
४०) म गांधीजींचे नाव
४३) रागीट
४५) ओटा, कट्टा
४७) वीरमरण
४९) सोपा, उसाच्या चरकाचे वरचे तकट
५१) वाळपट
५२) मोजकेपणा, मितता
५४) गावातील जुनी वस्ती
५६) रक्कम
५८) पाणी
५९) हिंदीत धडा
६०) अंगमेहनत
६५) दुर्दशा
६३) मोठ्ठी गंमत, मौज
६४) बांबू
६५) दह्याचे पातळसर पेय
६६) दमणे
६८) डोंगर
६९) चित्रपटाचा पडदा
७२) हिंदीत शपथ
७३) गाणे
७४) अपशकुन
७६) रणांगण
७७) दृष्टी
७८) किंवा
७९) सैन्यदल

**उभे शब्द :-**
१) बेलाशक, बेफिकीरपणे
२) पुरुष
३) उचल्या, भुरट्टेचोर
४) टिंगल
५) मांडणी
७) जैन साधू
८) दांत
९) राजा हरिश्चंद्राची पत्नी
१०) घर
१३) वकिलाचे काम
१५) रम्य
१७) ललाट
१८) विसराळू
२२) कोळशाचे दुकान
२३) उणीव
२५) भ्रमर
२७) पळून जाणे
२९) केसांची बट
३३) तडीपार
३४) तरतूद
३५) च्या बरोबर
३७) चाटून खाण्याचे (औषध)
३९) होडी
४०) मुक्ता, शिंपल्यातील रत्न
४१) काकुळतेने याचना करणे
४२) मनाला टोचणारे दुःख
४४) उच्च, श्रेष्ठ
४६) चंद्र
४८) कल्ला, गडबड
५०) प्राणान्तिक वेदना
५३) दुसरा, अन्य
५५) प्रभात
५७) श्रम, मेहनत
५९) पूर्ण ऐक्य,
६१) छिद्र
६३) कोथिंबीरीचे बी
६४) काठ, बाजू
६५) थाळी
६७) वाळवी
६८) प्रस्थान करणे
७०) पडदा
७१) वाळा
७२) न्यून
७३) शीतल
७५) किंमत

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर






## कर्करोगाचा धोका कमी करणे शक्य

पूर्वी प्रौढांना कर्करोगाचा धोका जास्त असायचा; पण आज सर्वांनाच त्याचा धोका आहे. आपल्या सर्वांना माहीत आहे, की शरीरासाठी जीवनसत्त्वे आवश्यक आहेत; परंतु अलिकडच्या एका मोठ्या संशोधनातून हे स्पष्ट झाले आहे, की विशिष्ट जीवनसत्त्वाचा डोस कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यूचा धोका मोठ्या प्रमाणात कमी करू शकतो. व्हिटॅमिन डी हे ते जीवनसत्व आहे. व्हिटॅमिन डी २ आणि व्हिटॅमिन डी ३ हे त्याचे दोन प्रकार आहेत.




घ्या काळजी

डॉ.सतीश सोनवणे

**व्हिटॅमिन डी २ आणि डी ३ मध्ये काय फरक?**

व्हिटॅमिन डी २ बहुतेकदा मानवांनी बनवले जाते आणि अन्नात जोडले जाते. दुसरीकडे, व्हिटॅमिन डी ३ आपल्या त्वचेत सूर्यप्रकाशापासून बनवले जाते आणि मासे, अंडी यांसारख्या प्राण्यांपासून बनवलेल्या अन्नातदेखील आढळते. संशोधनात वारंवार सिद्ध झाले आहे की व्हिटॅमिन डी ३ शरीरात व्हिटॅमिन डीची पातळी वाढवण्यासाठी डी २ पेक्षा अधिक प्रभावी आहे.

**संशोधनात काय आढळले?**

'केएसआर'मध्ये प्रकाशित झालेल्या अहवालानुसार, व्हिटॅमिन डी सप्लिमेंट्स घेतल्याने प्रौढांमध्ये मृत्यूचा धोका कमी होतो का यावर अलिकडच्या एका मोठ्या अभ्यासात लक्ष देण्यात आले. यासाठी ५२ जुन्या अभ्यासांचा आढावा घेण्यात आला. त्यात ७५ हजारांहून अधिक लोकांचा समावेश होता. निकालात आढळून आले, की व्हिटॅमिन डी सप्लिमेंट्स घेतल्याने सर्व कारणांमुळे होणाऱ्या मृत्यूचा धोका कमी होत नाही. हृदयरोगामुळे होणारे मृत्यू, हृदयरोगाव्यतिरिक्त इतर कोणत्याही आजाराने होणारे मृत्यू कवा कर्करोगाव्यतिरिक्त इतर मृत्यूच्या बाबतीत कोणताही महत्त्वाचा फरक दिसून आला नाही.

**मृत्यूचा धोका कमी झाला**

कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यूचा धोका लक्षणीयरीत्या कमी झाला. संशोधनानुसार, व्हिटॅमिन डी सप्लिमेंट्स घेतल्याने कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यूचा धोका सुमारे १६ टक्क्यांनी कमी झाला. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे व्हिटॅमिन डी ३ घेणाऱ्यांमध्ये डी २ घेणाऱ्यांपेक्षा सर्व कारणांमुळे होणाऱ्या मृत्यूचा धोका खूपच कमी असल्याचे आढळून आले. संशोधकांचे म्हणणे आहे की केवळ व्हिटॅमिन डी ३ घेतल्याने एकूण मृत्यूचा धोका कमी होईल असे म्हणणे अकाली ठरेल; परंतु हे स्पष्ट आहे, की ते कर्करोगामुळे मृत्यूचा धोका कमी होतो. या कारणास्तव, शास्त्रज्ञ मोठ्या प्रमाणात अधिक अभ्यास करण्याचा सल्ला देत आहेत.

**व्हिटॅमिन डी महत्त्वाचे का आहे?**

व्हिटॅमिन डी केवळ हाडे आणि रोगप्रतिकारक शक्तीसाठीच महत्त्वाचे नाही, तर ते अनेक गंभीर आजारांना प्रतिबंधित करण्यासदेखील मदत करू शकते. त्याच्या कमतरतेमुळे थकवा, स्नायू दुखणे, हाडे कमकुवत होणे आणि वारंवार आजार होऊ शकतात. जर तुम्हाला तुमच्या आहारातून कवा पूरक आहारातून पुरेसे व्हिटॅमिन डी, विशेषतः डी मिळत असेल, तर दीर्घायुष्य आणि चांगल्या आरोग्यासाठी हा एक चांगला मार्ग असू शकतो.


## पित्ताशयातील खड्यांची समस्या

अनेकदा पोटात तीक्ष्ण कवा तीव्र वेदना जाणवत असतील, तर फक्त गॅस कवा अपचन आहे असे समजून त्याकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. कधीकधी ही वेदना शरीरात लपलेल्या गंभीर समस्येचे लक्षण असते. विशेषतः जर वेदना पोटाच्या वरच्या उजव्या भागात असेल, पाठीवर कवा खांद्यावर पसरत असेल आणि खाल्ल्यानंतर अधिक वाढत असेल, तर ती पित्ताशयाच्या दगडाचे लक्षण असू शकते.

पित्ताशयाच्या खड्यांच्या सुरुवातीच्या लक्षणांमध्ये पोटाच्या वरच्या उजव्या भागात वेदना सर्वात सामान्य जाणवते. ही वेदना कधी कधी छाती, पाठ कवा उजव्या खांद्यावर पसरू शकते. जड कवा तेलकट अन्न खाल्लयानंतर वेदना जास्त वाढते. काही प्रकरणांमध्ये, रुग्णाला मळमळ, उलट्या आणि अपचन देखील होऊ शकते.

**पित्ताशयाच्या खड्यांची मुख्य लक्षणे**

*पोटाच्या वरच्या उजव्या भागात तीव्र वेदना
*मागे कवा खांद्यापर्यंत पसरणाऱ्या वेदना
*मळमळ आणि उलट्या
*अपचन आणि पोटफुगी
*ताप आणि थंडी वाजून येणे



व्याधी विचार

डॉ. महेश दळे

**पित्ताशय खड्यांची कारणे**

*उच्च कोलेस्टेरॉल
*लठ्ठपणा येणे
*हार्मोनल बदल
*तेलकट आणि मसालेदार अन्नाचे जास्त सेवन
*फास्ट फूड आणि प्रक्रिया केलेले अन्न सेवन
*निर्जलीकरण आणि दीर्घकाळ उपवास

**चाचण्या आणि उपचार**

ही लक्षणे जाणवत असतील तर उशीर करू नका आणि ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधा अल्ट्रासाऊंड ही पित्ताशयाच्या खड्यांची पुष्टी करण्यासाठी सर्वात सोपी आणि अचूक चाचणी आहे.

**उपचार**

सुरुवातीच्या टप्प्यात आहार नियंत्रण आणि औषधे आराम देऊ शकतात; परंतु मोठ्या कवा जास्त खड्यांसाठी, शस्त्रक्रिया (लॅपरोस्कोपिक कोलेसिस्टेक्टोमी) हा शेवटचा पर्याय आहे

**प्रतिबंधात्मक उपाय**

*तेल आणि चरबीयुक्त पदार्थांचे सेवन कमी करा
*नियमित व्यायाम करा, पुरेसे पाणी प्या
*फळे, भाज्या आणि फायबरयुक्त आहार घ्या
*जास्त वेळ उपाशी राहू नका

पोटाच्या वरच्या उजव्या भागात वारंवार वेदना होत असतील तर ताबडतोब अल्ट्रासाऊंड करा आणि योग्य उपचार सुरू करा. वेळेवर तपासणी आणि उपचार केल्याने वेदना कमी होतातच, शिवाय मोठ्या गुंतागुंती टाळता येतात.

## पर्याय मधल्या वेळच्या खाण्याचे...

वजन कमी करणं सोपं नसतं. यासाठी कमी कॅलरी खाऊन अधिक कॅलरी खर्च करणं गरजेचं असतं. म्हणूनच आपल्या आहारात कमी कॅलरीयुक्त पदार्थांचा समावेश असायला हवा. त्यातही दोन जेवणांच्या मध्ये चहाच्या वेळी आरोग्यदायी असं काही तरी खायला हवं. मधल्या वेळच्या खाण्याचे हे काही पर्याय...



काय खावं?

* सुका मेवा हा मधल्या वेळच्या खाण्याचा खूप चांगला पर्याय आहे. शेंगदाणे, चणे, बदाम, काजू, आक्रोड, बेदाणे, पिस्ते असे असंख्य पर्याय या वेळच्या खाण्यामध्ये आहेत. सध्या विविध प्रकारच्या बियाही मिळतात. या बियाही तुम्ही खाऊ शकता. सुक्या मेव्यामुळे पोट बराच काळपर्यंत भरलेलं राहील.

* चहाऐवजी उकडलेली अंडी खावीत. अंड्यांमधून तुम्हाला प्रथिनं मिळू शकतात. न्याहरीलाही उकडलेली अंडी खाता येतील.

* मधल्या वेळी प्रथिनयुक्त पदार्थ खाता येतील. वजन कमी करण्याच्या प्रक्रियेत प्रथिनांना प्रचंड महत्त्व आहे. प्रथिनांमुळे स्नायू बळकट होतात. म्हणूनच अशा पदार्थांचा समावेश आहारात करता येईल.

* तुम्ही पनीरचे पदार्थही खाऊ शकता. बाजारात मिळणाऱ्या लो फॅट पनीरचा वापर करता येईल. पनीर मर्यादित प्रमाणात खाल्ल्याने बरेच लाभ मिळतील. पनीर हा दुग्धजन्य पदार्थ असल्यामुळे भरपूर प्रथिनं मिळतील.

## स्मरणशक्ती वाढवण्यासाठी...

स्मरणशक्ती सुधारण्यासोबतच एकाग्रता वाढवायची असेल तर तुम्ही काही आयुर्वेदिक उपाय करू शकता.



आयुर्वेद आणि विकार

* मेडिटेशन म्हणजे ध्यानधारणा. मानसिक आरोग्य उत्तम राखायचं असेल तर मेडिटेशन करायला हवं. मेडिटेशनमुळे शारीरिक आरोग्यही चांगलं राहतं. दिवसभरात फक्त दहा मिनिटं मेडिटेशन केल्यामुळे बुद्धी तल्लख होते तसंच मेंदू अधिक सक्षम होतो. मेडिटेशन करताना आपण श्वसनावर लक्ष केंद्रित करतो. यामुळे एकाग्रता वाढायला मदत होते. परीक्षेच्या काळात मुलांवर खूप ताण येतो. मेडिटेशनमुळे ताण कमी होऊ शकतो.

* मेंदूला चालना देण्यासाठी अगदी सोपा उपाय करता येईल. विविध क्रिया करताना नेहमीच्या हाताऐवजी दुसऱ्या हाताचा वापर करा. उजव्या लोकांना खाण्यासाठी कवा दात घासण्यासाठी डाव्या हाताचा वापर करता येईल तर डावखुरे लोक उजव्या हाताने काही कामं करू शकतील.

* शरीरातल्या विविध अवयवांना, त्यातही मेंदूला उत्तम रक्तपुरवठा झाला की त्याचं कार्य सुधारतं. मेंदूला अधिक रक्तपुरवठा करण्यासाठी काही व्यायामपकार करता येतील. काही योगासनांमुळेही मेंदूला होणाऱ्या रक्तपुरवठ्यात वाढ होऊ शकते.

* शरीरासोबतच मानसिक आरोग्यावरही आपल्या आहाराचा परिणाम होत असतो. मेंदूलाही खाद्य हवं असतं.


## शास्त्रज्ञांनी ओळखला अंडाशयाचा कर्करोग

कधी कधी जीव वाचवण्याची सर्वात मोठी गुरुकिल्ली म्हणजे वेळेत रोग ओळखणे; परंतु काही आजार असे असतात, जे शांतपणे वाढत राहतात आणि समोर येतात, तेव्हा खूप उशीर झालेला असतो. अंडाशयाचा उच्च-श्रेणीचा सेरस कार्सिनोमा (एचडीएससी) हा देखील असाच एक कर्करोग आहे, जो महिलांमध्ये सर्वात प्राणघातक प्रकारांपैकी एक मानला जातो. तथापि, आता शास्त्रज्ञांनी त्याचे मूळ ओळखले आहे.

महिलांमध्ये मृत्यूच्या बाबतीत ओव्हेरियन कर्करोग सहाव्या क्रमांकावर येतो. बहुतेक महिला निदान झाल्यानंतर पाच वर्षांपेक्षा जास्त काळ जगत नाहीत. कारण असे आहे, की सुरुवातीच्या टप्प्यात त्याची लक्षणे जवळजवळ नगण्य असतात आणि त्यासाठी कोणत्याही विश्वसनीय चाचण्या नाहीत.

**कर्करोगाचे मूळ काय आहे?**

शास्त्रज्ञांना बराच काळ असा संशय आहे, की 'एचजीएससी' प्रत्यक्षात अंडाशयात नव्हे, तर फॅलोपियन ट्यूबमध्ये सुरू होते; परंतु नेमके कुठे आणि कसे, हे स्पष्ट नव्हते. कॉर्नेल विद्यापीठाचे डॉ. अलेक्झांडर निकितिन यांनी केलेल्या संशोधनातून असे दिसून आले, की फॅलोपियन ट्यूबमधील एक विशेष प्रकारची पेशी, प्री-सिलिएटेड ट्यूबल एपिथेलियल पेशी या कर्करोगाची सुरुवात करतात. या पेशी स्टेम पेशी आणि पूर्णपणे विकसित सिलीएटेड पेशींमधील संक्रमण अवस्था आहेत. कर्करोग प्री-सिलिएटेड पेशींपासून होतो. पूर्वी असे मानले जात होते, की स्टेम पेशी या कर्करोगासाठी जबाबदार आहेत; परंतु या संशोधनात शास्त्रज्ञांना असे आढळून आले, की जेव्हा कर्करोग रोखणारे दोन महत्त्वाची जनुके टीपी ५३ आणि आरबी १, स्टेम पेशींमध्ये बंद केले जातात, तेव्हा ते कर्करोगग्रस्त झाले नाहीत, तर मरतात. उलटपक्षी, प्री-सिलिएटेड पेशींमध्ये हीच जनुके बंद केली जातात, तेव्हा कर्करोग तयार होऊ लागतो.



आरोग्य तंत्रज्ञान

डॉ. कुंदन गायकवाड

## केस खाण्याची वाईट खोड

एखाद्या मुलाने स्वतःचे केस स्वतः खाल्ले तर काय होईल? हे विचित्र वाटते; पण ही एक आणि गंभीर वैद्यकीय स्थिती आहे, ज्याला 'रॅपन्झेल सड्रोम' म्हणतात. ही केवळ एक विचित्र सवय नाही तर मानसिक आणि शारीरिक आरोग्याशी संबंधित एक धोकादायक समस्या आहे, जी मुलांवर आणि कधीकधी प्रौढांवरदेखील परिणाम करू शकते.



आरोग्य सवयी

डॉ. मेघा पठारे

**समस्या का उद्भवते?**

ही समस्या मानसिक ताण, चता, राग, भावनिक आघात कवा बालपणातील कोणत्याही मानसिक परिणामामुळे होऊ शकते. काही प्रकरणांमध्ये, ती ऑब्सेसिव्ह-कंपल्सिव्ह डिसऑर्डर (ओसीडी) चा देखील एक भाग आहे. राग आणि तणावात स्वतःला शांत करण्यासाठी, मुले केस उपटून खातात लक्षाचा अभाव, एकटेपणा कवा भावनिक दुर्लक्ष हेदेखील याचे कारण असू शकते. कधीकधी ही सवय इतकी वाढते, की मूल ते थांबवू शकत नाही.

**धोके किती गंभीर आहेत?**

* पोटदुखी आणि उलट्या होऊ शकतात
* पचनसंस्थेत अडथळा येऊ शकतो.
* वजन कमी होते आणि अशक्तपणा येऊ शकतो
* गंभीर प्रकरणांमध्ये आतड्यांतील फाटण्याचा धोका असतो, जो घातक ठरू शकतो.

**लक्षणे कशी ओळखावी?**

* वारंवार केस ओढणे
* केस चावणे कवा गिळणे
* पोटदुखी, उलट्या कवा भूक न लागण्याच्या तक्रारी
* अचानक वजन कमी होणे

**उपचार आणि प्रतिबंध**

'रॅपन्झेल सड्रोम'वर शारीरिकच नाही, तर मानसिक उपचारदेखील उपलब्ध आहेत.


**मानसिक थेरपी**

* संज्ञानात्मक वर्तणूक थेरपी (सीबीटी) समुपदेशन
* मुलाच्या भावना समजून घेणे.

## सवयी चांगल्या असल्या तरी...

निरोगी आणि आनंदी जीवन जगण्यासाठी काही चांगल्या सवयी अंगी बाणवणं गरजेचं असतं. मात्र या चांगल्या सवयींचा अतिरेक होता कामा नये. एखादी सवय चांगली आहे म्हणून आपण तिचा अतिरेक करतो. मात्र याचे दुष्परिणाम होऊ शकतात. आपल्याकडून अजाणतेपणी या चुका घडतात. कोणत्या सवयींमुळे आपण अडचणीत येऊ शकतो? जाणून घेऊ.

* शरीराला जीवनसत्त्वं, खनिजं यांची खूप गरज असते. पण त्यांचं प्रमाण मर्यादित असायला हवं. गरजेपेक्षा अधिक जीवनसत्त्वं शरीरात गेल्यास बरेच दुष्परिणाम दिसून येतात. ठराविक प्रमाणापेक्षा चारपट अधिक जीवनसत्त्वांचं सेवन केल्यास कर्करोग होऊ शकतो, असं काही संशोधनांमधून समोर आलं आहे. म्हणूनच जीवनसत्त्वांच्या गोळ्या घेताना अधिक काळजी घ्यायला हवी.



कुठे चुकतो आपण?

* अनेकजण दिवसातून तीन ते चार वेळा दात घासतात. मात्र ही सवय चुकीची आहे. सातत्याने दात घासत राहिल्यामुळे दातांवरचा इनॅमलचा थर कमी होतो. सततच्या दात घासण्यामुळे १० ते २० टक्के प्रौढांचे दात खराब होतात. दात घासण्यासाठी शक्यतो सौम्य टूथब्रशचा वापर करावा. दिवसभरात फक्त दोन वेळा हलक्या हातांनी दात घासावेत.

* पोटाचं आरोग्य चांगलं राखण्यासाठी तंतूमय पदार्थ म्हणजे फायबर खाण्याचा सल्ला दिला जातो. अनेकजण गरजेइतकं फायबरही खात नाहीत. मात्र फायबरचं प्रमाण अचानक वाढवल्यास गॅसेसची समस्या उद्भवू शकते. तसंच पोट फुगल्यासारखं वाटू शकतं. फायबरचं पमाण टप्प्याटप्प्याने वाढवावं. एकाच वेळी भरपूर फायबर खाऊ नये. पांढऱ्या ब्रेडऐवजी गव्हाचा ब्रेड खावा. बटाटा वेफर्सऐवजी सफरचंदाचं सेवन करावं. अशा छोट्या बदलांनी फायबरचं प्रमाण वाढवावं.

* खूप झोपणंही चुकीचं आहे. दररोज नऊ तासांपेक्षा अधिक काळ झोपणाऱ्या लोकांना भविष्यात स्मृतीभ्रंशाचा धोका निर्माण होऊ शकतो, असं काही अभ्यासांमधून समोर आलं आहे.

## उचकीचा गंभीर आजाराशी संबंध

उचकी लागली तर कोणीतरी आठवण काढत असेल असे आपण म्हणतो; परंतु वारंवार सारख्या येणाऱ्या उचकीचा संबंध गंभीर आजाराचा संकेतदेखील असू शकतो. सर्वसाधारणपणे उचकी काही मिनिटांसाठी असते आणि आपोआप ती जाते; परंतु ही उचकी ४८ तासांहून अधिक वेळ येत असेल, तर तिच्याकडे दुर्लक्ष करणे धोकादायक होऊ शकते.

**उचकी का येते ?**

संशोधनाच्या नुसार उचकी डायाफ्राम नावाच्या मांसपेशीच्या अचाकन आंकुचन पावल्याने होते. डायाफ्राम हे फुफ्फुस आणि पोटाच्या दरम्यान असते. ते श्वास घेण्यास मदत करत असते, जेव्हा ही मांसपेशी वा स्नायूपेशी अनियंत्रितपणे आकुंचन पावते, तेव्हा व्होकल कॉर्ड बंद होते आणि उचकीचा 'हिक' सारखा आवाज निर्माण होतो.

**उचकी येण्याची कारणे**

* खूप घाई-घाईत जेवणे कवा पिणे
* कार्बोनेटेड ड्रक्स आणि अल्कोहोल
* मसालेदार जेवण
* खूप हसणे कवा च्युईंगम चावणे
* ज्यादा हंसना या च्यूइंग गम चघळणे
* अचानक तापमान बदलणे

ही सर्वसामान्य कारणे उचकीला जबाबदार असतात. त्यात घाबरण्यासारखे काही नाही



आरोग्यमंत्र

संजय मुरुमकर

**डॉक्टरांचे म्हणणे काय?**

तज्ज्ञ डॉक्टरांच्या मते वारंवार उचकी येते आणि लवकर थांबत नाही, तेव्हा हा शरीराचा सिग्नल असू शकतो. अनेकदा गॅसेस वा जेवण गिळण्याने नाही, तर आतील एखाद्या रोगामुळे वा पेशींचे तंत्र गडबड झाल्याचेही लक्षण असू शकते. वारंवार उचकी येणे पोट कवा लिव्हर खराबीचे वा ब्रेन नर्व्हसंबंधी समस्येची सुरुवात असू शकते.

**उचकी केव्हा होते खतरनाक?**

सतत ४८ तासांहून अधिक वेळ उचकी येत असेल तर त्यास 'Perrirtent "hiccup"' असे म्हटले जाते. हे एक महिने चालल्यास Inrtabtable "hiccup" म्हणतात. त्यामुळे झोप, जेवण आणि रोजचे दैनंदिन जीवन अस्थिर होऊ शकते.

**खूप काळ उचकी येण्याची कारणे**

**नर्व्ह समस्या :** वॅगस वा फ्रेनिक नर्व्हमध्ये जखम कवा सूज

**मेंदूशी संबंधित आजार :** स्ट्रोक, मेंदूचा ट्युमर, मेनजायटीस

**पचन तंत्राची गडबड :** एसिड रिफ्लक्स (जीईआरडी), अल्सर, पँक्रियायटिस

**लिव्हर खराब होणे**

फुफ्फुस आणि हृदयाचा रोग : न्यूमोनिया, पेरिकार्डायटिस

### नवसंशोधन


#### सर्वात प्रभावी प्रतिजैविक!

प्रतिजैविकांमुळे बॅक्टेरियांचा नाश होतो. म्हणूनच बॅक्टेरियांमुळे उद्भवणाऱ्या व्याधींच्या निवारणासाठी प्रतिजैविकं दिली जातात. मात्र गेल्या काही वर्षांमध्ये प्रतिजैविकांचा प्रभाव कमी होत असल्याचं दिसून आलं. अनेक बॅक्टेरिया प्रतिजैविकांना प्रतिकार करू लागले. याच कारणामुळे अनेक व्याधींवर उपचार करणं कठीण होऊन बसलं आहे. प्रतिजैविकांना प्रतिकार करणारा क्षयरोग अत्यंत घातक आजार आहे. म्हणूनच प्रतिजैविकांची क्षमता वाढवण्याची गरज आहे. याच प्रक्रियेत मैलाचा दगड ठरावा, असा शोध अमेरिकेतल्या शास्त्रज्ञांनी लावला आहे. शास्त्रज्ञांनी कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करून नवं प्रतिजैविक तयार केलं आहे.




### डोळ्यांचं आरोग्य

#### डोळे सुजतात?



बरेचदा झोपून उठल्यानंतर डोळे सुजल्यासारखे वाटतात. डोळ्यांच्या खाली असणाऱ्या त्वचेला जडत्व आलेलं असतं. यावर बरेचदा वरवरचे उपाय केले जातात. कॉस्मेटिक उत्पादनांच्या वापरामुळे ही समस्या कमी होत नाही. त्यांचा प्रभाव तात्पुरता असतो. डोळे सुजल्यामुळे तुम्ही वयापेक्षा मोठे दिसू लागता, वार्धक्य आल्यासारखं वाटतं. डोळे जड झाल्यामुळे उत्पादकतेवर परिणाम होतो. उत्साह कमी होतो. सतत दमल्यासारखं वाटतं. अंतर्गत दोषांमुळे कवा जीवनसत्त्वांच्या कमतरतेमुळे डोळे सुजल्यासारखे दिसतात. या समस्येवर आहाराद्वारे नियंत्रण मिळवता येऊ शकतं. कोरडेपणामुळे डोळे जड होतात. म्हणून भरपूर पाणी प्यावं. रसाळ फळं खावीत.

### जपणूक त्वचेची

#### वय वाढल्याच्या खुणा...



त्वचेचं आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी योग्य सौंदर्यप्रसाधनांची निवड करायला हवी. बाजारात असंख्य फेसवॉश मिळतात. प्रत्येकाचे गुणधर्म वेगवेगळे असतात. तजेला टिकवून ठेवण्यासाठी त्वचेच्या प्रकारानुसार फेस वॉश निवडावा. कोरडी त्वचा असणाऱ्यांनी त्वचेला ओलावा देणाऱ्या फेसवॉशची निवड करावी. त्वचा कोरडी असल्यास क्रीमी फेसवॉशचा वापर करावा. या फेसवॉशमुळे मेक अप, त्वचेतली घाण, धूळ निघून जायला मदत होईल. तेलकट त्वचेसाठी सॅलिसिस्टिक ॲसिड, कोरफड आणि टी ट्री ऑईलयुक्त फेस वॉश वापरावा. जेलयुक्त फेसवॉशचा वापर करता येईल. सर्वसामान्य त्वचा कवा दोन्ही प्रकारच्या त्वचेचं मिश्रण असेल तर अरोमायुक्त फेसवॉश वापरून बघावा.

### आजीबाईचा बटवा

#### लसूण रिकाम्या पोटी खाल्ल्याने...



लसणात अनेक औषधी गुणधर्म असतात. म्हणूनच रिकाम्या पोटी लसूण खायला हवा. उच्च रक्तदाब असणाऱ्यांनी दररोज सकाळी रिकाम्या पोटी लसूण खावा. लसणामुळे हृदयाचं आरोग्य चांगलं राहतं. लसणामुळे कोलेस्टरॉल कमी व्हायला मदत होते. हृदयरोग टाळण्यासाठी लसूण खावा. मध आणि लसूण एकत्र खाल्ल्यामुळे रक्ताभिसरण सुधारतं. पोटाच्या समस्यांवरही लसूण गुणकारी आहे. गॅस, ॲसिडिटीसारख्या समस्या लसणामुळे दूर होतात. ॲसिडिटी दूर करण्यासाठी भाजलेला लसूण खाण्याचा सल्ला दिला जातो. बद्धकोष्ठतेवरही लसूण गुणकारी आहे. पोटाच्या तक्रारी दूर करण्यासाठी सकाळी लसूण खावा. लसणात बॅक्टेरियाविरोधी आणि दाह कमी करणारे गुणधर्म असतात.

# ओबीसींच्या हितांना कुठेही धक्का नाही

## ओबीसी नेते बबनराव तायवाडे यांचा दावा



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी मराठा आरक्षणाशी संबंधित सरकारने काढलेल्या जीआरमुळे ओबीसी समाजाचे कोणतेही नुकसान झाले नसल्याचा दावा केला आहे.

जेवढे नेते तेवढ्या व्यक्ती. प्रत्येकाचा अभ्यास वेगवेगळा असू शकतो. पण आमच्या मते या प्रकरणी कोणतेही नुकसान झाले नाही. तरीही या प्रकरणी गरज भासली तर कोर्टात दाद मागितली जाईल, असे ते म्हणालेत.

मनोज जरांगे यांच्या आझाद मैदानावरील बेमुदत उपोषणाची मंगळवारी यशस्वी सांगता झाली. सरकारने जरांगे यांच्या जवळपास सर्वच मागण्या मान्य करून त्यांची मुंबईतून पाठवणी केली. त्यानंतर आता सरकारच्या निर्णयाची सर्वच अंगाने चाळणी होत आहे. ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनीही या मुद्यावर आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

नातेसंबंध उल्लेख या शब्दावर संभ्रम ते म्हणाले, राज्य सरकारने काल शासननिर्णय काढून उपोषणकर्त्यांना दिला. त्यामुळे त्यांचे समाधान झाले. त्यांनी आपले उपोषण मागे घेतले. हा निर्णय आमच्या हाती पडल्यानंतर आम्ही आमच्या राष्ट्रीय ओबीसी संघाच्या पदाधिकाऱ्यांसह तज्ज्ञांशी प्रदिर्घ चर्चा केली.

सरकारच्या जीआरनुसार, वडिलांच्या नातेसंबंधातील एखाद्या व्यक्तीला कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळाले असेल, तर त्याला दावा करणारा व्यक्ती आपल्या नातेसंबंधातील, कुळातील असल्याचे प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल. या प्रकरणी नातेसंबंध उल्लेख या शब्दावर संभ्रम आहे. यावर काहीजण आक्षेप नोंदवत आहेत.

बबनराव तायवाडे यांनी यावेळी एखादा आंतरजातीय विवाह झाला तर सासू - सासरे असे नाते जोडता येईल का? या प्रश्नाचेही उत्तर दिले.

जातीचा दाखला काढणे व त्याची वैधता तपासणे या दोन बाबतीत नातेसंबंध म्हणजे वडिलोपार्जित नातेवाईका कडून पितृसत्ताक पद्धतीमध्ये जे नातेवाईक येतात तेच नातेवाईक. हा जनरल जीआर नाही. शासन निर्णय आहे. तो जातप्रमाणपत्र किंवा जातीची वैधता तपासण्यासाठी आहे. या प्रकरणी २००० साली, २०१२ व २०२४ मध्ये अधिनियम निघाला आहे. त्यात प्रत्येक ठिकाणी वडिलोपार्जित असा उल्लेख करण्यात आला आहे. वडील, पणजोबा, खाबर पणजोबा यात तुम्ही बसत असाल तरच ओबीसी आरक्षण मिळेल, असे ते म्हणाले.

बबनराव तायवाडे यांनी यावेळी सरकारच्या निर्णयावर आपण समाधानी असल्याचेही यावेळी स्पष्ट केले. ते म्हणाले, आम्ही या प्रकरणी समाधानी आहोत. ओबीसी समाजाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाले नाही. जी प्रचलित पद्धत आहे, त्याच पद्धतीने जातप्रमाणपत्र घ्यावे लागणार आहे.

मी यापूर्वीही सांगिले आहे की, वडील, पणजोबा, खापरपणजोबा यांच्या महसुली किंवा शैक्षणिक कागदपत्रांमध्ये कुणबी - मराठा अशी नोंद असेल किंवा वंशावळीचे जे काही नातेसंबंध आहेत, कुणाकडे जातीचे प्रमाणपत्र असेल, वंशावळीत नातेसंबंधांत कुणबी प्रमाणपत्र असेल, तर तुम्हाला अर्ज करता येईल. पण या प्रकरणी मातृसत्ताक पद्धतीने प्रमाणपत्र मिळेल याचा कुठेही उल्लेख नाही.

या प्रकरणी प्रत्येकाचा वेगवेगळा अभ्यास असू शकतो. जेवढे नेते तेवढ्या व्यक्ती. काही शंका, कुशंका असू शकतात. पण आम्ही आतापर्यंत जो अभ्यास केला, त्यातून असा निष्कर्ष निघतो की, ओबीसींचे कोणतेही नुकसान झाले नाही. आम्ही आजही दिवसभर कायदेतज्ज्ञांशी सल्ला घेणार असल्याचे ते म्हणाले.

# एक कोटीचे झाड निघाले अकरा हजार चंदन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

यवतमाळ जिल्ह्यातील एका शेतकऱ्याच्या प्राचीन रक्तचंदनाच्या झाडाचा मोबदला म्हणून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रेल्वेला एक कोटी रुपये नुकसान भरपाई देण्याचे निर्देश दिले.

न्यायालयीन आदेशानंतर रेल्वेने एक कोटीची रक्कम जमा देखील केली. मात्र, आता ते झाड रक्तचंदनाचे नसून त्याची किंमत केवळ अकरा हजार असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे रेल्वेने न्यायालयात अर्ज दाखल संपूर्ण रक्कम व्याजासह परत करण्याची मागणी केली आहे.

वर्धा-यवतमाळ-पुसद-नांदेड रेल्वे प्रकल्पासाठी पुसद तालुक्यातील खर्शी गावातील शेतकरी केशव शिंदे यांची जमीन अधिग्रहित करण्यात आली. त्याची भरपाई मिळाली, मात्र रक्तचंदनाचे झाड, इतर झाडे आणि भूमिगत पाईपलाईनचा मोबदला नाकारण्यात आला. ८ फेब्रुवारी २०१८ रोजी पुसदच्या भूमी अधिग्रहण अधिकाऱ्याने झाडे व पाईपलाईनच्या मोबदल्याचा दावा फेटाळला. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करण्यात आला, परंतु त्यातूनही काही निष्पन्न झाले नाही. त्यामुळे याचिकाकर्त्यांनी झाडे व पाईपलाईनचे मूल्यांकन करून योग्य मोबदला देण्याचा आदेश देण्याची विनंती न्यायालयाकडे केली आहे.

न्यायालयात प्रकरण दाखल झाल्यावर रेल्वेने नुकसान भरपाई म्हणून एक कोटी जमा केले. न्यायालयाने यापैकी ५० लाख रुपये काढण्याची परवानगी शेतकऱ्याला दिली तसेच उर्वरित रक्कम झाडाच्या मूल्यांकनानंतर काढता येईल, असे स्पष्ट केले. जर मूल्यांकन कमी आले तर त्यानुसार याचिकाकर्त्यांना देय रक्कम दिली जाईल, आणि जास्त असल्यास उर्वरित रक्कम रेल्वेला न्यायालयात जमा करावी लागेल, असे निर्देश न्यायालयाने दिले होते.

यानंतर बंगळुरू येथील एका संस्थेमार्फत शास्त्रीय तपास करून अहवाल सादर करण्यात आला. या अहवालात संबंधित झाड बीजासालचे असून त्याची किंमत केवळ अकरा हजार असल्याचे स्पष्ट झाले. रेल्वेतर्फे ॲड. नीरजा चौबे यांनी हा अर्ज दाखल केला असून लवकरच न्यायालयात यावर सुनावणी होणार आहे.

### व्याजासह रक्कम परत करा

अहवाल प्राप्त झाल्यावर रेल्वेने नुकसान भरपाईची रक्कम परत देण्याबाबत न्यायालयात अर्ज दाखल केला. शेतकऱ्याने योग्य व्याजासह सर्व रक्कम परत करावी, अशी मागणी रेल्वेने केली आहे. रक्तचंदनाला चीन, जपान, सिंगापूरसह जगात मोठी मागणी आहे. हे अतिशय दुर्लभ झाड आहे.

# नराधम मुलाने घेतला जन्मदात्याचा जीव

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ३ :

नराधम मुलाने आपल्या जन्मदात्या पित्याला काठीने मारहाण करून दोरीने गळा आवळत निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना जिल्ह्यातील पिंजर पोलीस ठाण्यांतर्गत ग्राम टिटवा येथे घडली.

या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखा व पिंजर पोलिसांनी तपासाची सूत्रे वेगाने फिरवत पसार होण्याच्या मार्गावर असलेल्या आरोपीला काही तासांत अटक केली. बबन रामराव राऊत (वय ५५ वर्ष) असे मृतकाचे, तर नवनाथ बबन राऊत (वय २७ वर्ष) असे मारेकरी मुलाचे नाव आहे.

पिंजर पोलीस ठाण्यांतर्गत ग्राम टिटवा येथे बबन रामराव राऊत यांना त्यांचा मुलगा आरोपी नवनाथ बबन राऊत याने मध्यरात्रीच्या सुमारास काठीने बेदम मारहाण केली. नराधम मुलगा एवढ्यावरच न थांबता त्याने दोरीने गळा आवळून आपल्या जन्मदात्याची निर्घृण हत्या केली. कौटुंबिक वादातून ही हत्या झाल्याची माहिती आहे. त्यानंतर घटनास्थळावरून आरोपी फरार झाला. या घटनेची माहिती मृतकाचे भाऊ विनोद रामराव राऊत यांनी पिंजर पोलिसांना दिली.

पोलिसांनी घटनास्थळावर धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठविण्यात आला. विनोद राऊत यांच्या फिर्यादीवरून पिंजर पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीचा शोध घेण्यासाठी पिंजर पोलिसांचे तीन वेगवेगळे पथके तयार करून ते रवाना करण्यात आले. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सुद्धा शोध सुरू केला. वडिलांची हत्या करून आरोपी मुलगा रात्रभर शेतात दडून बसला होता.

पिंजर पोलीस व स्थागुशाच्या पथकाने कसून शोध घेतला. आरोपी वाशीम जिल्ह्यातील शेलू येथून संभाजीनगर, पुणेच्या दिशेने जात असताना पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या. आरोपीकडे मोबाइल नसल्याने त्याचा शोध घेणे आवाहनात्मक होते.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पिंजर पोलीस ठाण्याचे ठाणेदार गंगाधर दराडे, पीएसआय अभिषेक नवघरे, पीएसआय गोपाल जाधव, दशरथ बोरकर, गोकुळ चव्हाण, अन्सार शेख, स्वप्नील खेडकर, चालक मनीष ठाकरे, नामदेव मोरे, नागसेन वानखडे, गजानन काळे, प्रदीप धामणे, नागेश दंदी, नरहरी देवकते, भूषण मुखमले, भागवत गांजवे, मयूर खडसे, नजीर हुसैन, गणेश जानोरकर आदींच्या पथकाने केली.

# वाघाच्या हल्ल्यात वनमजुराचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ३ :

मेळघाटातील गुगामल वन्यजीव विभागांतर्गत धामणीखेडा बिटमध्ये गस्तीवर असलेल्या एका वनमजुरावर वाघाने केलेल्या हल्ल्यात त्याचा मृत्यू झाला. प्रेम मुन्ना कासदेकर (वय ३०) असे मृत मजुराचे नाव असून, त्याच्यासोबत असलेला त्याचा सहकारी आकाश कासदेकर सुदैवाने बचावला. ही घटना मंगळवारी रात्री घडली. आज सकाळी त्याचा मृतदेह आढळून आला.



गुगामल वन्यजीव विभागातील खोंगडा वतुळांत राजदेवबाबा कॅम्प आहे. या कॅम्पवर वनरक्षक आणि वनमजूर जंगलाची पाहणी करण्यासाठी मुक्कामी राहतात. प्रेम कासदेकर आणि आकाश कासदेकर हे दोघेही गेल्या तीन महिन्यांपासून या कॅम्पवर रोजंदारीवर काम करत होते.

ते दोघेही धामणीखेडा बिटमधील कंपार्टमेंट क्रमांक ९४४ मध्ये गस्तीसाठी गेले होते. दिवसभर त्यांनी कालिकुंडी कॅम्प आणि धामणीखेडा बिटची पाहणी केली. सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास ते दोघेही परत राजदेवबाबा कॅम्पकडे येत होते. काही वेळानंतर आकाशने मागे वळून पाहिले असता प्रेम दिसला नाही. त्याने प्रेमला आवाज दिला, आजूबाजूला शोधले, पण तो सापडला नाही. अंधार झाल्यामुळे काहीच दिसत नसल्याने घाबरलेला आकाश धावतपळत राजदेवबाबा कॅम्पवर पोहोचला आणि त्याने वनरक्षक व अधिकाऱ्यांना ही घटना सांगितली. रात्री प्रेमचा शोध लागला नाही.

बुधवारी (३ सप्टेंबर) सकाळी पुन्हा एकदा वनकर्मचारी आणि चिखलदरा पोलिसांनी शोधमोहीम सुरू केली असता, एका झुडुपात प्रेम कासदेकर यांचा मृतदेह आढळून आला.

वाघाने त्याच्या शरीरावर ओरबाडल्याच्या जखमा होत्या आणि त्याचा एक हातही नव्हता. मृतदेह कंपार्टमेंट ९४४ मधून मुख्य रस्त्यावर आणण्यात आला आणि शवविच्छेदनासाठी अचलपूर येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला.

# ४५६ फायली तपासण्यासाठी नेमले अवघे ४ कर्मचारी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :

राज्यभरात गाजत असलेल्या नागपूर जिल्ह्यातील शालार्थ आयडी घोटाळ्यात गणेश विसर्जनानंतर बोगस शिक्षकांवर कारवाईचा बॉम्ब फुटणार आहे. या संदर्भात आलेल्या दीडशे अर्जांची तपासणी आणि जबाब घेणे सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

शालार्थ आयडी घोटाळ्यात बनावट नियुक्तीपत्रावर झालेल्या ६८० शिक्षकांवर गणेश विसर्जनानंतर कारवाई होणार आहे. या शिक्षकांचा नियमित पगार निघत होता. शासनाची लाखो रुपयांची फसवणूक झाली. पगार म्हणून देण्यात आलेले हे पैसे वसूल करण्यासाठी भा.दं.वि. कलम १०७ अंतर्गत वसुलीसाठी प्रक्रिया सुरू करण्यासाठी न्यायालयात परवानगीसाठी अर्ज करण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

दिवंगत शिक्षणाधिकारी सोमेश्वर नैताम यांच्या सहीने नेमके किती बनावट नियुक्ती आदेश निघाले याची माहिती शिक्षण उपसंचालक कार्यालयाला पत्र देऊन मागितली आहे. यासाठी स्मरणपत्रही दिले आहे. या संबंधीचा सर्व रेकॉर्ड पुणे आयुक्त कार्यालयात पाठवण्यात आल्याचे उपसंचालक कार्यालयाचे म्हणणे आहे.

यापूर्वी मनुष्यबळ कमतरतेमुळे फायली तपासण्यास वेळ लागल्याने अहवाल वेळेत सादर होऊ शकला नव्हता. प्राथमिक शिक्षण विभागातील १०५५ फायली होत्या. त्यातील २४ फायली तपासायच्या आहेत. माध्यमिक शिक्षण विभागातील १०३६ पैकी २८० तपासायच्या राहिल्या होत्या. त्यापैकी ८० तपासल्या आहेत.

# मायलेकाची भरदिवसा हत्या

## वडिलांच्या हत्येचा घेतला सूड

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ३ :

गेल्या महिन्यात तुरूंगातून जामिनावर सुटलेल्या एका तरूणाची आणि त्याच्या आईची चाकूने वार करून निर्घृण हत्या करण्यात आल्याची घटना बुधवारी सकाळी तिवसा शहरात घडली. या दुहेरी हत्याकांडाने तिवसा हे तालुका मुख्यालय हादरून गेले आहे. अमोल वसंत डाखोरे (४०) आणि सुशीला वसंत डाखोरे (६५) अशी मृतांची नावे आहेत.

डाखोरे आणि अवझाड कुटुंबीय तिवसा येथील अशोक नगर परिसरात शेजारीच राहतात. त्यांच्यात जुने वैमनस्य आहे. गेल्या वर्षी मार्च महिन्यात सुधाकर अवझाड यांची हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात अमोल डाखोरे आणि संतोष निंघोट (दोघेही रा. अशोक नगर) हे दोघे आरोपी होते. या गुन्ह्यासाठी ते तुरूंगात होते. अमोल डाखोरे आणि संतोष निंघोट यांची न्यायालयाने जामीन मंजूर केल्याने तुरूंगातून गेल्या १३ ऑगस्ट रोजी सुटका झाली होती.

आरोपी रोहन सुधाकर अवझाड हा गेल्या वर्षभरापासून सूडाच्या भावनेने पेटला होता. बुधवारी सकाळी ९ वाजता रोहन हा अमोल डाखोरे याच्या घरी पोहचला. त्याने अमोलवर चाकूने वार केले. त्याला वाचविण्यासाठी अमोलची आई सुशीला आणि त्याचा लहान मुलगा दोघेही धावून गेले.

अखेर १८ वर्षांनी जामिनावर तुरुंगाबाहेर, मुंबईला रवाना आरोपी रोहनने सुशीला यांच्यावरही चाकूने वार केले. या झटापटीत अमोलच्या मुलाला देखील चाकूच्या जखमा झाल्या. या हल्ल्यात अमोलचा जागीच मृत्यू झाला, तर गंभीर जखमी झालेल्या सुशीला यांचा तिवसा येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. अमोलच्या मुलावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी पोहचून आरोपीचा शोध घेण्यास सुरूवात केली. पोलिसांनी आरोपी रोहन अवझाड याला ताब्यात घेतले आहे. घटनास्थळी पोलीस बंदोबस्त लावण्यात आला असून परिस्थिती शांत असल्याचे पोलिसांनी सांगितले.

घटनेची माहिती मिळताच अतिरिक्त पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल पवार यांनी घटनास्थळी भेट दिली. वडिलांच्या हत्येचा सूड घेण्यासाठीच आरोपीने हा हल्ला केल्याचे प्राथमिक चौकेशीत निष्पन्न झाले आहे. या घटनेमागे जुने वैमनस्य देखील कारणीभूत आहे. या दुहेरी हत्येच्या घटनेने अशोक नगर परिसर हादरून गेला आहे. तिवसा पोलीस अधिक चौकशी करीत आहेत. वडिलांच्या हत्येचा सूड घेण्यासाठी आरोपी रोहन सुधाकर अवझाड याने हा हल्ला केल्याचे पोलीस चौकशीतून समोर आले आहे. आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून या प्रकरणाचा तपास सुरू करण्यात आला आहे.

# अबला महिलांसाठीचा 'आशादीप'

लोकजागर



आपल्या समाजात अंग त्या अंगांचे विविध पैलू आपल्याला पाहायला मिळतात.मात्र या पैलूंमध्ये खूप काही गोष्टी दडलेल्या असतात, त्या कधी आपल्या दृष्टीसही पडत नाहीत. आपल्या याच समाजातील अबला महिलांच्या, मुलींच्या समस्या जे सोडविण्याचे आपल्या परीने काम करतात ते आपल्या याच समाजातील घटक असतात.

हे काम मग लोकांच्या सामूहिक प्रयत्नातून असो किंवा एखाद्या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून केले जाते.अशीच महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यातील 'आशादीप'महिला शासकीय वसतिगृह हि संस्था समाजातील विधवा, कौटुम्बिक हिंसाचाराला बळी पडलेल्या तसेच कुमारी माता, मुली, अनाथ मुलं याना आधार देते. त्यांच्या फक्त समस्या सोडविण्यापुरते हे काम मर्यादित नसून अनेक मुलींचे संसार याच संस्थेच्या प्रयत्नातून थाटले गेले आहेत.

१९८३ साली आशादीप' या संस्थेची स्थापना जळगावात झाली,तर २००६ पासून या संस्थेस आश्रयगृह म्हणून घोषित करण्यात आले. आज येथील महिला आणि मुली स्वबळावर उभ्या राहण्याचे प्रशिक्षण घेत असून यात त्या यशश्वी देखील झालेल्या आहेत. या आश्रयगृहात निराधार, निराश्रीत महिलांना आधार देऊन त्यांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला जातो.

शासनाच्या अनुदानाने येथील संस्थेचा कारभार चालतो.या आश्रयगृहातील निराधार महिला आणि मुलींना अन्न,वस्त्र आणि निवारा याची मोफत सोय करून देण्यात आलेली आहे. एखादी मुलगी येथे आल्यानंतर तिची २४ तासांच्या आत वैद्यकीय तपासणी पूर्ण केली जाते आणि आवश्यक उपचार करून तिला आश्रयगृहात आधार दिला जातो. महिलांना कायद्याची मोफत मदत देण्यासाठी येथे स्थानिक समिती देखील स्थापन करण्यात आलेली आहे.

शहरातील नामांकित वकील आणि सामाजिक कार्यकर्त्या अशा पीडित महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी झगडतात. याच माध्यमातून या मुलींना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी योग्य ते प्रशिक्षण देण्यात येते. तसेच शहरातील अनेक महिला मंडळ,रोटरी क्लब, इनरव्हील क्लब तसेच विविध सामाजिक संस्थांचे कार्यक्रम देखील या आश्रयगृहात आयोजित केले जातात.

या आश्रयगृहातील निरक्षर महिलांना साक्षर करण्यासाठी साक्षरता वर्ग देखील चालवले जातात. महिलांचे कौटुंबिक आयुष्य सुरळीत होण्यासाठी प्रसंगी त्यांच्या कुटुंबियांचे समुपदेशन देखील केले जाते. याच आश्रयगृहात महिलांना विविध प्रकारच्या वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण देऊन त्यांना आर्थिक मदतीचा मार्ग शोधून दिला जातो आणि आत्मनिर्भर बनवलं जात.

एकूणच, समाजातील तमाम निराधार, पीडित महिलांना आधार देणारी आणि त्यांच्या आयुष्यात आशेचा नवा दीप पेटवणारी आशादीप संस्था एक आदर्श संस्था आहे हे नक्की.

■ ■ ■

: शून्यातून विश्व :

# यशोगाथा कुक्कुट पालनाची





हल्ली उच्च शिक्षण घेऊनही नोकरी मिळवण्यासाठी धडपड करावी लागते. त्यामुळेअनेकजण जे येईल ते काम हाताशी धरून रोजगार करत असतात. तर काहीजण शिक्षण सोडून व्यवसाय करण्याला प्राधान्य देतात.

असाच एक अवलियाने शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बाळगून डीएड केले. मात्र दहा वर्ष शक्षक भरती न झाल्याने निराश न होता वेगळी वाट धरली. पठ्याने कुक्कुटपालनाचा व्यवसाय करत नवी उभारी घेतली आहे. आज राज्यभरात बेरोजगारांची संख्या कमी नाही. मात्र अनेकजण हताश होऊन टोकाचं पाऊल उचलतात. मात्र काही तरुण तेच पाऊल उचलून नव्या अध्याय उभा करतात. खचून न जाता आयुष्याशी दोन हात केल्यानंतर माणूस यशस्वी होतो.

याची अनेक उदाहरणे देखील आपल्यासमोर आढळतात. नोकरी सोडून व्यवसाय केला. नोकरी मिळाली नाही, म्हणून शेती केली. आणि यातून आपली प्रगती साधली. नाशिक जिल्ह्यातील तरुणाने देखील नोकरीच्या प्रतीक्षेत दहा वर्ष घालविल्यानंतर कुक्कुटपालनाकडे वळाला. आणि तेथूनच खऱ्या आयुष्याला सुरवात झाली.

नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर तालुक्यातील सापगाव येथील संदीप कचरे या युवकाची ही प्रेरणा गाथा. सर्व तरुणांच्या समोर आदर्श ठेवणारी आहे. साधारण 2012 च्या दरम्यान संदीपने डीएडला ॲडमिशन घेत शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बाळगले. त्यानंतर दोन वर्ष डीएड पूर्ण केले. मात्र त्यानंतर शिक्षक भरतीची वाट पाहू लागला.

एक वर्ष गेलं, दोन वर्ष गेली, अशी जवळपास दहा वर्ष उलटून गेली. आता काहीतरी करावं लागेल. असा निश्चय करून, आत्मनिर्भर होऊन कुक्कुटपालन करण्याचे ठरविले. स्वतःच्या हिमतीवर कुक्कुटपालनाचा व्यवसाय सुरु केला.

कसलेही मार्गदर्शन आणि कसलीही माहिती नसताना त्याने हा व्यवसाय सुरू केला आणि आज चांगल्या पद्धतीने त्याचा हा व्यवसाय सुरु असून तो स्वतःच्या पायावर उभा आहे.आज डीएड होऊन त्याला दहा वर्षे झाली असून मोठ्या शिक्षक भरतीच्या तो प्रतीक्षेत आहे. त्याला नोकरी मिळाली नाही.

सरते शेवटी त्याने स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा ठरवलं. साधारण दोन वर्षापासून त्याने स्वतःचा कुक्कुट पालन व्यवसाय सुरू केला असून तो कुटुंबाचे पालन पोषण करेल, इतपत कमावतो आहे. सुशिक्षित बेरोजगारांनी हार न मानता आपल्या ज्ञानाचा, आपल्या कौशल्याचा उपयोग व्यवसायामध्ये दाखवून स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे धाडस करावे. आपल्या मदतीला कोणी येणार नाही. आपल्यालाच करायचं आहे. एवढा निश्चय मनाशी ठरवून कामाला लागा असं त्याचे बेरोजगारांना सांगणे आहे.

सुरुवातीला संदीप कचरे या तरुणाने १०० कोंबड्यांच्या पिल्लांपासून कुक्कुटपालन व्यवसाय सुरू केला. आजच्या घडीला हा व्यवसाय अडीच ते तीन हजार पक्षांचा बनला आहे. ज्यातून हा शेतकरी महिन्याकाठी चांगले पैसे कमवत आहे. संदीप कचरे म्हणाला कि, कुक्कुटपालनामध्ये सुरुवात 100 कोंबड्या पासून सुरुवात केली. १०० पक्षांच्या शेड साठी १० हजार खर्च आला. त्यानंतर पक्षी घेण्यासाठी २५०० ते ३००० रुपए खर्च आला. पक्षांच्या खाद्यासाठी ५ हजार साधारण खर्च लागला. आणि ६ महिन्यानंतर अंडे उत्पादन चालू झाले. १०० कोंबड्या मागे ४०-५० अंडे रोजचे मिळतात. त्यानुसार आपला रोज चालू होतो. साधारण दिड ते २ वर्षापर्यंत कोंबडी अंडे देते. असं सर्वसाधारण या व्यवसायाचे स्वरूप असत. आजच्या तरुण बेरोजगारांनी नोकरीच्या मागे न लागता काहीतरी व्यवसाय करणे आवश्यक आहे, मेहनत केल्याशिवाय कुठलीही गोष्ट सध्या होत नाही, त्यामुळे मेहनत करा, यश नक्की मिळेल, असेही तो म्हणाला.

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

■ ■

# एका बापाला ५६ मुले

## काँग्रेस नेते विजय वडेट्टीवारांचा हल्लाबोल



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

काँग्रेसच्या वतीने मत चोरीच्या मुद्द्यावरून 'वोट चोर, गद्दी छोड' या अभियानाला प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वात कामठी येथून सुरुवात करण्यात आली आहे.

यावेळी राज्यातील मतदार याद्यांमधील गोंधळ, मत चोरीवरून काँग्रेस नेत्यांनी तीव्र हल्लाबोल केला. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी भाजपने एका बापाला ५६ मुले दाखवून मतदार यादीत घोटाळा केल्याचा आरोप केला. तसेच भाजपने मत चोरी करून १३२ आमदार निवडून आणल्याचा आरोपही त्यांनी केला.

काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी काही दिवसांपूर्वी एका पत्रकार परिषदेत मत चोरी आरोप करत खळबळ उडवून दिली होती. या पत्रकार परिषदेत त्यांनी महाराष्ट्रात कशाप्रकारे मत चोरी झाली, याबाबतचे पुरावे दिले होते. तेव्हापासून मत चोरी मुद्द्यावरून काँग्रेस आक्रमक झाली आहे.

मागील महिन्यात विरोधी पक्षांच्या खासदारांनी निवडणूक आयोगावर मोर्चा देखील काढला होता. या पार्श्वभूमीवर राहुल गांधी यांनी बिहारमध्ये मतदार हक्क यात्रा काढली होती. बिहारमध्ये १७ ऑगस्टपासून सुरू झालेली ही यात्रा सुमारे २५ जिल्ह्यांमधून १३०० किमीचा प्रवास करून पाटणा येथे संपली.

राहुल गांधींच्या यात्रेनंतर आता महाराष्ट्र काँग्रेसच्या वतीने 'वोट चोर, गद्दी छोड' या मोहिमेची सुरुवात करण्यात आली आहे.

मोहन भागवत ३ मुले पैदा करा असे सांगतात, पण चंद्रपूर जिल्ह्यात एका बापाला ५६ मुले दाखवून मतदारयादीत घोटाळा केल्याचा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला. भाजप मत चोरी करून महाराष्ट्रात १३२ आमदार निवडून आणल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला. महाराष्ट्रातील मतचोरांना धडा शिकवण्यासाठी ही सभा घेतली जात आहे, असे विजय वडेट्टीवार म्हणाले.

यावेळी बोलताना, सुनील केदार यांनी '6== पार' चा नारा संविधान बदलण्यासाठी दिला होता, असा आरोप केला. येत्या सहा महिन्यांत मोदी सरकार राहणार नाही असेही ते म्हणाले. एक जरांगे दिसला, तर मुंबईत थयथयाट झाला, सामान्य माणूस रस्त्यावर आला तर तुम्हाला जागा मिळणार नाही, अशा शब्दांत त्यांनी भाजपवर टीका केली. आम्ही पंचायात समिती आणि जिल्हा परिषद जिंकणार आहे, असा विश्वासही सुनील केदार यांनी व्यक्त केला.

# अंडरवर्ल्ड डॉन डॅडी अखेर तुरुंगाबाहेर



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :

अंडरवर्ल्ड डॉन आणि माजी आमदार अरुण गवळीची अखेर १८ वर्षांनंतर नागपूर मध्यवर्ती कारागृहातून सुटका झाली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केल्यानंतर पोलिसांनी कडक सुरक्षेत गवळी यांना मागील गेटने तुरुंगाबाहेर काढले.

गवळी २००७ मध्ये मुंबईतील शिवसेना नगरसेवक कमलाकर जामसांडेकर यांच्या हत्येप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत होता. मागील १८ वर्षांपासून तो जामिनासाठी प्रयत्न करत होता. आज सुटका झाल्यानंतर नागपूर पोलिसांनी त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर विमानतळावर आणले, जिथून ते मुंबईकडे रवाना झाले.

### अरुण गवळी कोण?

मुंबईच्या अंडरवर्ल्डमध्ये डॅडी नावाने कुप्रसिद्ध असलेले अरुण गवळी हे भायखळ्याच्या चिंचपोकळीतील दगडी चाळीत वाढले. सुरुवातीला छोट्या गुन्ह्यांतून कारकीर्द सुरू करून त्यांनी स्वतःचा गँग स्थापन केला आणि हळूहळू दाऊद इब्राहिमविरोधी गटाचे नेतृत्व हातात घेतले.

केवळ गँगवॉरपुरतेच न थांबता गवळींनी पुढे राजकारणात प्रवेश केला. स्वतःची अखिल भारतीय सेना ही संघटना स्थापन केली आणि मुंबईतील निवडणुकांत आपली ताकद दाखवून एकेकाळी विधानसभेत आमदार पद मिळवले. अरूण गवळी यांना यापूर्वी अनेकदा पॅरोल मंजूर करण्यात आला होता.